

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, २२ मार्च २०२५। युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १३३ । पाने १२ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


**आजचा सामना**




कोलकाता वि. बंगळुरु
वेळ : रात्री ७.३० वाजता
ठिकाण : ईडन गार्डन, कोलकाता

# जिल्ह्याचा टंचाई आराखडा ४० कोटींचा

- उन्हाच्या तीव्रतेमुळे जिल्हा प्रशासन 'अलर्ट मोडवर'
- प्रस्तावित ६८० गावे अन् १९३३ वाड्यांचा समावेश

**दै. तरूण भारत विशेष । अविनाश गायकवाड**
**तभा वृत्तसेवा, सोलापूर, दि. २१ मार्च-**

२०२३-२४ साली (गतवर्षी) जिल्ह्यात दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने फेब्रुवारीमध्येच दुष्काळी नियोजन आराखडा तयार केला होता आणि १३७ गावे, ९१२ वस्त्यांवर राहणाऱ्या ४ लाख लोकांसाठी तब्बल १६७ पाण्याचे टँकर एप्रिलपासून चालू केले होते. यंदा जिल्ह्यात मुबलक पाणी असल्याने अजूनही पाणी टँकरची मागणी आली नसली तरी ४० कोटी १६ लाख १२ हजार रूपयांचा पाणी टंचाई कृती आराखडा जिल्हा प्रशासनाकडून विभागीय आयुक्तांकडे मंजुरीसाठी



पाठविण्यात आला आहे. त्यांच्या मंजुरीनंतर तो पाणी टंचाई आराखडा शासनाकडे पाठविण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माहे ऑक्टोबर २०२४ ते जून २०२५ अखेर पाठविलेल्या पाणी टंचाई कृती आराखड्यामध्ये आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार इतका अपेक्षित आहे. यामध्ये प्रस्तावित योजनांची संख्या ११३५, प्रस्तावित गावे ६८० आणि १९३३ वाड्यांचा समावेश आहे. तर उपसा सिंचन योजनेची वीज देयके देणेकरिता २ कोटी रू., प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची वीज देयके थकबाकी देणेकरिता र. रूपये १०६१.०५, व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेची टंचाई कालावधीतील वीज देयके देणेकरिता ६११.३६ लाख असा एकूण १८ कोटी ७२ लाख ४१ हजार इतका निधी गृहित धरण्यात आला आहे. एकंदरीत, पाणी टंचाई कृती आराखड्यातील आवश्यक खर्च २१ कोटी ४३ लाख ७१ हजार आणि वीज देयके थकबाकी देणेकरिता १८ कोटी ७२ लाख ४१ हजार असा एकूण ४० कोटी १६ लाख १२ हजाराचा पाणी टंचाई आराखडा यंदा तयार केला आहे. यंदा मात्र मार्च महिना संपत आला तरी जिल्ह्यातील एकाही गावातून अद्याप पाणी टँकरची मागणी आली नसल्याची गुड न्युज मध्यंतरी टंचाईचे उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांनी दिली होती. या चालू वर्षात सरासरीच्या दीडपट पाऊस झाल्याने नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा अन् जनावरांच्या चाऱ्याचा वर्षभराचा तसा... **(उर्वरित वृत्त पान २ वर)**

### गतवर्षी कोट्यवधींची उड्डाणे

गतवर्षी सोलापूर जिल्ह्यातील ५ तालुक्यात अती दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याने कोट्यवधीचा खर्च करावा लागला होता. यामध्ये नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, जिल्ह्यातील टंचाईवर मात करण्यासाठी २५० च्याहीवर पाण्याचे टँकर लागले आणि चारा टंचाईवर पर्याय म्हणून गवत बियाणे वाटपासाठी २५० कोटीच्या पुढे खर्च करण्यात आला होता. यंदा मात्र शासनाचा हा सर्व खर्च सध्यातरी वाचला आहे. एप्रिल ते जून २०२५ अखेरपर्यंत ज्या भागात टँकर द्यावी लागतील, तितकाच खर्च जिल्हा प्रशासनाला यंदा करावा लागणार आहे.

## महत्त्वाचे

### बाजारात परतली जोरदार तेजी

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजारात शुक्रवारी सलग पाचव्या दिवशी तेजी दिसून आली. पहिल्या सत्रातील



घसरणीनंतर बाजाराने जोरदार पुनरागमन केले. कमकुवत जागतिक संकेतांदरम्यान देशांतर्गत बाजारात चांगली खरेदी दिसून आली. विक्रीनंतरही आयटी शेअर्समध्ये जोरदार रिकव्हरी झाली. निर्देशांकात ५५० हून अधिक अंकांची वाढ झाली तर निफ्टीदेखील २३,३५० पार केल्यानंतर बंद झाला. निफ्टीत बँक, आयटी, वित्तसंस्था, ऑटो, एफएमसीजी, धातू, रियल्टी आदी शेअर्स हिरव्या रंगात बंद झाले.

### आयपीएलचा थरार आजपासून

कोलकाता : जगातील सर्वाधिक लोकप्रिय इंडियन प्रीमियर लीगच्या १८ व्या आवृत्तीला शनिवारपासून प्रारंभ होत आहे. सुमारे दोन महिने चालणाऱ्या या आयपीएलचा सलामीचा सामना शनिवारी ईडन गार्डन्स स्टेडियमवर सायंकाळी ७.३० वाजतापासून गतविजेता कोलकाता नाईट रायडर्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यादरम्यान खेळला जाणार आहे. शनिवारी पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली असली तरीही सलामीच्या सामन्यापूर्वी अभिनेत्री दिशा पटाणी व गायिका श्रेया घोषाल यांच्या नृत्य व संगीताच्या कार्यक्रमाने आयपीएलच्या क्रिकेट उत्सवाला सुरुवात होणार आहे. दहा संघांचा समावेश असलेल्या आयपीएलमध्ये विविध ठिकाणी एकूण ७४ सामने खेळले जाणार असून स्पर्धेचा अंतिम सामना २५ मे रोजी खेळला जाणार आहे. मुंबई इंडियन्स व चेन्नई सुपर किंग्जने आतापर्यंत प्रत्येकी पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे. यंदाच्या आयपीएलमध्ये अनेक संघांचे कर्णधार बदलण्यात आले असून या लढतीतील दोन्ही संघांचे नवीन कर्णधार असून केकेआरचा कर्णधार अजिंक्य रहाणे आहे.



संचारबंदी असलेल्या गांधी गेट भागात अशी स्थिती होती

# संचारबंदी क्षेत्रांत तणावपूर्ण शांतता

**नागपूर, २१ मार्च**

सोमवारी रात्री उसळलेल्या दोन गटांतील संघर्षाच्या पृष्ठभूमीवर लावण्यात आलेल्या संचारबंदीदरम्यान आज शुक्रवारी सर्वत्र शांतता होती. विशेषतः महाल, गांधीबाग, मोमीनपुरा, इतवारी भागांत शुकशुकाट होता. पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता.

सोमवारी रात्रीच्या घटनेनंतर पोलिसांनी कोतवाली, गणेशपेठ, तहसील, लकडगंज, पाचपावली, शांतीनगर, सक्करदरा, नंदनवन, इमामवाडा, यशोधरानगर, कपिलनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लावली होती. आज नंदनवन व कपिलनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीमधील संचारबंदी पूर्णतः हटविण्यात आली.

संचारबंदी लावण्यात आलेल्या भागांत पोलिस, क्यूआरटी तसेच राज्य राखीव पोलिस दलाच्या सशस्त्र जवानांचा कडेकोट बंदोबस्त कायम आहे. गणेशपेठ, तहसील व लकडगंज पोलिस ठाण्यांच्या हद्दीत येणाऱ्या महाल, बजेरिया, गांधीबाग, मोमीनपुरा, इतवारी या भागांत आज शुकशुकाट होता. या परिसरात फेरफटका मारला असता तणावपूर्ण शांतता आढळली.

किराणा व औषधांची किरकोळ दुकाने सुरू होती. औषधांचा घाऊक बाजारही सुरू होता. एवढा अपवाद वगळला तर संपूर्ण दुकाने बंद होती. प्रत्येक गल्ली तसेच रस्त्याचे प्रवेश लोखंडी कठडे लावून बंद करण्यात आले होते. अंतर्गत गल्ली-बोळातून तुरळक वाहने जात-येत होती. एका गल्लीत मुले क्रिकेट खेळताना दिसली.

संचारबंदी असलेल्या भागांत तणावपूर्ण शांतता होती. काही गल्ल्यांमध्ये दोन-चार लोक दबक्या आवाजात बोलताना आढळले. एवढा अपवाद वगळला तर चिटणीस पार्क, गांधी गेट, बडकस चौक, इतवारी या भागांतील रस्ते निर्मनुष्य होते. केवळ पोलिस होते. मोमीनपुऱ्याकडे जाणारे रस्ते लोखंडी कठडे लावून बंद करण्यात आले होते. परिसरात राज्य राखीव पोलिस दलाचे सशस्त्र जवान तैनात होते.

*(तभा वृत्तसेवा)*

# न्यायमूर्तींच्या घरात आढळला नोटांचा ढीग

- सरन्यायाधीशांनी केली बदली
- बंगल्याला आग लागल्यानंतर समोर आले घबाड

**नवी दिल्ली, २१ मार्च**

सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांची अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याची शिफारस केली आहे. वर्मा यांच्या सरकारी बंगल्यात आग लागल्यानंतर मोठ्या प्रमाणात बेहिशेबी रोख रक्कम सापडली. त्यानंतर ही शिफारस करण्यात आली असून, त्यांच्याविरुद्ध चौकशी किंवा महाभियोग चालविला जाऊ शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे.

यामुळे न्यायालयीन वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांच्या सरकारी निवासस्थानाला आग लागल्याची घटना नुकतीच घडली. यावेळी ते शहराबाहेर होते. त्यांच्या कुटुंबाने अग्निशमन दल आणि पोलिसांना फोन केला. आग विझविताना त्यांच्या घरातून मोठ्या प्रमाणात रोख रक्कम जप्त करण्यात आली. बेहिशेबी रक्कम जप्त झाल्याची अधिकृत नोंद करण्यात आली असून, सरन्यायाधीशांना याबद्दल माहिती देण्यात आली.

दरम्यान, या सर्व प्रकरणानंतर आता न्या. वर्मा यांचा राजीनामा होणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे

# छत्रपतींचा इतिहास अनिवार्य असणार

**सीबीएसईचा महाराष्ट्र पॅटर्न ७०:३० टक्के**

**मुंबई, २१ मार्च**

२०२५-२६ या शालेय शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पहिलीसाठी सीबीएसई पॅटर्न लागू करणार असल्याची घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली. पहिल्या टप्प्यात इयत्ता पहिलीसाठी अभ्यासक्रम लागू होईल व पुढील शैक्षणिक वर्षापासून दोन वर्षांत दोन टप्प्यांमध्ये सीबीएसई पॅटर्न शालेय शिक्षणात राबवला जाणार आहे.

शालेय शिक्षणमंत्र्यांनी घोषणा केल्यानंतर राज्य मंडळाच्या शाळांमध्ये शिकवणारे शिक्षक आणि आपल्या मुलांना शिक्षण देणाऱ्या पालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. मात्र, शासनाने तयारी सुरू केली आहे.सीबीएसई पॅटर्न महाराष्ट्रात यंदाच्या वर्षांपासून लागू करण्यात येत असून, राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात ७० आणि ३० टक्के फॉर्म्युला वापरण्यात येणार आहे.महाराष्ट्रातील सीबीएसई पॅटर्नचा विचार केल्यास ७० टक्के सीबीएसई तर ३० टक्के राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम असणार आहे. भाषा आणि इतिहास विषयाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी माहिती आहे.

*(वृत्तसंस्था)*

### टाटा-मस्क भागीदार

**नवी दिल्ली** : टाटा ऑटोकॉम्प, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टाटा टेक्नॉलाजी आणि टाटा इलेक्ट्रॉनिक्स या कंपन्या एलन मस्कच्या टेस्ला कंपनीच्या जागतिक पुरवठादार बनल्या आहेत.

टाटा समूहाने अमेरिकन इलेक्ट्रिक व्हेइकल मॅन्युफॅक्चरिंग कंपनी टेस्लासोबत जागतिक पुरवठादार म्हणून भागीदारी केली आहे.

# सोलापूर विद्यापीठाच्या कुलसचिव योगीनी घारे यांचा राजीनामा

- मुंबई विद्यापीठाने 'लीन' रद्द केल्यामुळे राजीनाम्याचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. योगीनी घारे यांनी कुलसचिव पदाचा राजीनामा कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर यांच्याकडे सुपुर्द केला आहे. या वृत्तास कुलसचिव घारे यांनी दुजोरा दिला आहे.






मुंबई विद्यापीठात त्या ८ एप्रिलला त्यांच्या मूळ पदावर रूजू होणार आहेत. मुंबई विद्यापीठातून ते पाच वर्षाच्या लीनवर या विद्यापीठात रुजू झाल्या होत्या. मुंबई विद्यापीठात शिक्षक व प्रशासकीय पदाच्या अनेक जागा रिक्त असल्यामुळे प्रशासकीय कारणास्तव मुंबई विद्यापीठाने सर्वांच्या लीन रद्द करून ७ एप्रिलला रूजू होण्याचे आदेश दिले आहेत.

त्यात कुलसचिव घारे यांचा समावेश आहे. लीन रद्द केल्यामुळे त्यांना हा निर्णय घ्यावा लागला असल्याचे कुलसचिव घारे यांनी दैनिक तरूण भारतशी बोलताना सांगितले.

# संघ शताब्दीनिमित्त विस्तार, एकत्रीकरणावर भर



**सह सरकार्यवंगाह मुकुंद सीआर यांचे प्रतिपादन**

**बंगळुरू, २१ मार्च**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीत (एबीपीएस) आमचा बहुतेक वेळ संघाच्या कार्याचे विश्लेषण आणि नियोजन करण्यात व्यतीत होणार आहे. हे संघाचे शताब्दी वर्ष आहे. त्यानिमित्त आम्ही विस्तार आणि एकत्रीकरण करीत आहोत. बैठकीत संघकार्याच्या सामाजिक परिणामांवर, समाजात बदल घडवून आणण्यावर चर्चा, विचारमंथन, विश्लेषण करणार आहे, असे प्रतिपादन सह सरकार्यवाह मुकुंद सीआर यांनी केले.

बंगळुरू येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या तीन दिवसीय अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला शुक्रवारी सुरुवात झाली. याचे उद्घाटन सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी जनसेवा विद्या केंद्र, चान्नेनहल्ली, बंगळुरूच्या प्रासादात भारत मातेला पुष्पहार अर्पण करून केले. सह सरकार्यवाह मुकुंद सीआर यांनी अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या उद्घाटनाच्या दिवशी माध्यमांना संबोधित करताना सांगितले की, अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत उपस्थित असलेल्या एकूण कार्यकर्त्यांची संख्या १४८२ आहे. प्रथम सत्राची सुरुवात राष्ट्र आणि समाजातील प्रमुख व्यक्तींना श्रद्धांजली वाहून करण्यात आली.

संघ शाखेच्या ठळक वैशिष्ट्यांविषयी ते म्हणाले की, ५१,५७० ठिकाणी दररोज एकूण ८३,१२९ शाखा लागतात. ज्या गेल्या वर्षी ७३,६४६ पेक्षा १०,००० नी जास्त आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत साप्ताहिक मिलन ४,४३० ने वाढले आहेत, तर शाखा आणि साप्ताहिक मिलनची एकूण संख्या १,१५,२७६ आहे. तरुणांचा, महिलांचा वाढता सहभाग संघकार्यात तरुणांची संख्या वाढली आहे. दरवर्षी लाखो तरुण विशेषतः १४-२५ वयोगटातील स्वयंसेवक म्हणून संघात सहभागी होत आहेत.

देशभरात एकूण ४,४१५ प्रारंभिक वर्ग आयोजित केले गेले. यात २,२२,९६२ जण उपस्थित होते, त्यापैकी १,६३,००० (१४-२५) वयोगटातील होते तसेच उपस्थितांपैकी २०,००० हून अधिक जण ४० वर्षांपेक्षा जास्त वयाचे होते. दरवर्षी संघात नवीन विद्यार्थी आणि तरुण जोडले जात आहेत. आमच्याकडे वेबसाईटद्वारे संघात सहभागी होण्याची तरतूद आहे. २०१२ पासून १२,७२,४५३ हून अधिक लोकांनी वेबसाईटद्वारे संघामध्ये सामील होण्यास आपली रुची दाखवली आहे, ज्यात ४६,००० हून अधिक महिला आहेत.





आकर्षक लाभांसह आयुर्विमा सुरक्षा

| पॉलिसीची मुदत | प्रीमियम भरण्याची मुदत |
|---|---|
| 16 | 10 |
| 21 | 15 |
| 25 | 16 |

एलआयसीचा जीवन लाभ
एक पार, नॉन लिंक्ड, जीवन, वैयक्तिक, बचत योजना
Plan No.: 736 UIN No.: 512N304V03

- किमान मूळ विमा रक्कम : ₹200,000/-
- कमाल मूळ विमा रक्कम : कोणतीही मर्यादा नाही
- प्रवेशाच्या वेळचे किमान वय : 8 वर्षे
- प्रवेशाच्या वेळचे कमाल वय : 25/21/16 वर्षांच्या पॉलिसी मुदतीसाठी 50/54/59 वर्षे

अधिक माहितीसाठी तुमच्या एजंट/जवळची एलआयसीची शाखा यांच्याशी संपर्क साधा किंवा 56767474 वर तुमच्या शहराचे नाव एसएमएस करा
एलआयसी मोबाईल ॲप डाऊनलोड करा LIC digital | भेट द्या: licindia.in | कॉल सेंटर सेवा (022) 6827 6827 | आमचा व्हाट्सॲप नं. 8976862090 बोला 'Hi'
आम्हाला फॉलो करा: LIC India Forever | IRDAI Regn No.: 512
"उत्पादनाअंतर्गत अनुमानित बोनसच्या जोखीम घटकांची हमी दिली जात नाही. मागील कामगिरी भविष्यातील बोनसचा कोणताही संकेत देत नाही आणि ही उत्पादने गुंतवणुकी, खर्चाचे व्यवस्थापन, मृत्युदर आणि कालातीत पॉलिसी यांच्यावर आधारित विमा कंपनीच्या एकूण कामगिरीवर अवलंबून असतात."
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
भारतीय जीवन बीमा निगम
LIFE INSURANCE CORPORATION OF INDIA
प्रत्येक क्षणी तुमच्या सोबत
LIC/P1/2024-25/52/Mar
भ्रामक फोन कॉल्स आणि बनावट/फसव्या ऑफर्सपासून सावध रहा. आयआरडीएआय किंवा त्यांचे अधिकारी बीमा पॉलिसीज्ची विक्री, बोनस जाहीर करणे किंवा प्रिमियम्सची गुंतवणूक, रकमा परत करणे यासारख्या बीमा व्यवसायाशी संबंधित कोणत्याही कामकाजात सहभाग घेत नाहीत, अशा प्रकारचे दुरध्वनी येणाऱ्या पॉलिसीधारकांनी अथवा संभाव्य ग्राहकांनी पोलिसांकडे तक्रार नोंदवावी. कृपया विक्रीचा व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी अधिक माहितीसाठी तसेच जोखमींचे घटक, नियम व अटी यासंबंधीच्या माहितीसाठी, विक्री माहितीपुस्तिका काळजीपूर्वक वाचा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

पान १ वरुन

## जिल्ह्याचा टंचाई आराखडा ४० कोटींचा...

तर प्रश्न मिटला आहे. ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत परतीच्या पावसाचा जोर झाल्याने अद्याप सर्वत्र पाणीसाठा मुबलक असून, आजतागायत जिल्ह्यातून एकाही पाण्याच्या टँकरची मागणी आली नाही. यंदा जिल्ह्यातील सर्व धरणे, साठवण तलाव, विहिरी, नाले-ओढे, नद्या भरभरून वाहिले आहेत. यामुळे अजूनही सर्वत्र पाणी दिसत आहे. पाण्याची पातळीही वर आलेली आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी पाणी टंचाई जाणवेल. अशा ठिकाणी पाणी टँकर देण्यात येणार असून, जिल्हा परिषदेकडून अशा गावांचा टंचाई आराखडा तयार वरीलप्रमाणे तयार केला आहे.

**माहे ऑक्टोबर २०२४ ते जुन २०२५ अखेरचा पाणी टंचाई कृती आराखडा**

| उपाययोजना | सोलापूर ऑक्टोबर २०२४ ते जुन २०२५ | | | |
|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित योजनांची संख्या | प्रस्तावित गावे | प्रस्तावित वाडया | आवश्यक खर्च रु.लक्ष |
| विधंण विहीरी घेणे | ७ | ७ | ० | ४.६० |
| नळ योजनांची विशेष दुरुस्ती करणे | १३ | ० | १२५.०० | |
| विधंण विहीरींची विशेष दुरुस्ती करणे | २०८ | १५२ | १ | ८१.३५ |
| तात्पुरत्या पुरक नळ योजना घेणे | २ | २ | ० | १० |
| टँकरने/बैलगाडीने पाणी पुरवठा करणे | ४३६ | ३९२ | १८८५ | १६५५.५२ |
| खाजगी विहीरींचे अधिग्रहण करणे | ४७२ | ४६० | ९५५ | २५३.२४ |
| विहीरी खोल करणे / विहीरीतील गाळ काढणे | ७ | ७ | ० | १४ |
| वुडक्या घेणे | ० | ० | ० | ०.०० |
| प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजनांची कामे तातडीने पूर्ण करणे | ० | ० | ० | ० |
| एकूण | ११३५ | ६८० | १९३३ | २१४३.७१ |

# पनाश टॉवर बांधकाम; संबंधितांना नोटीस काढा

**महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांचे आदेश**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

विजापूर रस्त्यावरील पनाश या सतरा मजली इमारतीच्या अनियमिततेचा विषय पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी यासंदर्भात कारवाईचे संकेत दिले आहेत.

नगररचना विभागाचे उपसंचालक भिष्णुरकर यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती आयुक्तांना दिली. पंधरा वर्षापुर्वी मंजुर झालेल्या या गृह प्रकल्पात विकासकाने अनेक चुका केल्या आहेत. त्याकडे दुर्लक्ष करुन महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी या इमारतींना परवानगी दिली आहे. ९ मजली इमारतीला परवानगी असताना नव्या नियमाचा आधार घेत या इमारतीवर सतरा मजले चढवण्यात आले. हे करताना बांधकामाचे सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत. महापालिकेचे माजी आयुक्त पी. शिवशंकर यांनी याबाबत नगररचना विभागाचे तत्कालीन अधिकारी केशव जोशी यांना चौकशीचे आदेश दिले होते. जोशी यांनी पनाश गृह प्रकल्पातील इमारतींची प्रत्यक्ष पाहणी करुन जो अहवाल आयुक्तांना सादर केला आहे त्यामध्ये विकासकाने बांधकामाच्या अनेक नियमांना हरताळ फासल्याचे म्हटले आहे. या कामात त्यांना महापालिकेतील काही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष मदत केली असल्याचे स्पष्ट होते. या पार्श्वभूमीवर शुक्रवारी सकाळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पनाश गृह निर्माण प्रकल्पाची फाईल मागवुन संपूर्ण माहिती घेतली. नगररचना विभागाचे उपसंचालक भिष्णुरकर यांनी या प्रकरणाची संपूर्ण माहिती आयुक्तांना दिली. विकासकाने नियमानुसार जागा महापालिकेला दिलेली नाही याबाबतचा वाद न्यायालयात प्रलंबित असल्याचे त्यांनी सांगितले. युडीसीपीआरचे फायदे घेताना विकासकाने महापालिकेची दिशाभूल केली असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला असून या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांना नोटीसा काढण्याचे आदेश दिले आहेत. पनाशला विस्तारित बांधकाम परवाना देताना महापालिकेतील अधिकाऱ्यांनी विकासकाला नियमबाह्य मदत केली असल्याचे दिसून येते. तसेच या प्रकरणात महापालिकेचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. या आर्थिक फसवणुकीला जबाबदार असलेल्यांविरुध्द फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करता येतील, असेही आयुक्तांनी यावेळी स्पष्ट केले.

**आयुक्तांना सोमवारी भेटून सर्व पुरावे सादर करणार : जामगुंडे**

पनाशच्या इमारत बांधकामात मोठा भ्रष्टाचार झाला आहे. विकासक आणि महापालिका यांनी संगनमत करुन हा भ्रष्टाचार केला आहे. याबाबतचे सर्व पुरावे पुर्वीच्या आयुक्तांना दिले होते. त्यांनी कोणतीही कारवाई केली नाही. न्यायालयाकडे बोट दाखवत त्यांनी आपली जबाबदारी झटकली आहे. विद्यमान आयुक्तांना सोमवारी भेटून याबाबतचे सर्व पुरावे सादर करणार आहे, असे माजी नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी स्पष्ट केले.

## विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आज सोलापूर दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २१ मार्च-**



विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे हे शनिवार, दिनांक २२ मार्च २०२५ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून, त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे.

पहाटे ०४.४० वा. जेऊर रेल्वेस्टेशन येथे आगमन व शासकीय मोटारीने करमाळा, शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ०७.४५ वा शासकीय वाहनाने मुथानगर करमाळाकडे प्रयाण. सकाळी ०८.०० वाजता मुथानगर येथे आगमन व हरिष कडू यांचे निवासस्थानी राखीव. सकाळी ०८.३० वा. शासकीय वाहनाने पोथरे, ता. करमाळा कडे प्रयाण. सकाळी ०८.४० वा. पोथरे येथे ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांच्यावतीने आयोजित सत्कार समारंभास उपस्थिती व शनिमंदिर येथे दर्शन.

सकाळी ०९.३० वा. पोथरे येथून शासकीय वाहनाने खातगांव, ता. करमाळाकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा.रणसिंग फार्म (उजनी परिसर) खातगांव येथे आगमन व ग्रामसुधार समिती करमाळा आयोजित श्री बालाजी मंजुळे यांच्या करमाळा भूषण पुरस्कार व श्री राजेंद्र रणसिंग यांच्या सेवापूर्ती सत्कार सोहळ्यास उपस्थिती. दुपारी ०१.०० वा. खातगांव येथून शासकीय वाहनाने चौंडी, ता.जामखेड, जि. अहिल्यानगरकडे प्रयाण करतील.

## ई-केवायसी नसलेल्यांचा धान्य पुरवठा बंद होणार

- ३१ मार्चनंतर कार्यवाही होणार
- जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांचा गंभीर इशारा

राज्य शासनाकडून वाढविण्यात आलेली ही शेवटची मुदत असणार आहे. त्यानंतर ई-केवायसी करण्यात येणार नाही, असाही इशारा सरडे यांनी दिला आहे. अजून जिल्ह्यातील २९ टक्के नागरिकांची ई-केवायसी अपूर्ण आहे. ज्या कार्डधारकांचे ई-केवायसी पूर्ण झाले नाही. त्यांचे रेशन ३१ मार्चनंतर बंद होणार आहे. याला जबाबदार कार्डधारकच राहणार आहेत.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी, सोलापूर**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

राज्यात रेशनकार्ड धारकांना घरबसल्या ई-केवायसी करण्यासाठी केंद्र सरकारने 'मेरा ई-केवायसी ॲप' सुरू केले आहे. इतकेच नाही तर जिल्ह्यातील रास्त भाव धान्य दुकानदारही शिधापत्रिकाधारकांची ईकेवायसी मागे लागून करून घेत आहेत; तरीही नागरिकांतून उत्साहाने हे ईकेवायसीचे काम होत नसल्याची खंत जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी व्यक्त केली.

दरम्यान, जिल्ह्यातील ११ तालुक्यातून अजून २९.२५ टक्के लोकांनी ई-केवायसी केली नाही आणि या नागरिकांनी मार्च एन्डपर्यंत ई-केवायसीकडे पाठ फिरविल्यास ३१ मार्चनंतर त्यांना धान्य पुरवठा बंद केला जाईल, असा गंभीर अन् शेवटचा इशारा जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. २१) दिला. राशन कार्डसाठी ई-केवायसी शासनाने मागील सहा महिन्यांपासून सुरू केली आहे. मध्यंतरी सर्व्हर डाऊनच्या अडचणीमुळे या मोहिमेला गती येत नव्हती. यामुळे शासनाच्यावतीने वरचेवर मुदतवाढ देण्यात आली. मागील मुदतीनंतर २८ फेब्रुवारी व यानंतर ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तरीही अजून या आठवड्यात कार्डधारकांनी ई-केवायसी पूर्ण करून घ्यावी. अनेक कार्डधारकांचे अंगठे ई-पॉस मशीनवर स्कॅन होत नव्हते; यामुळे आता या राशन कार्डधारकांचे ई-पॉस मशीनवर डोळे स्कॅन करून ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करता येत आहे. यामुळे ज्या-त्या भागातील नागरिकांनी आपल्या जवळच्या राशन दुकानात जावून तत्काळ ई-केवायसी करावी.



# आमदार सुभाष देशमुखांचीही अधिवेशनात तोफ धडाडली

**● सोलापुरात अवैध राहणाऱ्या बांगला देशीयांवर कारवाई करा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**



सोलापूर जिल्ह्यातील एमआयडीसी, नई जिंदगी भागात असलेल्या विमानतळाशेजारी तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील कणबस येथे बांगलादेशी नागरिक अवैधरीत्या राहत आहेत. त्यामुळे स्थानिक नागरिकांना धोका निर्माण होत आहे. यासाठी या बांगलादेशीयांवर कारवाई करण्याची मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी करत सभागृहाचे लक्ष वेधले.

दि. ५ मार्च रोजी अक्कलकोट एमआयडीसी परिसरात बारा बांगलादेशी नागरिक सापडले. त्या बांगलादेशी नागरिकांनी कोणत्याही प्रकारची वैध प्रवासी परवानगी व कागदपत्राशिवाय तसेच भारत बांगलादेश सीमेवरील मुलकी नोंदणी अधिकारी यांच्या लेखी परवानगीशिवाय अवैध घुसखोरी केली आहे. असेच बांगलादेशी नागरिक एमआयडीसी, नई जिंदगी तसेच दक्षिण तालुक्यातील कणबस भागात राहत आहेत. अनेक नागरिक बोगस मतदान करत आहेत. ते स्थानिकांच्या मदतीने बनावट भारतीय आधार कार्ड बनवून सोबत बाळगत असल्याने भारतीय नागरिकांना परदेशी नागरिकांपासून धोका निर्माण झाला आहे. त्यासाठी राज्य शासनाने तात्काळ याची दखल घेऊन राज्यात घुसखोरी केलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कडक कारवाई करून त्यांना तात्काळ बांगलादेशात परत पाठवण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी आमदार सुभाष देशमुख यांनी अधिवेशनात केली.

# आवडीच्या क्षेत्रात कौशल्य साध्य करावे

- ● निवृत्त कुलगुरु कानिटकर यांचा सल्ला
- ● आरोग्य विद्यापीठाच्या 'कुलगुरु कट्टा' उपक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

यशस्वी होण्यासाठी प्रत्येकाने आपल्या आवडीच्या क्षेत्रात कौशल्य साध्य करुन शिक्षण घ्यावे, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या माजी कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) प.वि.से.प., अ.वि.से.प., वि.से.प यांनी केले. विद्यापीठातर्फे सोलापूर येथे अश्विनी रुरल वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय आणि संशोधन केंद्रात 'कुलगुरु कट्टा' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी कुलगुरु लेफ्टनन्ट जनरल माधुरी कानिटकर (निवृत्त) सवमेत मा. प्रति-कुलगुरु डॉ. मिलिंद निकुंभ, मा. व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सचिन मुंबरे, विद्यापीठाच्या वैद्यकीय विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विठ्ठल धडके, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, अश्विनी रुरल वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुहास कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील, उपकुलसचिव एन.व्ही.कळसकर व्यासपीठावर उपस्थित होते. माजी कुलगुरू कानिटकर यांनी सांगितले की, स्वयंपूर्ण शिक्षणाकडे विद्यार्थ्यांनी अधिक लक्ष केंद्रीत केले पाहिजे. गुणवत्ता व विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. संशोधन आणि नवीन कल्पनांचा प्रत्यक्ष वापर होण्यासाठी विविध उपक्रम विद्यापीठाकडून सुरु करण्यात आले आहेत त्याचा उपयोग विद्यार्थ्यांनी करावा. क्रीडा व कला क्षेत्रातही आरोग्य शिक्षणातील विद्यार्थ्यांची संख्या वाढण्यासाठी महाविद्यालयांनी प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. यावेळी डॉ. मिलिंद निकुंभ, डॉ. राजेंद्र बंगाळ, डॉ. सचिन मुंबरे, डॉ. विठ्ठल धडके यांनीही मार्गदर्शन केले. विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. स्वप्नील तोरणे यांनी केले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी परीक्षा पध्दती, संशोधन, विद्यापीठाच्या विविध योजना आदींबाबत माजी कुलगरुंना प्रश्न विचारून संवाद साधला. उपस्थितांचे आभार डॉ. देवेंद्र पाटील मानले. कार्यक्रमाच्या प्रारंभी सहायक कुलसचिव संदीप राठोड यांनी विद्यापीठाच्या समर इंटर्नशिप प्रोग्राम विषयी माहिती दिली तसेच मेंटल प्रिपरेशन फॉर कॉन्सस्ट्रेशन विषयावर मानसी हिरे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास विद्यापीठाच्या प्राधिकरण सदस्य डॉ. दत्ता पाटील, विधी अधिकारी ॲड. संदीप कुलकर्णी, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी अविनाश सोनवणे, अर्जुन नागलोथ, कृष्णा भवर, सोहम वानेरे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात विविध महाविद्यालयातील पाचशे पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार**

आंतरराष्ट्रीय सार्क स्पर्धेकरीता निवड झालेली तसेच ३८ वा आतंरविद्यापीठ राष्ट्रीय युवा महोत्सव 'उत्सव-२०२५' मध्ये क्लासिकल इंन्स्ट्रुमेंट प्रकारात प्रथम पारितोषिक प्राप्त विद्यार्थीनी गुंजन शिरभाते तसेच असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीच्या राष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेत निवड झालेली ईश्वरी गानबोटे व विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेली तितिक्षा देशमुख यांचा माजी कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



## हिंदु मुस्लिम महिलांचा उद्या 'इफ्तार संवाद'

**▶▶ एशिअन सेंटर आणि गाजीउद्दीन अकादमीचा संयुक्त उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

परस्पर स्नेह आणि विश्वास वृद्धिंगत व्हावा या हेतूने एशिअन सेंटर आणि गाजीउद्दीन अकादमीच्यावतीने उद्या शनिवार दि. २२ मार्च २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मुस्लिम पाच्छा पेठ येथील सोशल हायस्कूलच्या प्रांगणात हिंदू मुस्लिम महिलांसाठी ''इफ्तार संवाद'' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मेराज आसिफ इकबाल यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात दिली आहे. या इफ्तार कार्यक्रमात डॉ. आसमा खान यांचे व्याख्यान होणार आहे.

यावेळी डॉ. अस्मिता बालगांवकर, स.पो.नि. ज्योत्सना भांबिष्ठे, शकुंतला सुर्यवंशी उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमास सोलापूरातील हिंदू मुस्लिम भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सरीता मोकाशी व महेजबीन सरफराज अहमद यांनी केले आहे.

## चंदेले महाविद्यालयाचे आजपासून सामाजिक शिबिर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

शहरात कार्यरत असलेले भाई छन्नुसिंह चंदेले समाजकार्य महाविद्यालयाचे सामाजिक शिबिर जुना विडी घरकुल येथे दि. २२ ते २६ मार्च २०२५ या कालावधीत होत आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष हेमु चंदेले यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. डॉ. रोजा चंदेले - पाराशर, रवींद्र मोकाशी, राहुलसिंह चंदेले, अँड सरिता मोकाशी, माजी नगरसेवक विठ्ठल कोटा, अरविंद मादास, अमृत दत्त चिनी, मुख्याध्यापक महादेव तोळनुरे, मुख्याध्यापक काकासाहेब गाढवे उपस्थित राहणार आहेत. युगंधर फाउंडेशनच्या अध्यक्षा प्रा. रेश्मा माने यांचे पर्यावरण संवर्धन काळाची गरज, फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर यांचे प्रकल्प अधिकारी वीरेंद्र परदेशी यांचे महिला स्वयंरोजगार मार्गदर्शन होणार आहे. क्षय विभाग महापालिकेचे डॉ. नीरज लांडगे यांचे क्षयरोग जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सोलापूर जिल्हा बार्टी प्रकल्प अधिकारी प्रणिता कांबळे यांच्या वतीने संविधान जनजागृती कार्यक्रम व समाज कल्याण विभागाच्या विविध योजना याविषयी मार्गदर्शन होणार आहे. या शिबिरादरम्यान सामाजिक सर्वेक्षण अंतर्गत विडी कामगारांचे आरोग्य समस्यांचे अध्ययन याबाबत सर्वेक्षण केले जाणार आहे. याचा या परिसरातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आव्हान प्रा. सिध्दार्थ गायकवाड यांनी केले आहे.

## बेशुध्दावस्थेत आढलेल्या व्यक्तीचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

तळेहिप्परगा येथील वासुदेव नगरात राहत्या घरात बेशुध्दावस्थेत आढळलेल्या व्यक्तीचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी रात्री ८.४५ वाजता उघडकीस आली.

नितीन दत्तात्रय माने-देशमुख (वय ४८) असे मृताचे नाव आहे. गुरुवारी रात्री ८.४५ च्या सुमारास नितीन हे राहत्या घरातील बेडरूममध्ये बेशुध्दावस्थेत आढळले. त्यांच्या गळ्यावर आणि उजव्या हाताच्या बगलेत रक्ताचे डाग दिसून आले.

बेशध्दावस्थेत जोडभावी पोलीस ठाण्यातील हवालदार दुधाळ यांनी उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु उपचारापूर्वीच ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## तोल जाऊन पडल्याने तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

राहत्या घराजवळ तोल जाऊन पडल्याने तरुण जखमी झाला.

हा प्रकार उत्तर सदर बझार परिसरातील लोधी गल्ली येथे गुरुवारी रात्री आठ वाजता घडला. प्रकाश प्रताप गुंगेवाले (वय ३२) असे जखमी तरुणाचे नाव आहे. गुरुवारी रात्री आठच्या सुमारास यातील जखमी हा राहत्या घराजवळ होता.

त्यावेळी अचानक तोल जाऊन तो पडल्याने त्याच्या डोकीला जखम झाली. त्यास अजय कय्यावाले याने रात्री ९ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# देशाच्या उज्वल भवितव्यासाठी युवकांनी काम करावे : कुलगुरू डॉ. महानवर

**सोलापूर विद्यापीठात राज्यस्तरीय युवा प्रेरणा शिबिराचा समारोप**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

आज जगासोबतच देशासमोर वाढते तापमान, ग्लोबल वॉर्मिंगची समस्या निर्माण झाली आहे. या समस्यांना सामोरे जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संवर्धनाची गरज आहे. पर्यावरण संतुलन राखणे महत्त्वाचे आहे, तरच देशाचे भवितव्य उज्वल असणार आहे. त्यासाठी युवकांनी काम करावे, असे आवाहन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.

शुक्रवारी, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमानेदि. १७ ते २१ मार्च २०२५ या कालावधीत विद्यापीठामध्ये आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय युवा नेतृत्व शिबिराचा समारोप कुलगुरू प्रा. डॉ. महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ख्यातनाम कवी प्रा. चंद्रशेखर मलकमपट्टे, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. केदारनाथ काळवणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय समन्वयक डॉ. वीरभद्र दंडे यांनी केले.

कुलगुरू प्रा. महानवर म्हणाले की, भारत हा तरुणांचा देश आहे. तरुणांच्या हाती देशाचे भवितव्य अवलंबून आहे. आज सोलापूर विद्यापीठात राज्यातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांचा युवा प्रेरणा शिबिर संपन्न झाला. यामध्ये तरुण-तरुणींना तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. विद्यापीठाच्या ग्रीनकॅम्पसमध्ये विद्यार्थ्यांनी पाच दिवस घालवले. जाताना येथील अनुभव घेऊन देशासाठी योगदान देण्याकरिता विद्यार्थ्यांनी सज्ज व्हावे, असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. प्रा. मलकमपट्टे यांनी विद्यार्थ्यांना स्वतःमध्ये नेतृत्व गुण विकसित करून आयुष्यात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. युवा प्रेरणा शिबिरामुळे विद्यार्थ्यांना करिअरसाठी निश्चितच फायदा होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात महाराष्ट्रातील विविध विद्यापीठातून एकूण २०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यावेळी सहभागी विद्यापीठे आणि स्वयंसेवकांना प्रमाणपत्राचे वाटप तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक, संघ व संघप्रमुख पुरस्काराचे वितरण करण्यात आले. अमरावती विद्यापीठास उत्तम व उत्कृष्ट संघाचा पुरस्कार प्राप्त झाला. सूत्रसंचालन डॉ. तेजस्विनी कांबळे व डॉ. अंबादास भास्के यांनी केले तर आभार डॉ. राजेंद्र वडजे यांनी मानले.



## जुना कारंबा नाका ते सम्राट चौक रस्ता करावा

**माजी गटनेते चंदनशिवे यांचे आयुक्तांना निवेदन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

सोलापूर महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी शिष्टमंडळासह भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले.

सोलापूर महानगरपालिका रोजंदारी बदली कामगार यांना सेवेत कायम करण्याचा प्रस्ताव तातडीने नगर विकास विभागाकडे पाठवावा. बुधवार पेठ परिसरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे नगरामधील स्वच्छतागृह बांधण्यात यावे. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत विकासाची कामे तातडीने हाती घ्यावी. सोलापूर शहरातील रमाई घरकुल आवास योजनेअंतर्गत वंचित लाभार्थ्यांसाठी तातडीने आवास मंजूर करावे.जुना कारंबा नाका ते सम्राट चौक नव्याने रस्ता करण्यात यावा. सोलापूर महानगरपालिका अंतर्गत लाड कमिटी योजना प्रभावीपणे व पारदर्शकपणे राबवावी आदी मागण्यांचे निवेदन दिले.

यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार, नगर अभियंता सारिका आकुलवार तसेच माजी नगरसेवक गणेश पुजारी, श्रीमंत जाधव, चंद्रकांत सोनवणे, अविनाश भडकुंबे, धीरज वाघमोडे, अजय इंगळे, आदित्य साबळे आदी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### सावरगाव येथे शेतीच्या वहिवाटीवरून एकास मारहाण

**सोलापूर,दि.२१ मार्च -**

शेतीच्या वहिवाटीवरून तुळजापूर तालुक्यातील सावरगाव येथे एकास मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुरुवारी रात्री ८ वाजता घडला. उमेश कोडिंबा फंड (वय ३६, रा. सावरगाव ता. तुळजापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. गुरुवारी रात्री उमेश हा स्वत:च्या शेतात काम करुत होता. त्यावेळी शेत वहिवाटीच्या कारणातून संभाजी फंड यासह इतर तीन जणांनी त्यास कु-हाड व लाकडाने मारहाण केल्याने ओठाला जखम झाली. तसेच सर्वांगास मुकामार लागल्याने सावरगाव येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून भाऊ शिवाजी फंड याने शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



### मिरीत शेतीच्या कारणातून वृध्दाला मारहाण

**सोलापूर, दि.२१ मार्च -**

मोहोळ तालुक्यातील मिरी येथे शेतीच्या कारणातून वृध्दाला मारहाण करण्यात आली. हा प्रकार गुरुवारी रात्री आठच्या सुमारास घडला. विश्वनाथ तात्यासाहेब पाटील (वय ५०, रा. मिरी ता.मोहोळ) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. विश्वनाथ हे गुरुवारी रात्री ७.३० वाजता मिरी गावातील घराजवळ होते. त्यावेळी तेथे हर्षवर्धन पाटील व इतर एकजण आला. त्या दोघांनी विश्वनाथ यांना शेतीच्या कारणावरून हाताने मारहाण केली. यात पाठ तसेच दोन्ही हाताला मार लागल्याने सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात स्वत: दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### रमजान महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात व्यापारी वर्गाला रात्री सूट द्यावी : शाब्दी

**सोलापूर, दि. २१ मार्च -**

एमआयएमचे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी ,कार्यकरते आणि पदाधिकारी पोलिस आयुक्त एम राज कुमार यांची भेट घेतली. रमजान महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात व्यापारी वर्गाला रात्री सूट द्यावी. सोलपुरात ऐतिहासिक असा मीना बाजार भरतो. आजुबाजूला असलेल्या दोन ते तीन जिलाह्यतुन खरेदीसाठी सोलापुरात दाखल होतात. मोठी उलढाल बाजारात होते. पोलिस प्रशासनाने सहकार्य केले तर व्यापार्याना व्यवसाय करता येईल अशी विनंती एमआयएम चे राज्य कार्यकारी अध्यक्ष फारूक शाब्दी यांनी केली आहे.

### सोरेगावला प्रांतपाल एम.जे.एफ. लायन मल्लीनाथ पाटील यांची भेट

**सोलापूर २१ मार्च-**

लायन्स इंन्टरनॅशनल अंतर्गत लायन्स क्लब ऑफ सोलापूर व्टिन सिटीला प्रांतपाल एम जे एफ अॅड. मल्लीनाथ पाटील यांची भेट झाली. सुरुवातीस क्लबचे अध्यक्ष लायन ज्ञानेश्वर कुलकर्णी यांनी घंटानाद केले. लायन मुकुंद जाधव यांनी ध्वजवंदन केले. यावेळी व्यासपीठावर प्रांतपाल लायन एम के पाटील, प्रांताचे प्रथम महिला लायन महानंदा पाटील, लायन ज्ञानेश्वर कुलकर्णी, झोन चेअरमन लायन सौ नंदिनी जाधव, सचिव लायन सोमशेखर भोगडे, खजिनदार लायन प्रभाकर जवळकर, प्रांतीय सचिव लायन डॉ अभिजित जोशी, प्रांतीय खजिनदार लायन महेश नळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सचिवांचा अहवाल लायन सोमशेखर भोगडे,तर हिशोबाचा अहवाल लायन प्रभाकर जवळकर यांनी सादर केला. यावेळी एल सी आय एफ, डि जी फंण्ड प्रांतपाल यांच्या कडे देण्यात आला. प्रमुख पाहुण्यांची ओळख झोन चेअरमन लायन सौ नंदिनी जाधव यांनी करून क्लबला शुभेच्छा दिल्या. प्रांतपाल लायन क्लबचे अध्यक्ष, सचिव, खजिनदार सर्व टीमचे कौतुक करून क्लबला शुभेच्छा दिल्या.



### वाचनाने वेगवेगळ्या लेखकांचे विषय व विचार समजतात : निलिमा क्षेत्रीय

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

वाचनाने वेगवेगळ्या लेखकांचे वेगवेगळे विषय व विचार समजतात. आज वाचन संस्कृती बंद होण्याच्या मुळात मोबाईल कारणीभूत आहे. आज मोबाईलने आपल्याला घेरलेले आहे. वाचन संस्कृती वाढल्यास संवेदनशीलता जपली जाईल व खऱ्या अर्थाने सुजाण नागरिक बनण्याकडे आपला प्रवास सुरू होईल, असा विश्वास नामवंत लेखिका नीलिमा क्षत्रीय(संगमनेर) यांनी केले. येथील दयानंद काशिनाथ आसावा प्रशालेत लेखिका विद्यार्थ्यांच्या भेटीला या उपक्रमाअंतर्गत नीलिमा क्षत्रीय यांनी प्रशालेस भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र पवार हे होते. यावेळी व्यासपीठावर पर्यवेक्षक संतोष हंपे, शशिकांत मोरे,सुनिता गवळी उपस्थित होते. निबंध कसा लिहावा यावर बोलताना त्या म्हणाल्या, आपण एखादी घटना ऐकतो. ती ऐकलेली घटना दुसऱ्याला सांगताना त्याला मीठ मसाला लावून सांगतो. त्याप्रमाणेच निबंधाचे देखील आहे. आपल्याकडे मटेरियल कमी असले तरी उपलब्ध मटेरियल सजविण्याची कला अंगी हवी. लिहिण्याचा प्रयत्न केल्यास नक्कीच नवीन लेखक आपल्यातून तयार होतील.लिहायचे म्हटले की वाचणे महत्त्वाचे असते. आज कुठेच संवेदना दिसत नाही याबद्दल खंत व्यक्त करून त्या म्हणाल्या, वाचन संस्कृती वाढीस लागली तर संवेदनशीलता जपण्यास मदत होईल व खऱ्या अर्थाने आपला सुजाण नागरिक बनण्याचा प्रवास सुरू होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याच कार्यक्रमात जिल्हा ग्रंथालय संघाचा उत्कृष्ट वाचक पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रशालेतील शिक्षक शशिकांत मोरे यांचा नीलिमा क्षत्रीय यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जितेंद्र पवार यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास खवेकर यांनी केले.लेखिकेचा परिचय संतोष हंपे यांनी करून दिला.सुनिता गवळी यांनी प्रास्ताविक केले.स्मिता हुमनाबादकर यांनी आभार मानले.

## सोलापूर विद्यापीठाचा प्रताप

# कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांच्या नियमाबाह्य नियुक्त्या

### कुलगुरू व प्र. कुलगुरू निवड समितीचे अध्यक्ष असताना नियमांची पायमल्ली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ मार्च-**

संलग्न महाविद्यालयात तासिका तत्वावरील अथवा एक वर्षाच्या कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकास मान्यता देताना नियमाचे पालन केल्याशिवाय विद्यापीठाचा शिक्षक मान्यता विभाग नियुक्तीला मान्यता देत नाही. परंतु पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात मात्र कंत्राटी सहाय्यक प्राध्यापकांची भरती करताना हा विभाग विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्देशीत केलेले पात्रतेचे निकष दुर्लक्षित करत असल्याचे उघडकीस आले आहे. विद्यापीठाच्या विविध ११ पैकी १० संकुलात यंदाच्या शैक्षणिक वर्षात निवड समितीने सहाय्यक प्राध्यापकपदी काही अपात्र उमेदवार नियुक्त केले आहेत. अलाईड हेल्थ सायन्स या एकमेव अभ्यासक्रमास पात्र उमेदवार भरले आहेत.

नुकत्याच झालेल्या विद्यापीठाच्या अधिसभेत यासंदर्भात विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात कंत्राटी प्राध्यापकांच्या नियमबाह्य नियुक्ती केल्याचा प्रश्न अधिसभा सदस्य रोहिनी तडवळकर यांनी उपस्थित केला. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समाधान पवार यांनी अधिसभेत असा धक्कादायक खुलासा केला होता की, २०२४-२५ या वर्षात विद्यापीठाच्या सर्वच संकुलात अश्या नियमबाह्य नियुक्त झाल्या आहेत. या प्रकाराची त्यांनी उघडपणे कबुली दिली. यात संचालकांच्या मर्जीतील, विद्यापीठाच्या अधिकारी, कर्मचारी यांचे नातेवाईक, मागील वर्षी सेवेत होते या कारणावरून या अपात्र सहाय्यक प्राध्यापकांच्या नियुक्ती झाल्या असल्याचा धक्कादायक खुलासा केला होता. स्वत: कुलगुरू यांनीच अधिसभेत माझ्याकडे शिकत असेलेली पीएचडीच्या विद्यार्थीनीची नियुक्ती केल्याची कबुली दिली होती. हा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्यानंतर या संदर्भात समिती गठीत करण्याचे आश्वासन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी अधिसभेस दिलेले आहे. परंतु पर्यावरण शास्त्र विभागातील नियुक्ती संदर्भात अन्याय झाला म्हणून सप्टेंबर महिन्यात अक्षय चव्हाण याने मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांच्याकडे तक्रार केली होती. डिसेंबरमध्ये गठित केलेल्या समितीचा अहवाल अजून प्रतिक्षेत असताना परत या अधिसभेत कुलगुरुंनी समिती गठीत करण्याचे जाहीर केले. परंतु समिती गठीत करून अहवाल येईपर्यंत संबंधित प्राध्यापकांची नियुक्त एप्रिलला संपते. त्यामुळे प्राध्यापकांवर कारवाई करण्यापेक्षा या समितीवरच कारवाई करावी, ही अधिसभेची मागणी मात्र, कुलगुरूंनी मान्य केली नाही. त्यामुळे विद्यापीठाच्या एकूणच कारभारावर संशय व्यक्त केला जात आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
।। विद्यया संपन्नता ।।

### भूशास्त्र संकुलात ६ अपात्र

पर्यावरण शास्त्र विभागातील भूशास्त्र संकुलात ७ पैकी ६ अपात्र उमेदवार भरले आहेत. विशेष म्हणजे यात ३ पात्र उमेदवार असताना त्यांना डावलून हे उमेदवार भरले आहेत. या विभागाचे संचालक विनायक धुळप यांनी त्यांच्या मर्जीतील उमेदवार घेण्यासाठी गेल्या काही वर्षात ७ ते ८ पात्र सहाय्यक प्राध्यापकांना डावलले असल्याचा आरोप डावलेल्या ३ उमेदवारांचा आहे. याच विभागातील डावललेला उमेदवार अक्षय सतीश चव्हाण याने अन्याय झाल्यासंदर्भात सप्टेंबर २०२४ मध्ये मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांच्याकडे तक्रार केल्यानंतर डिसेंबर २०२४मध्ये गठित केलेल्या समितीचा अहवाल अजूनही प्रतिक्षेत आहे.

### या कारणामुळे पात्र प्राध्यापकांची नियुक्ती होत नाही : प्र. कुलगुरू

विद्यापीठाच्या संकुलात भरती करताना कुलगुरू व प्र. कुलगुरू हे या निवड समितीचे अध्यक्ष असतात. यासंदर्भात प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, विद्यापीठ संकुलात चालविण्यात येणारे विनाअनुदानित अभ्यासक्रम हे विद्यापीठाच्या निधीतून चालविले जातात. त्यात एखाद्या विषयामध्ये स्पेशलायझेशनकरिता जर प्राध्यापक पात्र संवर्गात उपस्थित नसतील तर त्याचा मागील अध्यापनाचा अनुभव व विद्यापीठास शिकविण्याकरिता लागणाऱ्या स्पेशलायझेशन मध्ये त्यांचे पदव्युत्तर शिक्षण असेल तर मासिक २५ हजार रुपयांवर तर पात्र उमेदवारांना ३० हजारावर रुपयांवर नियुक्त केले जाते. काही अभ्यासक्रमात अनेक विषय शिकविले जातात. तेव्हा त्या अभ्यासक्रमासाठी वेगवेगळ्या विषयाचे प्राध्यापक नियुक्तीमुळे पात्र प्राध्यापकाची नियुक्ती होत नाही.

### विद्यापरिषदेत समिती नियुक्ती

सर्वच महाविद्यालयांना नॅक बंधनकारक आहे. परंतु काही महाविद्यालये याचे पालन करीत नाही. या संदर्भात तसेच या महाविद्यालयात सीएचबी अथवा कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करताना काय धोरण असावे. यासाठी विद्यापरिषदेच्या मागील बैठकीत एक समिती गठीत केली आहे. या समितीचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. यात या संलग्न आणि विद्यापीठातील विनाअनुदानीत संकुलातील प्राध्यापक भरतीचे धोरण ठरेल, असे या समितीतील सदस्यांनी सांगितले.

### पदव्युत्तर विद्यार्थ्यांना पदव्युत्तरच शिक्षक शिकवितात

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शन सूचनेनुसार ज्या विषयातून नेट, सेट, गेट व पीएचडीची परीक्षा होत नाही. त्याच अभ्यासक्रमासाठी सहाय्यक प्राध्यापकांची नियुक्ती करताना नियुक्तीतून सूट आहे. माहिती अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार विद्यापीठातील १० संकुलात नेट, सेट, गेट व पीएचडी नसलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमास पदव्युत्तर प्राध्यापकांची नियुक्ती झाली आहे. **ते संकुल व प्राध्यापकांची संख्या अशी :** भूशास्त्र : ६, पदार्थविज्ञान -१, रसायनशास्त्र : २, संगणकशास्त्र : ९, वाणिज्य व्यस्थापन : १, ललित कला : ४, भाषा (प्राकृत) : २. लाईफ सायन्स : १.


# महापालिका निवडणुकाही महायुती एकत्र लढणार : देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २१ मार्च-**

मुंबई महानगरपालिकेसह राज्यात ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे, त्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढविणार आहोत असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी स्पष्ट केले.

एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी महायुती व आगामी राजकारणा संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली भविष्यात उद्धव ठाकरे यांच्या समवेत युती करणार नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.महायुतीचा कारभार एकमताने व सहमतीने सुरू असल्याचे सांगून ते म्हणाले की किरकोळ मतभेद असू शकतात मात्र राज्याच्या विकासासाठी आम्ही सर्वजण एकत्रपणे काम करत आहोत मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी त्यांनी पक्ष नक्कीच एकत्रपणे लढतील त्याचबरोबर अन्य जिल्ह्यातील ज्या ज्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये शक्य आहे, तेथेही महायुती म्हणून निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. राज ठाकरे आपले मित्र असले तरी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत त्यांना सोबत घेण्याबाबत अद्याप निर्णय झालेला नाही त्या त्यावेळी त्याबाबत ठरवण्यात येईल, असे स्पष्ट करून ते म्हणाले की, ठाकरेंच्यासंबंधात आजतरी निर्णय झालेला नाही. त्यांचा निर्णय ते घेत असतात. त्या त्यावेळी विचार केला जाईल,

तुमचे लाडके उपमुख्यमंत्री कोण?, यावर फडणवीस म्हणाले की,दोघेही माझे लाडके आहेत आणि मी पण त्यांचा लाडका आहे. त्यामुळे आम्ही लाडके उपमुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री आहोत. नाराजीनाट्य वैगरे कोणीच करत नाही. अलीकडच्या काळामुळे, सोशल मीडियामुळे कोणत्याही गोष्टीला कसेही सांगितले जाते. माझा अनुभव असा आहे की, अजितदादा असो की एकनाथ शिंदे, दोघांचीही नाराजीनाट्य नाही. काही प्रश्न असतात, ते आम्ही एकत्र येऊन सोडवतो. एकनाथ शिंदे शिवसैनिक आहेत आणि शिवसैनिक हा भावनिक असतो. त्यामुळे एकनाथ शिंदे भावनिक आहेत. तर अजितदादा कामाच्या बाबतीत प्रॅक्टिकल आहेत, असे सांगून लाडके ठाकरे कोण? या प्रश्नावर त्यांनी ठाकरे असे आहेत की, त्यांना आपण लाडकं म्हणायचे आणि त्यांनी आपल्याला दोडके म्हणायचे. त्यामुळे यामध्ये आपण का पडायचे, पण एक खरं सांगतो, गेल्या ५ वर्षांमध्ये माझा उद्धव ठाकरेंसोबत काहीच संबंध राहिलेला नाही, माझा राज ठाकरेंसोबतच संबंध राहिलाय. उद्धव ठाकरेंनी संबंध तोडून टाकले, म्हणजे मारामारी नाही.



### म्हणून धनंजय मुंडेंचा राजीनामा

धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला, याचा एकमेव कारण असा आहे की, या संपूर्ण प्रकरणांमध्ये ज्याला मुख्य आरोपी केलेला आहे तो वाल्मिक कराड हा धनंजय मुंडे यांचा राईट हॅन्ड आहे. वर्षानुवर्ष धनंजय मुंडे यांचे राजकारण त्यांनी सांभाळलेला आहे आणि म्हणून सहाजिक महाराष्ट्रातल्या जनतेची अपेक्षा होती की अशा प्रकारे जर नेत्यांच्या जवळचे लोक इतका क्रूर अशा प्रकारचा काम करत असतील तर नेत्यांनी काही ना काही तरी पश्चाताप म्हणून किंवा ज्याला आपण असं म्हणू शकतो. नैतिकतेच्या आधारावर अशा प्रकारचा निर्णय घेतला पाहिजे नंतर किंवा चर्चेत गेल्यानंतर दोन गोष्टी क्लियर झाल्या. एक चर्चेतमध्ये धनंजय मुंडेंचं नाव नाही आणि दोन वाल्मिक कराड हा मुख्य आरोपी आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# सोमनाथ सुर्यवंशीच्या मृत्यूस जबाबदार पोलिसांना बडतर्फ कधी करणार?

### हर्षवर्धन सपकाळ यांचा प्रश्न

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.२१ मार्च-**

परभणीतील आंबेडकरी विचारांचा सुशिक्षित तरुण सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीसांच्या मारहाणीमुळे झाला असताना त्याची आकस्मित मृत्यू अशी नोंद करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. आता न्यायदंडाधिकारी यांच्या अहवालातही सुर्यवंशी यांचा मृत्यू मारहणीमुळेच झाल्याचे उघड झाले असून फडणवीस सरकार जागे होऊन संबंधित पोलिसांवर हत्येचे गुन्हे दाखल करून त्यांना बडतर्फ करणार आहे?, का असा संतप्त सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विचारला आहे.



यासंदर्भात प्रतिक्रिया देताना ते म्हणाले की, परभणीची घटना अत्यंत गंभीर व माणूसकीला काळीमा फासणारी आहे. परभणीत संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाल्याचे प्रकरण पोलीसांना व्यवस्थित हाताळता आले नाही. शहरात शांततेने आंदोलन सुरु असताना पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला, त्यात अनेकांना जबर मारहाण झाली, अनेकांना जेलमध्ये टाकले. यावेळी सोमनाथ सुर्यवंशी यांनाही अटक करुन त्यांना बेदम मारहाण करण्यात आली व त्यातच त्यांचा मृत्यू झाला पण सरकारने हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशानात सोमनाथ सुर्यवंशी यांचा मृत्यू दम्याच्या आजाराने झाल्याची चुकीची माहिती देऊन दिशाभूल केली.परभणीमध्ये कोंबिंग ऑपरेशन व लाठीचार्ज करण्याचा आदेश कोणी दिला. मंत्रालयातून दिला, का पोलीस महासंचालक कार्यालयातून दिला याची चौकशी झाली पाहिजे. गृहमंत्री व मुख्यमंत्री नात्याने फडणवीस हे परभणीचे प्रकरण हाताळण्यात सपशेल फेल झाले आहेत. एका दलित तरुणाचा पोलिस मारहाणीत मृत्यू होतो पण सरकार त्याकडे गांभिर्याने पहात नाही यातून भाजपा युतीचे सरकार दलित विरोधी आहे हे स्पष्ट दिसते. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुलजी गांधी यांनी या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन परभणीला येऊन सुर्यवंशी यांच्या कुटुंबाचे सांत्वन केले व न्याय मिळवून देण्याचे आश्वासन दिले आहे. काँग्रेस पक्ष सुर्यवंशी यांच्या कुटुंबाला न्याय मिळेपर्यंत या प्रकरणाचा पाठपुरावा करेल, असेही सपकाळ यांनी सांगितले.

# आग्र्यात छत्रपती शिवाजी महाराज स्मारक जबाबदारी पर्यटन विभागाकडे

### तज्ज्ञांची समिती स्थापन होणार

### मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेची तात्काळ अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि. २१मार्च-**

आग्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक उभारणीची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंती दिनी केली होती. या स्मारकाच्या उभारणीसाठी कार्यान्वयीन व निधीची जबाबदारी राज्याच्या पर्यटन विभागाकडे देण्यात आली असून. याबाबतचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला आहे.

स्मारक उभारणीसाठी पर्यटन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली इतिहास तज्ज्ञ तसेच जाणकार, तज्ज्ञांची समिती स्वतंत्रपणे स्थापन करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी निधी उपलब्धता, जमीन अधिग्रहण व अनुषंगिक बाबींकरिता पर्यटन विभागाला जबाबदारी देण्यात आली आहे. या विभागातंर्गत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून काम पाहणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांची आग्र्यातून सुटका आणि महाराजांच्या पराक्रमाच्या गौरवगाथेचे स्मरण पुढील पिढ्यांसाठी करून देण्यासाठी हे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. आग्रा येथील ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत होते, ती जागा-वास्तू महाराष्ट्र शासन या प्रकल्पात अधिग्रहीत करणार आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक निर्माण करण्यात येणार आहे. या शौर्य स्मारकामध्ये महाराजांचा जाज्वल्य इतिहास मांडला जाणार आहे. त्यासाठी अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे उपक्रम संग्रहालय, दृकश्राव्य कार्यक्रम, माहितीपट आदी राबविण्यात येणार आहेत. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज आणि बाळराजे शंभुराजे यांना मावळ्यासह मुघलशाहीने कपटाने नजरकैदेत ठेवले होते. परंतु आपल्या चातुर्याने आणि पराक्रमाने महाराजांनी नजरकैदेतून स्वत:सह शंभुराजे आणि सर्व मावळ्यांची सुटका करून घेतली. या ऐतिहासिक घटनेबाबात मराठीच नव्हे तर इतिहासप्रेमींत औत्सुक्य असते. आग्रा येथे ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज नजरकैदेत राहीले तेथे आवर्जून जाण्याचा प्रयत्न पर्यटक करतात, मात्र याठिकाणी कोणतीही ऐतिहासिक बाब, स्मारक, संग्रहालय नसल्याने या पर्यटकांपर्यंत हा जाज्वल्य इतिहास पोहचत नाही. महाराष्ट्राच्या बाहेर अशा प्रकारचा अत्यंत दुर्मिळ असा केलेला पराक्रम ही इतिहासातील अत्यंत महनीय आणि अभ्यासपूर्ण बाब आहे. तो वारसा पुढच्या पिढ्यांकडे कायम रहावा, त्याचे जतन, सवंर्धन आणि विकास करण्याकरिता शासनाने इतर राज्यातील अशी स्थळे सुध्दा विकसित करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे.



# राज्य शासनाचे सर्वोत्तम काम बँकांसाठी आश्वासक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२१मार्च -**

महाराष्ट्र प्रगतीशील राज्य असून राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी सर्व बँकाचे सहकार्य नेहमीच मिळत आले आहे.समृध्दी महामार्गाच्या यशस्वी कामामुळे आज अनेक बँका राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांना कर्ज देण्यासाठी पुढे येत आहेत.राज्य शासनाचे सर्वोत्तम काम हीच सर्वात मोठी आश्वासक बाब आहे.महाराष्ट्र शासन बँकासाठी आश्वासक ठरत असून बँकाकडून राज्य शासनाला यापुढे असेच सर्वोत्तम सहकार्य मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

विधानभवन येथे महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, मुख्यमंत्री कार्यालयाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव रस्ते सदाशिव साळुंखे, महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक ब्रिजेश दीक्षित, हुडकोचे व्यवस्थापकीय संचालक संजय कुलक्षेत्र, आय. आय. एफ. सी. एल. (इंडियन इन्फ्रास्ट्रक्चर फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड) चे मुख्य प्रबंधक राजकुमार राल्हन, कॅनरा बँकेचे महाप्रबंधक अलोक कुमार अग्रवाल, पंजाब नॅशनल बँकेचे जनरल मॅनेजर एस राजगुरू, युको बँकेचे कार्यकारी संचालक नितीन बोडके, बँक ऑफ महाराष्ट्राचे जनरल मॅनेजर अमित कुमार शर्मा, नाफेडचे उपाध्यक्ष हर्षल महावरकर, पंजाब अँड सिंध बँकेचे मुख्य महाप्रबंधक विनोद कुमार पांडे, एस. बी. आय. कॅपिटल लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष असित रंजन सिकंदर विविध बँकाचे अधिकारी उपस्थित होते.

## अग्रलेख...

# नक्षलवादावर आता शेवटचा घाव आवश्यक

दहशतवाद आणि नक्षलवाद या देशाला भेडसावणाऱ्या दोन मोठ्या समस्या आहेत. यातील दहशतवादाची समस्या पूर्णपणे संपुष्टात आली नसली तरी बऱ्यापैकी नियंत्रणात आली आहे. मात्र नक्षलवादाची समस्या अजूनही अधूनमधून तोंड वर काढत आहे. हे सर्व आठवण्याचे कारण म्हणजे छत्तीसगडच्या बिजापूर आणि कांकेर जिल्ह्यांतील दोन वेगवेगळ्या चकमकींमध्ये सुरक्षा दलांनी ३० नक्षलवाद्यांचा खात्मा केला. बिजापुरात मोठ्या कारवाईत २६ नक्षलवादी मारले गेले, तर कांकेरमध्ये चार. सुरक्षा दलांची ही मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. केंद्र आणि राज्य सरकारच्या सुरक्षा दलांनी समन्वय साधून कारवाई केली तर काय होऊ शकते, त्याचे ही घटना द्योतक म्हणायला पाहिजे. नक्षलवाद आणि दहशतवाद या दोन समस्यांत एक मोठा मूलभूत फरक आहे. नक्षलवादाची समस्या देशातील अंतर्गत समस्या आहे, तर दहशतवादाची समस्या देशाबाहेरील शक्तींनी निर्माण केलेली समस्या म्हटली पाहिजे. या दोन्ही समस्यांमधील साम्य म्हणजे या दोन्ही समस्या देशविरोधी शक्तींनी निर्माण केलेल्या आहेत. देशात राहून देशातील नागरिक आणि सरकारविरोधात लढणाऱ्या नक्षलवाद्यांना देशाबाहेरील शक्तींची मदत आणि सक्रिय पाठिंबा मिळत असतो. दहशतवादाची समस्या देशाबाहेरील शक्तींनी निर्माण केलेली असली तरी त्यासाठी देशांतर्गत काही असामाजिक आणि राष्ट्रविरोधी शक्तींना हाताशी धरले जाते. १९८० च्या दशकात पंजाबमध्ये दहशतवादाची समस्या अतिशय उग्र होती. मात्र नंतर या समस्येला आळा घालण्यात पंजाब तसेच केंद्र सरकारला यश आले, याचे श्रेय राज्यकर्त्यांसोबत ज्युलियो रिबेरो आणि के.पी.एस. गिल यासारख्या धाडसी पोलिस अधिकाऱ्यांना द्यायला पाहिजे. जम्मू-काश्मिरातील दहशतवादाची समस्या त्या राज्याला विशेष दर्जा देणारे घटनेतील ३५ ए आणि ३७० कलम निष्प्रभ केल्यानंतर आता पहिलेसारखी तीव्र राहिली नाही. त्या राज्यातील दहशतवादाची समस्या जवळपास संपुष्टात आली असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. ३७० कलम निष्प्रभ होण्याच्या आधी राजधानी श्रीनगरमधील लालचौकात तिरंगा फडकवण्याचीही कोणाची हिंमत होत नव्हती. आता मात्र या लाल चौकात तिरंगा डौलाने आणि अभिमानाने फडकत असतो. याचे श्रेय त्या राज्यातील दहशतवादाची समस्या सोडवणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या पोलादी तसेच दूरदृष्टीच्या नेतृत्वाला द्यावे लागेल.

दहशतवादाच्या समस्येचे यशस्वीपणे निर्दालन केल्यानंतर मोदी सरकारने आपले पूर्ण लक्ष्य आता नक्षलवादाच्या समस्येकडे वळवले आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातील नक्षलवादाच्या समस्येचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी व्यक्त केला आहे. मोदी सरकारच्या या पोकळ घोषणा नाहीत, मोदी यांचे सरकार जे म्हणते ते करून दाखवते. आतापर्यंत ज्या ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या, त्या मोदी सरकारने करून दाखवल्या आहेत, अशा घटनांची यादी खूप मोठी आहे. त्यामुळे २०२६ मध्ये नक्षलवादाची समस्या संपली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. अमित शाह यांची घोषणा म्हणजे फक्त बोलाची कढी आणि बोलाचाच भात नाही, तर त्यामागे दहा वर्षांची मेहनत आणि नियोजन आहे. देशातील नक्षलवादाच्या समस्येचा आढावा आपल्याला दोन टप्प्यांत घ्यावा लागेल. पहिला टप्पा हा २००४ ते २०१४ तर दुसरा टप्पा हा २०१४ ते २०२४ असा आहे. २००४ ते २०१४ या काळात संपुआचे सरकार होते आणि डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान होते. २०१४ नंतर दुसऱ्या टप्प्यात देशात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात रालोआचे सरकार आले. मोदी सरकारने ठरवून देशातील नक्षल समस्या आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले, त्याला आता यश येत आहे. २००४ ते २०१४ या दहा वर्षांत देशातील विविध राज्यांत नक्षली हिंसाचाराच्या १६४४३ घटना घडल्या, याउलट २०१४ ते २०२४ या दहा वर्षांत देशातील नक्षली हिंसाचाराच्या घटनांत मोठ्या प्रमाणात घट झाली. या दहा वर्षांत नक्षली हिंसाचाराच्या ७७४४ घटना घडल्या. नक्षल्यांच्या हिंसाचारात बळी पडणाऱ्या सुरक्षा दलांच्या जवानांची संख्या १८५१ वरून ५०९ पर्यंत खाली आली. नक्षली हल्ल्यात बळी पडलेल्या नागरिकांच्या संख्येतही ४७६६ वरून ११९५ अशी लक्षणीय घट झाली. हे सगळे सहजपणे झाले नाही, तर यामागे केंद्र सरकारचे संघटित आणि नियोजनबद्ध प्रयत्न होते. संपुआ सरकारच्या दहा वर्षांत देशातील नक्षलप्रभावित जिल्ह्यांची संख्या १२६ होती. मोदी सरकारच्या कार्यकाळात ही संख्या १२ पर्यंत खाली आली. केंद्र आणि नक्षलप्रभावित राज्य सरकारांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे हे शक्य झाले. अमित शाह यांनी गृहमंत्री झाल्यानंतर नक्षलवादी हिंसाचाराबाबत झीरो टॉलरन्सची भूमिका घेतली. नक्षली हिंसाचार खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा शाह यांनी वारंवार नक्षलप्रभावित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या बैठकीत दिला. नक्षल हिंसाचाराबाबत शाह यांनी नक्षलप्रभावित राज्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत अनेक बैठकी घेतल्या, त्याला आलेले हे यश म्हटले पाहिजे. नक्षली हिंसाचाराबाबत मोदी सरकार जितके गंभीर आहे, तेवढे काँग्रेसचे सरकार कधी दिसले नाही. खरं म्हणजे नक्षली हिंसाचाराचा जेवढा फटका काँग्रेसला बसला तेवढा खचीतच दुसऱ्या कोणत्या राजकीय पक्षाला बसला असेल. छत्तीसगडमध्ये काँग्रेसचे सरकार असताना काँग्रेसच्या मंत्र्यासह अनेक काँग्रेस नेत्यांच्या वाहनांच्या ताफ्यावर नक्षलवाद्यांनी हल्ला केला होता, त्यात अनेक काँग्रेसनेते मारले गेले होते. माजी केंद्रीय मंत्र्यांसह अनेक आजीमाजी आमदार आणि खासदार यांचे डोळे या नक्षल्यांच्या हिंसाचारात मिटले तरीसुद्धा राज्यातील काँग्रेस सरकारचे डोळे उघडले नाही. या घटनेबद्दल राज्यातील तत्कालीन काँग्रेस सरकारमधील काही नेत्यांची भूमिका बरेच झाले, सुंठेवाचून खोकला गेला, अशी असावी, असे जाणवत होते, या घटनेचा फायदा उचलत काँग्रेसने देशातील नक्षल्यांचा हैदोस आणि नंगानाच संपवायला पाहिजे होता. पण तसे झाल्याचे जाणवले नाही. नक्षली हिंसाचाराच्या मुद्यावर भाजपाचे सरकार जेवढे गंभीर होते, तेवढे काँग्रेसचे सरकार कधीच दिसले नाही. नक्षलवाद असो की दहशतवाद या दोन्ही समस्यांची सर्वांत जास्त झळ काँग्रेसलाच पोहोचली होती. पण दोन्ही मुद्यावर काँग्रेस सरकारची भूमिका नेहमीच धरसोडीची राहिली. नक्षलवादामागे एक विचारधारा असल्याचे सांगितले जाते. समाजातील पीडित, शोषित आणि आदिवासी वर्गातील लोकांना न्याय देण्यासाठी आपण लढतो, असा आव कथित नक्षलवादी आणत असले तरी त्यात काही अर्थ नाही. नक्षलवादामुळे आदिवासी जनतेचा आतापर्यंत काहीच फायदा झाला नाही, उलट नुकसानच झाले आहे. पोलिस आणि नक्षलवादी या दोन्हीकडून आदिवासी भरडले जातात. आदिवासी नक्षलवाद्यांना आश्रय आणि शरण देतात म्हणून पोलिस त्यांचा छळ करतात, त्यांच्यावर अन्याय अत्याचार करतात, तर दुसरीकडे आदिवासी पोलिसांचे खबरे असल्याच्या संशयातून नक्षलवादी त्यांचा छळ करतात. त्यामुळे आदिवासींची स्थिती ही अडकित्त्यातील सुपारीसारखी असते. मोदी सरकारने नक्षलवादामागील आर्थिक आणि सामाजिक कारणांचा शोध घेण्याची गरज आहे. आदिवासी लोकांना शिक्षण देण्यासोबत त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे नक्षलभागाचा विकास केला पाहिजे. देशातील जो दुर्गम भाग विकासापासून वंचित आहे, त्या त्या भागातच नक्षलवादाची समस्या सर्वांत जास्त आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. शिक्षण आणि रोजगार मिळाल्यानंतर आदिवासी आपोआपच नक्षलवाद्यांपासून दूर जातील, त्यांची साथ सोडतील. नक्षलवाद्यांना देशाच्या बाहेरून मिळणारी आर्थिक आणि अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची मदत थांबवली पाहिजे. त्याचप्रमाणे शहरी नक्षल्यांचेही कंबरडे मोडले पाहिजे. शहरी भागातून तसेच विदेशातून नक्षल्यांना मिळणारी रसद रोखली तर नक्षलवादी जंगलात जास्त दिवस लपून राहू शकणार नाही. मोदी सरकारने नक्षल्यांची अशी कोंडी सुरू केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून नक्षल्यांना आपल्या बिळातून बाहेर यावे लागेल आणि अमित शाह यांनी म्हटल्याप्रमाणे मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद संपला तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. तसाही नक्षलवाद आता शेवटचे आचके देत आहे. ▮

## यंगिस्तान

# दिशा, सुशांतला कुणी न्याय देता का न्याय?

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

कोरोना काळ हा जगासाठी वाईट होता. पण त्याहून अधिक वाईट होता महाराष्ट्रासाठी. या कोरोना काळात महाराष्ट्रीयन लोकांना केवळ संसर्गाचा त्रास झाला नाही तर राजकीय गुंडगिरीचाही त्रास झाला. त्याकाळी समोर आलेल्या घटना या महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणाऱ्या नाहीत. तत्कालीन सरकारवर टीका करणाऱ्यांना राजकीय गुंडांनी प्रचंड त्रास दिला. सुशांत सिंह, दिशा सालियान मृत्यू, मनसुख हिरेन हत्याकांड, १०० कोटींची खंडणी, पालघर साधू हत्याकांड, अर्णब गोस्वामी अटक, अनंत करमुसे या तरुणाचे अपहरण करून मारहाण इ. सर्व गोष्टी त्या काळात घडत होत्या. सत्ता कशी राबवू नये आणि मुख्यमंत्री कसा नसावा याचा एक आदर्श तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी निर्माण केला होता. आणि त्याविरुद्ध बोलणाऱ्यांना राजकीय गुंडांनी सळो की पळो करून सोडलं. छत्रपती शिवरायांच्या महाराष्ट्रात तर औरंगजेबाचे गुणगान गाणारे लोक राहतात. असो! या सर्व गोष्टी आठवण्याचं कारण म्हणजे कोरोना काळात दिशा सालियान आणि सुशांत सिंह राजपूत यांच्या मृत्यूमुळे प्रचंड खळबळ उडाली होती आणि आता चार-साडेचार वर्षांनंतर दिशा सालियानचे वडील मैदानात उतरले आहेत. त्यांनी कोर्टात याचिका दाखल करून आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले आहेत.

ज्यावेळी हे प्रकरण घडले तेव्हा ही आत्महत्या आहे की खून यावर प्रश्न उपस्थित केले गेले. खरंतर दिशा सालियानचा मृत्यू झाला तेव्हा लोकांमध्ये फारशी चर्चा रंगली नव्हती. पण सुशांत सिंहचा मृत्यू झाल्यानंतर मात्र लोकांमध्ये सशयाचं वातावरण निर्माण झालं. कारण दिशा ही सुशांतची मॅनेजर होती. ५ दिवसांच्या अंतराने दोघांनी आत्महत्या कशी केली हा पहिला संशय निर्माण झाला आणि एकच गदारोळ माजला. अर्णब गोस्वामी यांनी हा आणि असे अनेक मुद्दे लावून धरले आणि तत्कालीन उद्धव ठाकरे यांचा राग त्यांनी ओढवून घेतला. त्यामुळे अर्णब यांना अतिरेक्यासारखी वागणूक देऊन त्यांना तुरुंगात टाकण्यात आलं. नितेश राणे यांनीही हा मुद्दा लावून धरला होता. म्हणून नारायण राणेंना भरल्या ताटावरून उचलण्यात आलं. सत्ता किती गलिच्छ पद्धतीने राबवता येते याचं उत्तम उदाहरण म्हणजे उद्धव ठाकरे. मात्र दुर्दैव असे की हिंदूंना आदरस्थानी असलेल्या हिंदुहृदयसम्राट माननीय बाळासाहेब ठाकरे यांचे ते सुपुत्र आहेत. पुन्हा असो!




तर या प्रकरणामध्ये आदित्य ठाकरे यांचे नाव घेण्यात आले. परंतु हे केवळ आरोप होते. सोशल मीडिया, मुख्य मीडिया, सामाजिक कार्यकर्ते आणि काही नेते मंडळींनी हे आरोप केले. हे आरोप राजकीय स्वार्थापोटी होत आहेत असा प्रतिआरोप ठाकरे यांच्याकडून करण्यात आला. या प्रकरणाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न जसा रिपब्लिक भारतने केला तसाच नीलेश ओझा, राशिद खान पठाण यांच्यासारख्या अनेकांनी केला. मात्र मराठी सोशल मीडियाचा चेहरा बदलून टाकणाऱ्या दोन व्यक्तींचा उल्लेख इथे करावा लागेल. भाऊ तोरसेकर आणि प्रभाकर सूर्यवंशी. भाऊ तोरसेकर यांनी अनेक विश्लेषणात्मक व्हिडीओ बनवले. प्रभाकर सूर्यवंशी तर एक पाऊल पुढे जात त्यांनी अनेक मुद्दे मांडले. या प्रकरणाची सखोल माहिती त्यांनी जनतेपर्यंत पोहोचवली. 'सुप्रीम कोर्ट आणि उच्च न्यायालय लिटिगंट्स असोसिएशन'चे अध्यक्ष राशिद खान पठाण यांनी जनहित याचिका दाखल केली. याचिकेत असे नमूद केले आहे की दिशा सालियानच्या हत्येच्या दिवशी, ८ जून २०२० रोजी आदित्य ठाकरे यांचे मोबाईल टॉवर लोकेशन घटनास्थळी असल्याचे सिद्ध झाले. आदित्य ठाकरे यांनी त्या दिवशी आपल्या आजोबांच्या निधनामुळे रुग्णालयात असल्याचा दावा केला होता. मात्र, याचिकाकर्त्यांनी अशी माहिती दिली की त्यांचे आजोबा १४ जून २०२० रोजी मरण पावले, ८ जूनला नव्हे. यात आणखी एक मुद्दा असा की १४ जून २०२० रोजी सुशांत सिंह राजपूत सुद्धा मरण पावला होता. पठाण यांनी अनेक गंभीर आरोप या याचिकेत केले आहेत. त्याला उत्तर म्हणून आदित्य ठाकरे यांनी हस्तक्षेप याचिका दाखल केली. मुख्य न्यायमूर्ती आलोक अराधे आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने आदित्य ठाकरे यांनी दाखल केलेल्या हस्तक्षेप याचिकेवर स्पष्ट केले की, एक आरोपी म्हणून आदित्य ठाकरे यांना या जनहित याचिकेत हस्तक्षेप करण्याचा किंवा आक्षेप नोंदविण्याचा कोणताही अधिकार नाही. मुख्य न्यायाधीशांनी ठाकरेंच्या वकिलांना याचिकाकर्त्यांनी सादर केलेल्या कायदेशीर बाबींचा अभ्यास करून पुढील सुनावणीसाठी तयारीनिशी उपस्थित राहावे, असा निर्देश दिला. मुळात जनहित याचिकेवर आदित्य यांना हस्तक्षेप याचिका दाखल का कराविशी वाटली हाच महत्त्वाचा प्रश्न आहे. आता तर या दिशा सालियानचे वडील सतीश सालियान यांनीच याचिका दाखल केल्यामुळे हे प्रकरण आणखी तीव्र होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. सतीश सालियन यांनी न्यायालयाकडे मागणी केली आहे की आदित्य ठाकरे आणि इतरांविरुद्ध आयपीसीच्या कलम ३७६ (डी), ३०२, २०१, २१८, ४०९, १६६, १०७, १०९, १२० (बी) आणि ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करावा. यासोबतच त्यांनी या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्याची मागणीही केली आहे. यामध्ये माजी महापौर किशोरी पेडणेकर यांचेही नाव आले आहे. एका पत्रकार परिषदेत सालियान यांचे वकील नीलेश ओझा यांनी सांगितलं की उद्धव ठाकरेंना आरोपी करण्याची मागणी केली गेली आहे. ही याचिका दाखल झाल्यावर नितेश राणे यांनी मीडियाला सांगितलं की ते आधीपासून हेच सांगत होते. हळूहळू एकेक गोष्टी बाहेर येतील. महत्त्वाची बाब अशी की राणेंनी लहान मुलांचा उल्लेख देखील केला. उल्लेख अस्पष्ट होते. पण त्या उल्लेखावरून वाटतं की नको त्या कामांसाठी लहान मुलांचा वापर केला गेला होता.

यावर आदित्य यांनी ३२ वर्षांच्या तरुणाला सरकार घाबरलंय असं विधान केलं. संजय राऊतही तेच म्हणाले की एका तरुणाचं करीअर तुम्ही बरबाद करत आहात. मुद्दा असा आहे की पूर्वी झालेले आरोप बाजूला ठेवूया. परंतु दिशाच्या वडिलांनीच याचिका दाखल केल्यामुळे या प्रकरणाला खऱ्या अर्थाने एक दिशा मिळाली आहे. अर्णब गोस्वामी यांनी घेतलेल्या मुलाखतीत सतीश सालियान यांनी फारसं बोलणं टाळलं परंतु आदित्य ठाकरेंवरील आरोपाला त्यांनी पुष्टी दिली. मालवणीमधील कुणी अधिकाऱ्यांनी त्यांना दिशाने आत्महत्या केल्याचे सांगितले आणि विशेष म्हणजे किशोरी पेडणेकर त्यांच्या घरी आल्या होत्या व त्यांनीही मानसिक दबाव निर्माण केल्याचे सांगितले आहे. किशोरी पेडणेकर त्यांच्या घरी का गेल्या होत्या, त्यांना भेटण्याची गरज का पडली हा एक महत्त्वाचा प्रश्न इथे उपस्थित होतो. याबद्दल माननीय न्यायालय काय म्हणतं, हे आता पाहावं लागणार आहे. मुळात ही **(पान ६ वर)**

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# आरटीओ, अबकारी खाते पोलिसांमध्ये विलीन व्हावे!

आपण ज्या महाराष्ट्रात राहतो तिथे सदैव कायद्याचे अधिराज्य असावे, असेच समाजभान जपणाऱ्यांना वाटते. त्यांचे वाटणे योग्यच आहे. पण याकरिता केवळ आणि केवळ पोलिस खात्याकडूनच अपेक्षा केली जाते. मग पोलिस खात्याच्या धर्तीवर गणवेश तसेच प्रशिक्षण घेणाऱ्या आरटीओ तथा अबकारी विभागांचे काय? वर्षांतील ३६५ दिवस आणि चोवीस तास फक्त पोलिसांनी राबायचे का? त्याचवेळी आरटीओ, अबकारी खात्यानेफक्त मजा मारायची का? हाच प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. यावर तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. समजा पोलिस खात्यात आरटीओसह अबकारी विभागाचे विलिनीकरण झाले तर महाराष्ट्रातील सर्वच प्रकारची तस्करी थांबू शकते. कारण कायदा व सुव्यवस्था सांभाळणाऱ्यांची ताकद तिपटीने वाढेल अन् खऱ्या अर्थाने कायद्याचे अधिराज्य या महाराष्ट्रात येईल.

पोलिस खात्यात भरती झाल्यावर संबंधितांना खडतर असे प्रशिक्षण घ्यावे लागते. अगदी तसेच प्रशिक्षण आरटीओ आणि एक्साईज विभागातील कर्मचारी, अधिकाऱ्यांनाही दिले जाते. म्हणूनच की काय या दोन्ही विभागांची रचना ट्रेनिंगपासून कपड्यांपर्यंत सर्व पोलिसांप्रमाणेच आहे. मात्र आरटीओ आणि अबकारी विभाग फक्त काही विशिष्ट मर्यादित ठिकाणी काम करतोय. रस्त्यावर आपल्याला नाकाबंदी फक्त पोलिस विभागच करताना दिसतो. समजा त्यांना आरटीओ आणि एक्साईज विभागाचे बळ मिळाले तर रस्त्याने होणारी गोधनाची तस्करी, अवैध दारूची तस्करी, रेतीची तस्करीसह इतरही गुन्ह्यांवर प्रभावीपणे आळा नक्कीच बसू शकतो. आता बघा अवैध दारू काढणाऱ्या अड्ड्यांवर कारवाया करण्याचे काम वर्षभर पोलिस खाते करीत असते. त्यावेळी अबकारी खाते करते काय? किती कारवाया अबकारी विभागामार्फत केल्या जातात. अवैध वाहनांतून मालाची ने-आण करणाऱ्या, गोधनाची तस्करी करणाऱ्यांवर आरटीओ विभागाने किती कारवाया केल्या, त्याचवेळी पोलिसांनी किती धाडी टाकल्या याची आकडेवारी सहजतेने समोर येईल. म्हणजेच काय तर सर्व काही पोलिसांनी करायचे आणि यांनी काय फक्त तोडपाणी करीतच नोकरी केल्याचा तोरा मिरवायचा का? अनेकदा असे वाटते की, या पोलिसांप्रमाणे वर्दी दिलेल्या खात्यांची निर्मिती का केली, त्यांनी सर्व प्रकारच्या सुट्या उपभोगायच्या, भलामोठा पगार घ्यायचा आणि तिकडे पोलिसांनी साप्ताहिक सुटीवर तुळशीपत्र ठेवत कर्तव्य पार पाडायचे? असे किती दिवस चालणार आहे.

या दोन अतिरिक्त दलाचा वापर पोलिस विभागालाकरायला मिळाल्यास ताकद वाढेल. तसे पाहता गोधनाची तस्करी, अवैध दारूची तस्करी, सुगंधित तंबाखूची तस्करी, रेतीची तस्करी याची सर्व माहिती आरटीओसह अबकारी खात्याला असते. पण त्यांना आपल्या सुट्यांवर पाणी सोडायचे नाही. त्यांना कारवायांची झंझट आपल्या मागे लावून घ्यायची इच्छा नाही. त्यांना तर शनिवार, रविवार मस्तपैकी सुटी भोगायची आहे अन्? पुन्हा सोमवारपासून गणित करायचे असते. गेल्या ७८ वर्षांपासून आपल्या महाराष्ट्रात हेच सुरू आहे. माझ्या मते हा श्रमशक्तीचा दुरुपयोग आहे. म्हणूनच आता वेळ आली आहे, विलीनीकरणाची.

आता हे विलीनीकरण कसे शक्य होईल, याचा शास्त्रीय अभ्यास व्हायला हवा. समजा विलीनीकरण शक्य नसेल तर पोलिसांसोबत नाकाबंदीसाठी तरी या दोन्ही विभागांचा उपयोग व्हायला हवा. पोलिस, आरटीओ आणि अबकारी विभागाची संयुक्त टीम याकरिता नेमायला हवी. तिन्ही खात्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या खबरीलालचे नेटवर्क तस्करीवर आळा घालण्यासाठी उपयोगात यायला हवे. तस्करी कुठल्याही प्रकारची असो, यात देशाचे फार मोठे नुकसान होत असते. विशेषतः रेती आणि अवैध दारूच्या तस्करीमुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडतो. हा महसूल पूर्णतः शासकीय तिजोरीत जमा झाला तर आपल्या महाराष्ट्राच्या डोक्यावर जो काही कर्जाचा बोझा असेल तो सहजतेने कमी होऊ शकतो. आर्थिक सुबत्ता आल्याने अत्याधुनिक सोयी सुविधा नागरिकांना मिळू शकतात. महाराष्ट्रातील सार्वजनिक ठिकाणी असलेल्या सोयी वाढल्याने सामान्य व्यक्तीही सुखावतील. शेवटी, जो काही विकास होतो, तो पूर्णतः शासकीय तिजोरीत येणाऱ्या निधीवर अवलंबून असतो. मागे भारत सरकारने तोट्यात असलेल्या विविध बँकांचे एकाच ठिकाणी विलीनीकरण केले. तो प्रयोग यशस्वी झाला तर मग कायदा व सुव्यवस्थेसाठी हा निर्णय सहजतेने अंमलात येऊ शकतो, नाही का? ▮

९८८१७१७८५९

# देवाभाऊ, या झारीतल्या भ्रष्टाचाऱ्यांना आवरा !

कालपर्यंत संयम ठेवला, तुमच्या मागे आधीच अनंत समस्या असतात, त्यात घरचा आहेर नको म्हणून. कालपर्यंत वाटत होतं, आपण काम तर चोख करत आहोत, मग आपण का घाबरायचं? जरा कागदपत्रे पूर्ण करण्यात कमी पडत असू तर तेही करू. ज्या त्रुटी असतील तर त्या या निमित्त पूर्ण करू. पण प्रामाणिक लोकांचे कागदपत्र कधीच पूर्ण होत नाहीत हे हळूहळू लक्षात यायला लागलं.भ्रष्ट अधिकाऱ्यांची योग्य 'व्यवस्था' केली तर त्रुटी निघत नाहीत हे तेव्हा कळलं, जेव्हा पंचवीस वर्षे उत्तम चालवलेली योजना निव्वळ कागदावर योग्य वजन ठेवलं नाही म्हणून हातची गेली.

योजना गेल्याचेही दुःख नाही,दुःख याचं आहे की तुम्ही महिला व बाल कल्याण या विभागासाठी जो अतोनात पैसा खर्च करता आहात तो या ठिकठिकाणी ठाण मांडून बसलेल्या झारीतल्या भ्रष्टाचाऱ्यांच्या नरड्यात जातो आहे. मग आलेल्या उद्विग्नेतून असं वाटलं की चला आपल्या सर्व खात्यांसाठी एक भ्रष्टाचार निर्देशांक काढूया. आयक्यू,ईक्यू काढतात तसा सीक्यू काढू. करप्शन कोशंट.प्रत्येक खात्याने तो जाहीर करावा.आम्हाला आमच्या खर्चात लाच दिल्याचे खर्च दाखवायला परवानगी द्या आणि उद्ध कंपन्या जसे काही प्रमाणात प्रकल्पाचे प्रशासकीय खर्च मंजूर करतात तसे ज्या खात्याच्या योजना राबवतो त्या खात्याच्या करप्शन कोशंट नुसार खर्च करायला निधीही द्या. पण कालच्या तुमच्या मुलाखतीत भ्रष्टाचाराबाबत तुम्ही ज्या उपाय योजनांबाबत बोललात त्यामुळे पुन्हा धीर आला आणि वाटलं की की आज ना उद्या चित्र बदलेल. पण तोवर काय ? शासनाच्या योजना प्रामाणिकपणे राबवून पीडित महिलांना आधार देण्यासाठी जिवाचे रान करणाऱ्या आमच्या बहिणींनी तोवर कसा दम धरायचा ? सात आठ महिने पगार झालेला नसतानाही माझ्या बहिणी मन लावून काम करतात,जाण्या येण्याच्या खर्चासाठी पदरमोड करतात,वूमन हेल्पलाईनवर आलेल्या तक्रारी ऐकून रात्रीअपरात्री घराबाहेर पडतात,रात्रभर फिरून हरवलेल्या महिलेला सुरक्षित आणतात,त्यासाठी आपल्या घरातली लेकरेबाळे,सासू सासरे यांची आबाळ करतात, नवरा नाराज झाला तरी त्याच्या मिनत्या करतात, ते निव्वळ आपलं काम चोख करायचं म्हणून नव्हे,या योजना राबवताना महिलांच्या दुःस्थितीचे जे दर्शन त्यांना रोज घडते त्या संवेदनेशी त्या प्रामाणिक राहतात म्हणून. आणि निर्लज्ज अधिकारी यांना एका एका कागदासाठी खेटे घालायला लावतात, आलेले अनुदान द्यायला लागू नये यासाठी काहीही अर्थहीन त्रुटी काढत बसतात.. तरीही या महिला जातात,कागदपत्र पूर्ण करत रहातात,आणि मग काहीच निघत नाही म्हटल्यावर काहीतरी अपमानास्पद,अश्लाघ्य बोलून त्यांना नामोहरम करतात.माझ्या बहिणी माझ्यासमोर येऊन रडतात. त्या अश्रूंनी मलाही मग जाग येते. वाटतं की महाराष्ट्राला सुशासन देण्याचा विडा उचललेले मुख्यमंत्री असताना आम्ही 'हे असंच चालायचं' म्हणून या व्यवस्थेला खतपाणी घालू तर महाराष्ट्राच्या अधोगतीला आम्हीही जबाबदार असू. कधी नव्हे ते अपेक्षा करावी असा शासक आहे,म्हणूनच हे मांडायचे धाडस आहे. सगळीकडे अनुभव हेच आहेत पण कुणी बोलत नाही.कारण कार्यकर्त्याला काम करण्यात रस आहे. 'हीही एक अडचण' असं म्हणून तो जमेल तसा मार्ग काढतो आणि काम पुढे सरकवतो. पण हे बोलल्याशिवाय तुम्हाला हे समजेल तरी कसे ? अन्याय सहन करणारे अन्याय करणाऱ्याइतकेच दोषी असतात हे लक्षात घेऊन माझ्या सहकारी बहिणींवर झालेले अन्याय आणि अत्याचार आम्ही मुकाट्याने सोसत राहिलो तर आम्हीही अपराधी ठरू. काय अधिकार आहे या अधिकाऱ्यांना सरकारने दिलेले अनुदान अडवण्याचा ? काय अधिकार आहे एखाद्या अधिकाऱ्याला - एका प्रामाणिक महिलेला तिचं काम,तिची शैक्षणिक अर्हता,तिची योग्यता यावरून भर ऑफिसमध्ये बोलून तिच्या मनोधैर्याचे हरण करण्याचा ? तिच्या प्रतिष्ठेला,आत्मसन्मानाला हात घालणं तितकंच दुर्दैवी आहे आणि तितकंच वाईट. आणि काय अधिकार आहे मला अहिल्यादेवींचे चरित्र कथन करत फिरण्याचा ? त्यांची तेजस्विता,त्यांचे सडेतोड जबाब देण्याचे धैर्य मी का विसरते आहे ? 'स्त्रिया म्हणजे सुपारीची खांडे समजून त्यांस गिळता.तर हिंमत करून माझ्यावर चालून या .हत्तीच्या पायातील साखळदंड त्याच दिवशी तुमच्या पायी न अडकवले तर सुभेदारांची सून म्हणवणार नाही' हे उद्गार मला आठवतात,पण हे अढळपद मिळालेले अधिकारी,यांना हात लावायचा अधिकार मला संविधान देत नाही ! स्त्रियाच काय,प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची अवस्था 'आई जगू देईना आणि बाप भीक मागू देईना' अशी झाली आहे.आम्ही शिकलेली मूल्ये,आम च्यावरचे संस्कार आम्हाला या मार्गावर जाऊ देत नाहीत आणि तिकडे अधिकाऱ्यांची हांजी हांजी आणि त्यांची मर्जी राखली जाईल इतके आदान प्रदान केल्याशिवाय कामे पुढे सरकत नाहीत. हे माझे अरण्यरुदन आहे असे लोक समजतील.खात्याचे लोक हे वाचून तुच्छतेने हसतील. 'काम करायचं तर या गोष्टी जमवाव्या लागतात हे ताईंना सांगायला हवं आहे' असं कुणी म्हणतील.कदाचित कुणी पत्रकार हिंमत करून हे प्रकरण धसास लावेल,कुणी नुसतीच गंमत पाहतील. हे लिहिल्याने कदाचित आमचा त्रास अजून वाढेल.अधिकाऱ्यांची मग्रुरी अधिकच दाहक होईल.कदाचित योजना बंद पडतील.पण आम्ही मुकाट्याने हे सहन केले नाही आणि गलिच्छ व्यवस्थेचा भाग बनलो नाही हे समाधान असेल. मला माझ्या समोर येऊन रडणाऱ्या प्रामाणिक कार्यकर्तीच्या नजरेला नजर देता येईल. आज आम चा अर्जुन झाला असला तरी महिलांच्या दैन्यावस्थेचे जे विश्वरूप दर्शन आम्हाला झाले आहे ते पाहिल्यावर आमच्या मनातली प्रेरणा आम्हाला पुन्हा उभे करेल आणि निराशा टाकून आम्ही कामाला लागू. कदाचित आम्ही शासकीय योजना बंद करून अधिक मोकळेपणाने महिलांसाठी काम करू. ही भ्रष्टांची समांतर व्यवस्था बहुदा याचीच वाट पाहते आहे. एखादी प्रामाणिक संस्था बंद पडल्याचे दुःख कुणाला होणार नाही पण हा भ्रष्टाचाराचा काळ सोकावेल. न्याय यासाठी व्हायला हवा आहे.

**- विनीता तेलंग,**
**भगिनी निवेदिता प्रतिष्ठान सांगली.**

## वाचक पत्रे

### लग्न : एक ज्वलंत प्रश्न

आजकाल लग्न जमविणे हा एक मोठा जटिल प्रश्न निर्माण झाला आहे. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे मुलांबरोबर मुलीसुद्धा मोठ्या प्रमाणात शिक्षित होत आहेत. ही अतिशय चांगली बाब आहे. आजही अगदी खेड्यापाड्यात मुली कमीत कमी पदवीधर झालेल्या दिसतात. साहजिकच त्यांची अपेक्षा नोकरीची असते. त्यांना संगणक किंवा इतर क्षेत्रात नोकऱ्या मिळतात. त्यामुळे त्यांच्या लग्नासंबंधी अपेक्षा उंचावल्या आहेत. जोडीदार मिळवता असावा, त्याचे स्वतःचे घर असावे व ते पुण्यासारख्या शहरात हवे. त्याचा पगार वधूपेक्षा जास्त असावा. इथपर्यंत अपेक्षा ठीक आहेत, पण घरात मुलाशिवाय कोणीही नको. आता सांगा, मुलाच्या आई-वडिलांनी कुठे जावे? लग्नाआगोदरच मुलींना सासू-सासरे नको असतात. गावाकडच्या मुलींना शेतकरी मुलगा नको आहे. यात मुलींच्या आई-वडिलांच्या अपेक्षा वाढलेल्या दिसत आहेत. सर्वच मुले काही शहरात नोकरीसाठी जात नाहीत. काही जण गावाकडील शेती व घर सांभाळतात. त्यांना उत्पन्नही चांगले असते. पण केवळ शेतकरी मुलगा नको या भावनेने अनेक मुलांची लग्ने लांबलेली आहेत. लग्न जमत नसल्यामुळे मुलांच्या अपेक्षा कमी होत चालल्याचे दिसत आहे. लग्न एक सामाजिक प्रश्न म्हणून निर्माण होत आहे. आज लग्न जमविणाऱ्या अनेक संस्था आहेत. तेथेही मुली किंवा मुलांच्या अपेक्षा वाढलेल्या दिसत आहेत. एकूणच हल्ली मुला-मुलींची लग्ने होणे अवघड होत चालले आहे.

**शांताराम वाघ**/९६२३४५२५५३

●● ●●

### स्त्री सन्मानाच्या निमित्ताने

ती आहे एक आधार घरचा, नात्यांचा. तिच्याशिवाय घराचे पूर्णत्व नाही.जन्मापासून अनेक नात्यांना तीच बांधून ठेवते. तिचा आदर सन्मान एक दिवस नाही तर प्रत्येक क्षणाला व्हायला हवा. स्वतःचे नाही तर दुसऱ्याचे सुख पाहणारी ती तिच्या वाट्याला दुःख येऊ नये याची कुटुंबाने काळजी घेतली पाहिजे. लक्ष्मी, सरस्वती, शारदा दुर्गा या स्त्री शक्ती आहेतच आणि त्याच आपल्या आजूबाजूला देखील विविध रूपात आहे, याचे भान ठेवले तर तिचा नित्य सन्मान केला जाईल. केवळ मूर्तीची पूजा करून होणार नाही तर आपल्या घरातील स्त्रीचा आदर सन्मान केला असता वेगळी पूजा करावी लागणार नाही.आज देखील सुशिक्षित घरात देखील तिला केवळ गृहीत धरले जाते. दोन घरांसाठी आपले आयुष्य पणाला लावणारी ती मात्र बरेचदा उपेक्षित राहते. आपल्या इच्छा-आकांक्षा यांना केवळ आपल्या माणसांसाठी बाजूला ठेवते हे तिचे मोठेपण आहे.हीच तिची महानता आहे. काही क्षण तरी आपल्या मनाप्रमाणे जगावे, राहावे असे तिला वाटत असेल हा विचार किती घरात केला जातो हा एक मोठा प्रश्न आहे.

आपले संपूर्ण जीवन सगळ्यांसाठी समर्पित करणारी ती तिची काळजी घेतली तर घरात त्यासारखे दुसरे सुख नाही,समाधान नाही. राहील तो केवळ आनंद.हा आनंद ती आणि तिच्या सोबतीने सर्व अनुभवतील तो क्षण किती सुंदर असेल. ती अष्टावधानी आहे, ती आकाश कवेत घेऊ शकते. आज ती कोणत्याही क्षेत्रात उत्तम कामगिरी करते हेच तिचे सामर्थ्य आहे. पण नात्यात गुंतली की ती दोन पावलं मागे सरते ते इतरांनी पुढे जायला हवं म्हणूनच. ही जाणीव जिथे झाली तिथे संपन्नता समृद्धता आहे हे निश्चित.

जन्मापासून अखेरपर्यंत संघर्ष हाच तिच्या जीवनाचा भाग आहे आणि त्यातून ती तावून सुलाखून बाहेर पडते आणि आपले एक वलय निर्माण करते. तिचा आदर सन्मान करा एवढीच तर तिची अपेक्षा आहे. आपली पुरुषप्रधान संस्कृती असली तरी ती जगत जननी आहे, स्त्री शक्ती आहे.तिला झेप घेऊ द्या आणि त्यासाठी मदतीचा हात मात्र दिला पाहिजे.

**संगीता वाईकर**/ ९९२२५०४७९४

●● ●●

### केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे!

साधना करता यावी, आत्मशांती मिळावी, धर्मशिक्षणाकरिता मंदिरांची आवश्यकता होती. ती ओळखून राजे, महाराजे, संस्थानिक यांनी मंदिरांची निर्मिती केली. मात्र मंदिरांवर नियंत्रण मिळवण्यासाठी इंग्रजांनी १९२७ मध्ये केवळ हिंदूंच्या मंदिरांचे सरकारीकरण करणारा कायदा बनवला. मंदिरे ताब्यात घेणे सुरू केले. दुर्दैवाने भारत स्वतंत्र झाल्यानंतरही ते सुरूच आहे. तेव्हाही आणि आताही मंदिरांच्या पैशाचा उपयोग मंदिरांशिवाय इतरत्र होऊ लागला. आज देशाची स्थिती पाहता ती चिंताजनक वाटते. रोज नवीन क्लेशदायक घटना घडत आहेत. भ्रष्टाचार, अनीती, राक्षसी वृत्ती फोफावली आहे. यामागचे एक प्रमुख कारण म्हणजे धर्मशिक्षणाचा अभाव. मंदिरांचे सरकारीकरण झाल्यामुळे त्यातून लोकांना धर्मशिक्षण मिळेनासे झाले. आताची स्थिती बघता अनेक मंदिरे आध्यात्मिक केंद्रे न राहता, केवळ पिकनिक स्पॉट किंवा कमाईचे साधन बनली आहेत. त्यामुळे मंदिरांमधून मिळणारे चैतन्य, धर्म आणि संस्कृती लोप पावत आहेत. म्हणूनच मंदिरे सरकारीकरणातून मुक्त व्हावीत आणि त्यामधून धर्मशिक्षण दिले जावे, ही काळाची गरज आहे. यासाठी हिंदूंनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र मंदिर महासंघाची स्थापना केली. त्या माध्यमातून मंदिर विश्वस्तांचे संघटन झाले. मंदिरांचे प्रश्न सोडविण्यासाठी संघटित प्रयत्न सुरू आहेत. ईश्वर कृपेने त्याला चांगले यशही आले आहे. येत्या रविवारी २३ मार्च रोजी नागपूर येथे द्वितीय मंदिर अधिवेशन होत आहे असे वाचण्यात आले. या अधिवेशनाच्या निमित्ताने सर्व हिंदूंनी मंदिर सरकारीकरण्याचा विरोध करून, मंदिरे भक्तांच्या ताब्यात येण्यासाठी आपापल्या परीने सरकारला या विषयी विनंती करून या महत्त्वाच्या कार्यात सहभाग घेऊन आपले धर्मकर्तव्य निभवावे. ▮

**रमा देशमुख**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त

### संत मुक्ताईच्या भूमिकेसाठी नेहाने घेतले वाणी प्रशिक्षण

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

भूमिकांच्या जवळ जाताना या कलाकारांना खूप मेहनत घ्यावी लागते. त्यातही ती भूमिका आव्हानात्मक असेल तर जबाबदारी अधिक वाढते. दिग्पाल लांजेकर लिखित-दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटातून अभिनेत्री नेहा नाईक हा युवा चेहरा भेटीला येणार आहे. या चित्रपटातील संत मुक्ताईची भूमिका ती साकारणार आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा मराठी चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या एका वेगळ्या विषयावर तितक्याच ताकदीची भूमिका साकारताना नेहाने आपल्या देहबोली सोबत वाणी संस्काराचे खास प्रशिक्षण पुण्यातील ज्येष्ठ नाट्यगुरू प्रा. श्यामराव जोशी यांच्याकडे तब्बल तीन महिने घेतले. मुक्ताई यांनी आपल्या अल्पकालीन आयुष्यात जे अनुभवले आणि त्यायोगे जे भोगले त्या सर्वांचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगातून आणि काव्यातून उमटले आहे. या चित्रपटाची भाषा ही १३व्या शतकातील मराठी भाषेचे प्रतिनिधित्व करते. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना नेहा सांगते, या चित्रपटात काम करायचं म्हणजे आधी या चित्रपटाच्या संहितेवर प्रभुत्व मिळवायला हवं. म्हणून मी त्यातल्या भाषेच्या अभ्यासावर भर दिला.



### सहकार क्षेत्रात महिलांचे स्थान व योगदान या विषयावर उद्या परिसंवाद

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

सहकार भारती सहकाराच्या सर्व क्षेत्रात गेली ४७ वर्ष काम करीत आहे. सहकार क्षेत्रात काम करताना सहकार भारती नेहमीच महिलांचा सहभाग वाढवण्यासाठी आग्रही राहिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून महिला दिनानिमित्त सहकार क्षेत्रात महिलांचे स्थान व योगदान या विषयावर रविवार दि. २३ मार्च रोजी सायंकाळी ५ ते ८ हरिभाई देवाकरण प्रशाला कलानिकेतन हॉल येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.

### शहरात एक रिक्षासह तीन दुचाकींची चोरी

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

शहरात दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढवत आहे. शहरातील विविध ठिकाणाहून तीन दुचाकींची तर एका रिक्षा चोरीला गेली आहे. दुचाकी चोरीच्या रोज घटना घडू लागल्याने चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे केले आहे. पहिल्या घटनेत सिद्धेश्वर मार्केट यार्ड येथील एन. बी. कांद्याच्या दुकानासमोरून दुचाकी (क्रमांक एम एच १३ डी एल ४७९४) ही चोरून नेल्याची घटना १९ मार्चला घडली. याबाबत सुभेदार गुलाब शेख (वय ३८, रा. संगमेश्वर नगर' अक्कलकोट रोड) फिर्याद दिली. दुसऱ्या घटनेत मार्केट यार्ड येथील चिलकंडे कांद्याच्या दुकानासमोरून दुचाकी (क्रमांक एम एच १३ ई बी ६२९५ ही २० मार्चला चोरून नेली. याबाबत पारस अनिल गायकवाड (वय २९, रा. गुजर वस्ती, बुद्ध विहार जवळ) यांनी फिर्याद दिली. तिसऱ्या घटनेत चडचणकर पेट्रोल पंपासमोर पार्क केलेली रिक्षा (क्रमांक एम एच १३ बी व्ही २०६१) ही चोरून नेल्याची घटना २० मार्चला घडली. रिक्षा पार्क करून मुलीस सेंट्रल हॉस्पिटल येथे पाहण्यासाठी गेले असता अज्ञात चोरट्याने रिक्षा चोरून नेली. याबाबत नासिर अ. अजीज खान (वय ५०, रा. मोदीखाना पाच कंदील) यांनी तक्रार दिली. चौथ्या घटनेत मार्केट यार्ड येथील प्रधान हॉटेल समोरून दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी जी ९५०७) ही चोरून नेल्याची घटना २० मार्चला घडली. याबाबत बाळू सोपान साबळे (वय ४१, रा. राजीव नगर झोपडपट्टी, भवानी पेठ) यांनी पोलिसात तक्रार दिली. चारही घटनांची नोंद जेलरोड पोलीस ठाण्यात झाली आहे. दरम्यान मागील दोन दिवसात शहरातून सहा दुचाकींची चोरी झाल्याचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वाहन चोरट्यांनी पुन्हा डोकेवर काढले असून, पोलिसांनी ठोस कारवाई करण्याची मागणी आता नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# आजपासून रेशन दुकानातून साडी वितरण

### २५ लाख महिलांना पाठविल्या साड्या

### जिल्हा पुरवठा अधिकारी सरडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

कॅप्टिव्ह मार्केट योजनेअंतर्गत राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक २४ लाख ८० हजार लाभार्थ्यांच्या प्रत्येक कुटुंबातील महिला भगिनींना दरवर्षी एक साडी मोफत वितरण सुरू झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील ५१ हजार ६७७ पैकी ४९ हजार १०३ साड्या वितरण सुरू झाले असल्याची माहिती जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे यांनी आज (दि. २१) दिली.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय मुंबई यांच्याकडील पत्रान्वये सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना दरवर्षी प्रतिकुटुंब एक साडी मोफत वितरीत करण्याबाबत कॅप्टिव्ह मार्केट योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून, सदर योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील (ग्रामीण) अंत्योदय शिधापत्रिकाधारक कुटुंबांना प्रतिकुटुंब एक साडी मोफत वितरीत करण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचे प्रणालीवरील अंत्योदय शिधापत्रिका संख्येनुसार ५१ हजार ३७७ साड्या मंजूर करण्यात आल्या आहेत. परंतू सदयस्थितीत अंत्योदय कार्ड संख्या कमी झाली असल्याने तसेच साडीचे वाटप विचारात घेऊन तालुक्याकडून साडयांची मागणी विचारात घेतली असता त्यान्वये सोलापूर जिल्ह्यातील रास्तभाव दुकानांमार्फत पात्र अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मोफत साडीचे वितरण करण्याकरिता खालील तपशिलात नमूद केल्यप्रमाणे तालुका, गोदामनिहाय साडयाचे वितरण खालीलप्रमाणे सुरू झाले आहे.







### शासनाच्या पॅकिंग आल्याप्रमाणे आम्ही वाटप करतोय साड्या

शासकीय योजनेतून सोलापूर जिल्ह्यातील शहर व ग्रामीण भागातील अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना प्रति वर्ष एक साडी वाटप सुरू झाले आहे. जशा शासनाकडून साड्या पॅकिंगमध्ये आल्या त्याची पॅकिंग न फोडता आली तशी साडी वाटप प्रक्रिया आमचे रेशन दुकानदार करीत आहेत. या पॅकिंगमधील 'साडी हलकी की भारी' हे पाहण्याचाही आमचा अधिकार नाही. यामुळे आहे त्या पॅकिंगमध्येच आणि ऑनलाईन पध्दतीने साडी वाटप होणार आहे. जिल्ह्यातील सर्व लाभार्थ्यांना रेशन दुकानात या साड्यांचे वितरण केले जाणार आहे.

**- संतोष सरडे, जिल्हा पुरवठा अधिकारी**

### साडीचा दर्जा, पुरवठा अन् वितरणाचा महामंडळाने मागविला अहवाल

राज्य यंत्रमाग महामंडळास नोडल एजन्सी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. या महामंडळाने ई-निविदाद्वारे निश्चित करण्यात आलेल्या पॅनल मधील सहकारी संस्था /एमएसएमई कडून साड्यांचे उत्पादन करून घेतले आहे. राज्यातील काही राशन दुकानात खराब साड्या, फाटलेल्या साड्या मिळाल्याबाबत तक्रारी प्राप्त होत आहेत. तथापि आतापर्यंत निदर्शनास आलेल्या खराब झालेल्या साड्या या राज्यातील काही ठिकाणच्या असून, या पुरवठा करण्यात आलेल्या साड्यांच्या प्रमाणात फारच अत्यल्प प्रमाणात आहेत. तरीही त्या ठिकाणी महामंडळाने आपले अधिकारी पाठवून त्वरित साडी बदलून देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच महामंडळाने प्रत्येक जिल्ह्यामध्ये आपले अधिकारी पाठवून साडीचा दर्जा, पुरवठा व वितरणाबाबत तपासणी अहवाल मागवला आहे.

### तालुकानिहाय अशा मिळाल्या साड्या

| तालुका | शिधापत्रिकाधारक | साडी |
|---|---|---|
| बार्शी | ३८८० | ३८८० |
| वैराग | ११३० | ११३० |
| करमाळा | २९५२ | २९५२ |
| करमाळा-(जेऊर) | १३२४ | १३२४ |
| माढा/कुर्डुवाडी- | २१११ | २१११ |
| टेंभुर्णी | ११२८ | ११२८ |
| माळशिरस (१) | ३०८२ | ३०८२ |
| माळशिरस क्र.(२) | ४२२८ | ४२२८ |
| नातेपुते | १५५७ | १५५७ |
| मंगळवेढा | ३४३५ | ३४३५ |
| मोहोळ | २४२६ | २४२६ |
| पंढरपूर | ४०७८ | ४०७८ |
| अनवली | १६९४ | १६९४ |
| उ. सोलापूर | २००० | २००० |
| दक्षिण सोलापूर | २३४७ | २३४७ |
| मंद्रुप | १४२१ | १४२१ |
| अक्कलकोट | ७४०० | ७४०० |
| सांगोला | २९१० | २९१० |
| **एकूण** | **४९,१०३** | **४९,१०३** |




# सोलापुरात शिवसेना उबाठा युवासेनेला खिंडार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

शिवसेनेच्या युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द यांच्या माध्यमातून पंढरपूर, अक्कलकोट, दक्षिण सोलापूर येथील ठाकरे सेनेच्या युवासेनेच्या पंढरपूर तालुकाप्रमुखांसह १५ जणांनी शिवसेना शिंदे पक्षात प्रवेश केला.

सोलापुरातील युवा विजय महाराष्ट्र दौऱ्यांतर्गत रंगभवन येथील युवासेनेच्या मेळाव्यात हा पक्ष प्रवेश पार पडला. यावेळी व्यासपीठावर शिवसेनेच्या युवासेनेचे पश्चिम महाराष्ट्र सचिव ऋतुराज क्षीरसागर, पश्चिम महाराष्ट्र निरीक्षक वरिंद्र मंडलीक, कार्यकारणी सदस्य शिवाजी जाधव, प्रियांका परांडे, सोलापूरचे संपर्कप्रमुख प्रा. शिवाजी सावंत, जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, ऋतुराज सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र कार्यकारिणी सदस्य सुजित खुर्द यांनी आगामी काळात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांमध्ये युवासेनेसाठी जास्तीत जास्त जागा देण्याबाबत विचार करावा, अशी मागणी प्रा. शिवाजी सावंत यांच्याकडे केली.

# अट्टल गुन्हेगाराकडून सोन्याचे दागिने हस्तगत

## जोडभावी पेठ पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

घरफोडीच्या गुन्ह्यातील तपासात डी. बी. पथकास मिळालेल्या माहितीनुसार पथकानं एका संशयितास ताब्यात घेतले. त्याच्या झाडा-झडतीत त्यानं गुन्ह्याची कबुली दिलीय. राजकुमार पंडीत विभुते (वय- ४३, रा- बोरामणी) असं सराईत चोरट्याचं नाव आहे. त्याच्या ताब्यातून १ लाख १० हजार रूपयांचे दागिने जप्त करण्यात आल्याचे सांगण्यात आलंय.

याबाबत मिळालेली अधिक माहिती अशी की, शेळगी परिसरातील बलदवा नगरातील रहिवासी प्रताप शिवानंद माड्याळ यांनी, त्यांच्या घरातील अज्ञात चोरट्याने २२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची फिर्याद जोडभावी पेठ पोलीस ठाणे येथे दाखल केली.गतवर्षी २६ ते २८ नोव्हेंबर दरम्यान ही घटना घडली.



या गुन्ह्याच्या अनुषंगाने डी.बी.पथकातील पोहेकॉ. आरेनवरु यांना मिळालेल्या गुप्त बातमीवरुन सदर गुन्ह्यातील चोरी केलेला मुद्देमाल विक्रीकरीता एक इसम येणार असल्याची माहिती मिळाली होती.सपोनि महाडीक व डी.बी.पथकातील अंमलदार यांनी गुन्ह्यातील आरोपी राजकुमार पंडीत विभुते यास ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास करुन त्या गुन्ह्यातील चोरीस गेलेले दागीने जप्त केले.त्यात ७५ हजार रुपयांचे तीन जोडी सोन्याचे धातुचे कानातले १५ ग्रॅम वजनाचे,२५ हजार रुपयांचे एक सोन्याच्या धातुची ०५ ग्रॅम वजनाची बिलवरी अंगठी, १० हजार रुपयांचे चार सोन्याचे धातुचे लहान मुलांचे एकुण ०२ ग्रॅम वजनाच्या अंगठ्या असा एकूण १ लाख १० हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम.राजकुमार, पोलीस उप-आयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त (विभाग-१) प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण, पोनि.शबनम शेख (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली जोडभावी पेठ पोलीस स्टेशन गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि पडसळकर, सपोनि महाडिक, पो.हे.कॉ.खाजप्पा आरेनवरु,पो. हे.कॉ.शितल शिवशरण, पो. हे.कॉ.विठठल पैकेकरी,पो. कॉ.अभिजीत पवार,पो.कॉ.दत्ता मोरे,पो.कॉ. मल्लिनाथ स्वामी,पो. कॉ. बसवराज स्वामी,पो.कॉ. स्वप्नील कसगावडे,पो.कॉ. दादासाहेब सरवदे, पो.कॉ.दत्ता काटे, पो.कॉ. काळजे,पो.कॉ.थिटे यांनी पार पाडली.

# न्यायालयातील महसूल विषयक प्रकरणे लोकअदालतीत निकाली

### अपर जिल्हाधिकारी स्तरावर प्रथमच लोकअदालत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च-**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तथा दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सोलापूर यांचे सूचनेनुसार महसूल विषयक प्रकरणातील उभय पक्षकार यांच्यामध्ये सामंजस्याने व आपआपसात तडजोड होऊन महसूल प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्ह्यात जिल्हास्तरावर, उपविभाग व तालुकास्तरावर आज लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले होते.

जिल्हास्तरावरील अपर जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयातील, उपविभागस्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील व तालुकास्तरावर तहसीलदार यांच्या न्यायालयातील महसूल विषयक प्रकरणे लोकअदालतीमध्ये ठेवण्यात आली होती. उभय पक्षकारांतील तडजोडीने काही प्रकरणे निकाली काढण्यात आली. अपर जिल्हाधिकारी यांचेस्तरावर प्रथमच लोकअदालतीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर लोकअदालतीसाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूर यांचेकडून सहा. लोकअभिरक्षक आर. एस. पाटील, लोकअभिरक्षक कार्यालय सोलापूर व जिल्हाधिकारी कार्यालयाकडून विधी अधिकारी वर्धमान वसगडेकर, यांची नियुक्ती करण्यात आलेली होती, अशी माहिती अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी दिली. नागरिकांची आर्थिक, वेळेची बचत व्हावी व आपआपसातील वाद सामंजस्याने मिटावेत हा लोकअदालत घेण्यामागचा उद्देश असून, यापुढे आयोजीत करण्यात येणाऱ्या लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकार यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकूर यांनी केले आहे.



# सरपंच नितीन मोहीते यांच्यासह आज शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**पिलीव, दि. २१ मार्च -**

पिलीव येथे उदया महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर व माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत पिलीव जिल्हा परिषद गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य गणेशदादा पाटील तसेच पिलीव गावचे माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहीते यांच्यासह पिलीव जिल्हा परिषद गटातील हजारो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होणार आहे. यामुळे पिलीवसह जिल्हा परिषद गटाचे संपूर्ण राजकारण ढवळुन निघाले आहे. यावेळी पिलीव सह आसपासच्या कुसमोड, झिंजेवस्ती, सुळेवाडी, बचेरी ,शिंगोर्णी व इतर गावांच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा भव्य नागरि सत्कार करणयात येणार आहे. सदरचा कार्यक्रम पिलीव येथील आंधळकर चौक याठिकाणी सायंकाळी सात वाजता पक्ष प्रवेश, जाहीर नागरी सत्कार व शाखांचे उदघाटन व जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहणयाचे आवाहन पिलीव शहर भाजपच्या वतीने करण्यात आले आहे.

**CHANGE OF NAME**

I hereby declare that my old name **MAHENDRAKUMAR ABHAYKUMAR SHAH** Has been changed to **MAHENDRA ABHAYKUMAR SHAH** Residing At/Post - 38/1/2, F.No. 301, Tiara Apartment, Near New D Mart, Budhwar Peth Solapur (M.S.) Pin Code 413001 Kindly note the same.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने, मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता, जनरल, रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहेत. निविदा क्रमांक SUR/L/T/2024/15R2. कामाचे नाव : अप्रोच रोड, प्लॅटफॉर्म रुंदीकरण (400 मी x 5.5 मी) च्या तरतुदीशी संबंधित कामाचा इलेक्ट्रिकल जनरल भाग. परिभ्रमण क्षेत्राचा विकास (250 मी x 10 मी), एचएल प्लॅटफॉर्म, गोडाऊनचे बांधकाम. हमाल रूम, सीजीएस ऑफिस रूम, एसएम रूम, रिले रूम, आयपीएस रूम, गुड्स पीएफ पर्यंत शेड. लातूर येथे पिट लाइन. (पुनर्निमंत्रण). अंदाजे खर्च : रु. 92,50,212.67. बोली सुरक्षा : रु. 1,85,000/-. पूर्ण करण्याचा कालावधी : 18 महिने. ऑफरची वैधता : 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: 15/04/2025 15:00 वाजता. www.ireps.gov.in या वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे बोली सुरक्षा खर्चाचा भरणा केला जाईल.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जी),**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-52
रेल्वे फाटक को बंध स्थिति में पार करना मना है

## जाहीर समन्स

पुढील नेमली तारीख २३/४/२०२५
किरकोळ दिवाणी अपिल नं. ७६/२०२२
नि ३१

**बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. यांचे कोर्टात**

**विश्वनाथ संजय चंदनशिवे, वगैरे - अपेलंट**
**विरुध्द**
**हरिश्चंद्र अंबाजी बडवे (मयत), वगैरे १३ - रिस्पांडंट**

**प्रति,**
**विठ्ठल श्रीपती सोनवणे,**
वय ५२ वर्षे, धंदा-नोकरी.
रा.एस.टी. डेपो, भूम. ता.भूम, जि.धाराशिव
ह. मु. तुळजापूर ता. तुळजापूर, जि.धाराशिव

ज्याअर्थी यातील अपेलंटने तुमचे विरुध्द रे.मु.नं. ३१४/२००९ कामी झालेले हुकूमनामेवर अपिल केलेले आहे. सदर अपिलात नमूद पत्यावर तुम्ही आढळून येत नाहीत, तुमचा निश्चित असा ठावठिकाणा आढळून येत नाही, तुम्ही जाणीवपुर्वक पत्ता समजू देत नाहीत सदर अपिलाकामी तुम्ही रिस्पॉडंट नं.११ म्हणून सामील आहात तुमचेविरुध्द अपेलंटने अपिल आणलेले आहे.

त्याअर्थी तुम्हास सदर जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, आपण सदर दाव्याकामी हे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत अथवा पुढील नेमली ता. २३/०४/२०२५ रोजी स्वतः अगर माहितगार ॲडव्होकेट मार्फत हजर होवून आपले म्हणणे/कैफियत लिखीत स्वरुपात मा. न्यायालयात द्यावे. मुदतीत आपण हजर होवून आपली म्हणणे/कैफियत दिली नाहीतर आपणास सदर समन्सची बजावणी होवूनही आपणास कांहीही सांगावयाचे नाही असे समजून मा. न्यायालयाचे सदरकामी यथायोग्य हुकूम होतील याची नोंद घ्यावी.

सदरचे जाहीर नोटीस/समन्स आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे ता. १७/३/२०२५

**सही/-**
**क.लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, ता. बार्शी**

## तहसिल कार्यालय बार्शी

**(कूळ कायदा शाखा)**

दुरध्वनी क्र. (०२१८४)२२२२१३ email - tahbarshi@gmail.com

क्र. कुळकायदा/१४/एसआर.०२/२५ दिनांक - २१/०३/२०२५

**जाहीर समन्स / वृत्तपत्राद्वारे**

**प्रति,**
**शिरीष पांडुरंग भोसले**
**रा. रुई ता, बार्शी - अर्जदार / वादी**
**विरुध्द**
**दस्तगीर राजूभाई मुसलमान**
**रा. रुई ता, बार्शी - सामनेवाला / प्रतिवादी**

**मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशी**

**- दावा जमीनीचे वर्णन -**

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | पो.ख. | आकार |
|---|---|---|---|---|
| रुई | ३६ | २.७९ | ०.०२ | ४.३१ |
| | ४२ | ०.५८ | ०.०० | २.०० |

अर्जदार शिरीष पांडुरंग भोसले रा. रुई ता. बार्शी यांनी दावा जमीनीचे इतर अधिकारातील दस्तगीर राजूभाई मुसलमान स.सा.कुळ यांचे कुळ म्हणून असलेले पोकळ नाव कमी करून मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम १४ व १५ अन्वये चौकशीचे तारीख दि.२०/०३/२०२५ रोजी ठेवण्यात आलेली होती. तथापि प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले आहेत. तसेच ग्राम महसूल अधिकारी रुई यांनी प्रतिवादी हे रुई येथे रहात नसलेने नोटीस बजावणी करता येत नसलेबाबत अहवाल पंचनामासह सादर केलेला आहे. त्यामुळे त्यांचा सद्याचा पत्ता समजून येत नसलेने या जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद प्रतिवादी हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या सुनावणीकामी हजर रहावे. सदर दाव्याची पुढील सुनावणीची तारीख दिनांक २४/०४/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसील कार्यालय बार्शी येथे नेमणेत आलेली आहे. तरी तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्यांमार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह हजर रहावे. जर तुम्ही सदर दिवशी व वेळी हजर झाला नाही तर तुमचे गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

शिक्का

**सही/-**
**तहसिलदार बार्शी**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः सोलापूर शहर येथील व तसेच संपूर्ण सोलापूर जिल्हा परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, **मिळकतीचे वर्णन :-** डि व सब डि सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर भाग सोलापूर मौजे वडगांव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं. १५४/१, क्षेत्र १ हे. २१ आर आकार रु. ० रु. ८० पैसे इतकी शेतजमीनीचे जमिनीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | गावाचे नांव | गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १ | वडगांव | १५४/१ | १.२१ | ०.८० |

यांसी चतुःसिमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस -गट नं. १५३, दक्षिणेस :- गट नं. १५२/२, पश्चिमेस :- रस्ता, उत्तरेस :- गट नं. १५४/१ चे उर्वरित शेतजमीन (अनुसया उर्फ अनिता महादेव कुरणे यांची शेतजमीन)

येणेप्रमाणे वरील चतुःसिमेतील मिळकत त्यामधील दगड, माती, झाडे झुडपे, तदंगभुत वस्तुसह मालकी कब्जेवहिवाटीसह व सर्व हक्कासह सदर शेतजमीन ही भिमाशंकर गड्येप्पा अवटगी, रा. मु.पो. वडगांव, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांच्या मालकी व कब्जेवहिवाटीची आहे. अशी हमी व खात्री त्यांना आमच्या अशिलास दिलेले आहे व सदर शेतजमीन विक्रीस काढलेली आहे. सदरची शेतजमीन त्यांना आमचे अशिल सुशिलाबाई हणमंत रामपुरे, रा. वडगांव, ता. दक्षिण सोलापूर यांना खुषखरेदी देण्याचे ठरविलेले आहे. सदर व्यवहारापोटी आमचे अशिल व शेतजमीनीचे मालक नामे भिमाशंकर गड्येप्पा अवटगी यांच्यात इसारापोटी दि. २१/०३/२०२५ रोजी इसारापावती झालेले आहे.

तरी या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर कोणाचाही व कसल्याही प्रकारचा टाच, जप्ती, दान, गहाण, बोजा, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, विकसन करारपत्र, लिव्ह अ‍ॅन्ड लायसेन्स, इसारापावती, साठेखत, कब्जापावती, खरेदीखत, कुलमुखत्यारपत्र, कोर्ट हुकूमनामा, वारसाहक्क, सदर शेतजमिनीचे लगत असलेले शेतकरी व सदर शेतजमिनीचे चतुःसिमाबाबत वाद असल्यास अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आमचे अशिलांस खालील पत्त्यावर लेखी कागदपत्रांसह व कागदोपत्री पुराव्यासह हरकत कळवावी. मुदतीत कोणाचाही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग तद्नंतर कोणाचेही कसलेही हरकत आल्यास ती आमच्या अशिलांवर व सदर मिळकतीवर मुळीच बंधनकारक राहणार नाही.

ही जाहीर नोटीस दिली ता. २१/०३/२०२५

**सही/-**
**ॲड. दिपक ज्ञानेश्वर हुलसुरे**
**बी.ए. (ऑनर्स), एलएल.बी.**
**ऑफीस - सोरेगांव ता. उत्तर सोलापूर**
**जि. सोलापूर मो.नं. ९५७९३७५७३७**

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### साक्षी मलिकच्या कन्येचे नाव योशिदा



**नवी दिल्ली** : ऑलिंपिक कांस्यपदक विजेती आणि ट्रेलब्लेझर साक्षी मलिकने अलीकडेच एका नवीन अध्यायात पाऊल ठेवले - मातृत्व. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी साक्षीने एका कन्यारत्नाचे जगात स्वागत केले आणि अलीकडेच मुली म्हणजे वरून पाठवलेले देवदूत आहेत जे आपल्या हृदयात अंतहीन प्रेम भरण्यासाठी आहेत या शब्दांनी तिला अभिमानाने जगासमोर आणले. पण तिच्या मुलीचे नाव एक शक्तिशाली वारसा घेऊन जाते. साक्षीने तिचे नाव योशिदा कादियन ठेवले. मला मुलगीच हवी होती. जपानची महान कुस्तीपटू व तीन वेळची ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती साओरी योशिदा ही माझी आजीवन आदर्श आहे. योशिदाने मला स्वप्न पाहण्याची, कुस्ती खेळण्याची आणि जिंकण्याची प्रेरणा दिली. त्यामुळेच कन्येचे नाव योशिदाच्या नावावर ठेवले, असे साक्षीने म्हटले आहे. अलीकडेच साक्षीने समाजमाध्यमात एक हृदयस्पर्शी क्षण पोस्ट केला. या पोस्टमध्ये तिची मुलगी पहिल्यांदाच कुस्ती स्टेडियमला भेट देत आहे.

### चेन्नईतील रस्त्याला आर. अश्विनचे नाव

**चेन्नई** : भारताचा महान फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनला ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनने(जीसीसी) सन्मानित केले आहे. जीसीसीने एकमताने पश्चिम मांबालममधील रामकृष्णपुरम फर्स्ट स्ट्रीटचे नाव बदलण्याचा निर्णय घेतला आहे आणि आर. अश्विनच्या सन्मानार्थ या रस्त्याला या माजी भारतीय क्रिकेटपटूचे नाव देण्यात येणार आहे. या मार्गावरच अश्विनचे निवासस्थान आहे. कॅरम बॉल इव्हेंट अॅण्ड मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेडकडून मिळालेल्या विनंतीवरून या रस्त्याचे नाव बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. या मार्केटिंग कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिक यांनी अश्विनच्या भारतीय क्रिकेटमधील योगदानावर प्रकाश टाकला. आर. अश्विनने अनेक सामन्यांमध्ये भारत व तामिळनाडूचे प्रतिनिधित्व करत अनेक पुरस्कार जिंकले आणि प्रशंसा मिळविली. तो जगातील सर्वोत्तम अष्टपैलू खेळाडूंपैकी एक म्हणून ओळखला जातो, असे ग्रेटर चेन्नई कॉर्पोरेशनच्या ठरावात म्हटले आहे.

# आयपीएलचा १८वा हंगाम आजपासून



◆ **कोलकाता, २१ मार्च**

शनिवारपासून कोलकात्या ईडन गार्डन्सवर १८ व्या इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट हंगामाला प्रारंभ होणार आहे. आयपीएलमध्ये सहभागी दहा संघ विजेतेपदासाठी झुंजणार आहेत. नवीन नियम, नवीन कर्णधारांच्या कामगिरीवर प्रेक्षकांचे लक्ष असून दोन महिने चालणाऱ्या या क्रिकेट उत्सवात खेळाडूंचा आणि चाहत्यांचा तोच जोश व उत्साह कायम असणार आहे. शनिवारी ईडन गार्डन्सवर गतविजेत्या कोलकाता नाईट रायडर्स आणि कायमस्वरूपी अपयशी ठरलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात सलामीचा सामना खेळला जाणार आहे.

या सामन्यावर पावसाचे सावट असले तरीही सामना रोमांचक होण्याची आशा आहे. यंदा आयपीएलसाठी काही संघोचे कर्णधार बदलले आहे तसेच काही नियमांत सुधारणा करण्यात आलेली आहे.

सर्वात प्रमुख नियम बदलांपैकी एक म्हणजे लाळेवरील बंदी उठवणे. कोरोना महामारीनंतर पहिल्यांदाच गोलंदाजांना चेंडू चमकवण्यासाठी लाळेचा वापर करण्याची परवानगी दिली जाणार आहे. शिवाय एका सामन्यात ३ चेंडू वापरण्याची परवानगीही देण्यात आलेली आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने २०२२ मध्ये लाळेवरील बंदी कायमची केली होती, परंतु आयपीएल स्वतःच्या नियमांनुसार चालते व नवीनतम पाऊल जागतिक खेळासाठी एक आदर्श निर्माण करू शकते.

यंदाच्याा हंगामात नवीन व्यूहरचना सुद्धा पाहायला मिळणार आहे. नवीन आणि अनुभवी कर्णधारांमध्ये जोश प्रेक्षकांना दिसणार आहे.

सायंकाळच्या सामन्यांच्या दुसऱ्या डावात ११व्या षटकापासून नवीन चेंडू आणला जाणार आहे. त्यामुळे उच्च धावसंख्येच्या सामन्यांची परंपरा कायम राहण्याची शक्यता आहे. तथापि, हा नियम दुपारच्या खेळांना लागू होणार नाही.

याशिवाय डिसिजन रिव्ह्यू सिस्टीमचा (डीआरएस) विस्तार करून उंची रुंदी आणि ऑफ-साइड रुंदी समाविष्ट करण्यात आली आहे, त्यामुळे डिलिव्हरीजचा अधिक निष्पक्ष निर्णय घेता येतो. इम्पॅक्ट प्लेअर नियम अजूनही अस्तित्वात आहे. ◀(वृत्तसंस्था)

### आजचा सामना

**केकेआर वि. आरसीबी**
**स्थळ** : ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर

# नवीन नेतृत्वाखाली सात संघ खेळणार

◆ **कोलकाता, २१ मार्च**

नवीन नेतृत्वाखाली आयपीएल २०२५ मध्ये तब्बल सात संघ खेळणार आहे. त्यापैकी सर्वात आश्चर्यकारक म्हणजे रजत पाटीदार. रजतने भारतासाठी अद्याप एकही टी-२० सामना खेळलेला नाही, तो स्टार फलंदाज विराट कोहलीचा समावेश असलेल्या आरसीबी संघाचे नेतृत्व करतो.

अक्षर पटेलने दिल्ली कॅपिटल्सचे नेतृत्व स्वीकारले आह. या संघात भारताचा वरिष्ठ खेळाडू के. एल. राहुल सुद्धा आहे. तो २०२४ मध्ये लखनौ सुपर जायण्ट्ससोबतच्या आरपल्या अशांत कारकिर्दीतील निराशा दूर करण्याचा प्रयत्न करेल. २०२४ मध्ये केकेआरला वैभव मिळवून देणारा श्रेयस अय्यर पंजाब किंग्जसाठी कर्णधारपदाची धुरा सांभाळेल आणि त्याच्या जागी अजिंक्य रहाणे कोलकाता नाईट रायडर्स संघाचे नेतृत्व करणार आहे. संजू सॅमसनच्या बोटाच्या दुखापतीतून बरे होण्यास अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागला आहे. त्यामुळे राजस्थान रॉयल्स पहिल्या तीन सामन्यांसाठी रियान परागच्या अंतरिम कर्णधारपदासह हंगामाची सुरुवात करेल.रविवारी चेन्नई सुपर किंग्जविरुद्ध होणाऱ्या त्यांच्या अवे सलामीच्या सामन्यात मुंबई इंडियन्सचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करणार आहे. हार्दिक पांड्या गत हंगामात संथ गतीच्या षटकाच्यानियमाचे उल्लंघन केल्याबद्दल एका सामन्यासाठी निलंबित झाला आहे.

**ऋषभ पंत नवीन अध्यायाची सुरुवात करण्यास सज्ज**



एका जीवघेण्या अपघातातून निर्णायक पुनरागमन केल्यानंतर ऋषभ पंत आपल्या कारकिर्दीतील एका महत्त्वाच्या नवीन अध्यायाला सुरुवात करण्यास सज्ज झाला आहे. आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू - लखनौ सुपर जायण्ट्सने विक्रमी २७ कोटी रुपयांना विकत घेतले. तो आपल्या टीकाकारांची तोफ्लडे बंद करण्यास उत्सुक असेल. चॅम्पियन्स चषक व इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी संघात स्थान मिळवूनही, त्याला एकही सामना खेळायला मिळाला नाही. आता, त्याला विशेषतः टी-२० स्वरूपात भारतीय संघात आपले स्थान पक्के करण्यासाठी संघर्ष करावा लागला आहे.

पंतची स्फोटक फलंदाजी शैली आणि नेतृत्व कौशल्ये बऱ्याच काळापासून वादात आहेत आणि या हंगामात त्याला त्याच्या उच्च किमतीचे समर्थन करण्याची संधीच नाही तर भविष्यातील आंतरराष्टीय कारकिर्दीपूर्वी निवडकर्त्यांना एक मजबूत संदेश देण्याची संधी देखील आहे.

**बुमराहच्या तंदुरुस्तीवर मोठा प्रश्नचिन्ह**



बंगळुरूमधील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये परतलेला हा वेगवान गोलंदाज आयपीएलसाठी त्याची तयारी निश्चित करण्यासाठी त्याचे मूल्यांकन करत आहे. मुंबई इंडियन्सचे प्रशिक्षक महेला जयवर्धने आशावादी आहेत, पण सावध आहेत, कारण बुमराहची उपलब्धता केवळ मुंबई इंडियन्ससाठीच नाही, तर भारताच्या आगामी इंग्लंड दौऱ्यासाठी सुद्धा महत्त्वाची आहे.

**सहकारी कर्मचाऱ्यांमध्येही बदल**

विविध संघांच्या सहकारी कर्मचाऱ्यांच्या चमूमध्येही बदल झाले आहेत. रिकी पॉण्टिंग दिल्ली कॅपिटल्समधून पंजाब किंग्जमध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून गेला आहे. दिल्ली कॅपिटल्सच्या मुख्य प्रशिक्षकपदी पॉण्टिंगची जागा हेमांग बदानी यांनी घेतली आहे. केव्हिन पीटरसन दिल्ली कॅपिटल्समध्ये मार्गदर्शक म्हणून सहभागी झाला आहे, तर राहुल द्रविड राजस्थान रॉयल्समध्ये मुख्य प्रशिक्षक म्हणून परतला आहे, गत वर्षी भारताला टी-२० विश्वचषक जिंकून दिल्यानंतर हा त्याचा आयपीएल प्रशिक्षक म्हणून पहिलाच कार्यकाळ आहे.

सीएसकेचा अनुभवी ड्वेन ब्राव्हो केकेआरचा मार्गदर्शक असेल, तो गौतम गंभीरची जागा घेणार आहे. गंभीर आता भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक आहे.

**महेंद्र सिंह धोनीचा शेवटचा हंगाम?**



२०२० मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झालेला ४३ वर्षीय खेळाडू अजूनही एक गूढ आहे, तो केवळ आयपीएल दरम्यानच मैदानावर दिसला. तो जुन्या काळातील सातत्यपूर्ण सामना जिंकणारा खेळाडू नसला तरी, त्याची उपस्थिती चेन्नई सुपर किंग्जला बळकटी देते. त्याची तीक्ष्ण क्रिकेट बुद्धी, मैदानी खेळ आणि जलद खेळ संपवण्याची क्षमता त्याला एक अमूल्य ठेवा बनवते.

**वैभव सूर्यवंशीकडेही लक्ष**



त्याच्यापेक्षा बरोबर ३० वर्षांनी लहान असलेला वैभव सूर्यवंशी हा राजस्थान रॉयल्सने मिळवलेला एक विलक्षण फलंदाजी प्रतिभा आहे, पण तो किती सामने खेळतो हे बघणे शिल्लक आहे. गत वर्षी भारताच्या विजयी विश्वचषक मोहिमेनंतर विराट कोहली आणि रोहित शर्मा दोघांनीही टी-२० मधून निवृत्ती घेतली, ज्यामुळे आयपीएल २०२५ ही निवृत्तीनंतरच्या सर्वात लहान स्वरूपातील त्यांची पहिली मोठी स्पर्धा ठरली. आयपीएल २०२४ मध्ये सर्वाधिक ७४१ धावा करणारा कोहली आरसीबीचा प्रमुख फलंदाज आहे, तर रोहित शर्मा मुंबई इंडियन्ससाठी आपली जादू पुन्हा दाखवण्याचा प्रयत्न करेल. ◀(वृत्तसंस्था)

# आयपीएलमधील सर्वांत यशस्वी संघ

**मुंबई इंडियन्सने पाच आयपीएल जेतेपदे जिंकलीत** : २०१३, २०१५, २०१७, २०१९ व २०२०.

**चेन्नई सुपर किंग्जने पाच आयपीएल जेतेपद जिंकलीत** : २०१०, २०११, २०१८, २०२१ व २०२३.

**कोलकाता नाईट रायडर्सने तीन आयपीएल जेतेपद जिंकलीत** : २०१२, २०१४ व २०२४.

**सर्वाधिक खेळलेले सामने** : महेंद्र सिंह धोनी (सीएसके/आरपीएस) २००८ ते २०२४ - २६४ सामने, दिनेश कार्तिक : २००८ ते २०२४- २५७ सामने, रोहित शर्मा (डीसीएच/एमआय) २००८ ते २०२४ - २५७ सामने, विराट कोहली (आरसीबी) २००८ ते २०२४- २५२ सामने, रवींद्र जडेजा (सीएसके/जीएल/कोची/आरआर) २००८ ते २०२४- २४० सामने

**सर्वाधिक धावा:**
विराट कोहली (आरसीबी)- ८००४
शिखर धवन -६७६९
रोहित शर्मा (डीसीएच/एमआय)- ६६२८
डेव्हिड वॉर्नर (डीसी/एसआरएच)- ६५६५
सुरेश रैना (सीएसके/जीएल)- ५५२८

**सर्वाधिक वैयक्तिक धावा** : ख्रिस गेल ६६ चेंडूंत १७५ धावा पुणे वॉरियर्स विरुद्ध आरसीबी

ब्रेण्डन मॅक्युलम ७३ चेंडूत नाबाद १५८ धावा, केकेआर विरुद्ध आरसीबी,

क्विंटन डिकॉक ७० चेंडूत नाबाद १४० धावा, एलएसजी विरुद्ध केकेआर

एबी डिव्हिलियर्स ५९ चेंडूत नाबाद १३३ धावा, आरसीबी विरुद्ध एमआय

केएल राहुल ६९ चेंडूत नाबाद १३२ धावा, आरसीबी विरुद्ध किंग्ज इलेव्हन

**सर्वाधिक षट्कार**
ख्रिस गेल - ३५७
रोहित शर्मा २८०
विराट कोहली २७२
महेंद्र सिंह धोनी २५२
एबी डिव्हिलियर्स २५१

**सर्वाधिक बळी :**
युजवेंद्र चहल - २०५.
पीयूष चावला - १९२
ड्वेन ब्राव्हो - १८३
भुवनेश्वर कुमार - १८१
सुनील नरेन - १८०

**सर्वाधिक झेल :**
विराट कोहली- ११४
सुरेश रैना- १०९
केरॉन पोलार्ड - १०३ ◀(वृत्तसंस्था)

# सुकांत, आरती अंतिम फेरीत

## खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धा

### बॅडमिंटनमध्ये दोन पदके निश्चित



◆ **नवी दिल्ली, २१ मार्च**

येथे सुरु असलेल्या दुसऱ्या खेलो इंडिया पॅरा क्रीडा स्पर्धेत महाराष्टाच्या खेळाडूंनी शानदार कामगिरी करीत बॅडमिंटनमध्ये दोन पदके निश्चित केली. अंतिम फेरीत धडक दिलेल्या आरती पाटील आणि सुकांत कदमकडून आता सुवर्णपदकाची अपेक्षा आहे.

इंदिरा गांधी क्रीडा संकुलातील जिमनॅस्टिक हॉलमध्ये उपांत्य फेरीत २८ वर्षीय आरती पाटीलने हरयाणाची लतिका ठाकूर हिचे आव्हान २१-१८, २१-७ ने परतवून लावले. आता अंतिम फेरीत तिच्यासमोर भारताची अव्वल खेळाडू असलेली पॅरालिम्पिकपटू नित्याश्री हिचे आव्हान असेल.

पुरुषांच्या उपांत्य फेरीत सुकांतने हरयाणाच्या योगेशचा २१-१५, २१-१३ असा पराभव केला. अंतिम फेरीत त्याच्यासमोर तमिळनाडूच्या नवीनकुमारचे आव्हान असेल.

**लता उमरेकरला कांस्यपदक**

नांदेडच्या ३५ वर्षीय लता ताई उमरेकर हिने बॅडमिंटनमध्ये कांस्यपदक मिळवले. उपांत्य फेरीत तिला नित्याश्रीकडून २१-६, २१-४ असा पराभव पत्करावा लागला व तिला कांस्यपदकावर समाधान मानावे लागले. ◀(वृत्तसंस्था)

# संभव फाउंडेशनतर्फे रेशन किट वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च -**

पवित्र रमजान ईदनिमित्त गरजू बांधवांना संभव फाउंडेशनच्या वतीने धान्याच्या किटचे वाटप करण्यात आले.

सम्राट चौक परिसरातील जवळकर वस्ती येथील मुस्लिम बांधवांना हे रेशन किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी फौजदार चावडी पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या हस्ते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ माने, अशोक वाघमारे यांच्या प्रमुख उपस्थितीत किटचे वाटप करण्यात आले. या किटमध्ये शेवाया, गहू, मसूर दाळ, तूरदाळ, तेल, चहापती, साखर, रवा, तांदूळ असे साहित्य देण्यात आले. रमजान ईद निमित्त गोर-गरीब परिवारामध्ये संभव फाउंडेशन तर्फे एक सामाजिक उपक्रम करून रमजान ईदच्या उपस्थित असणाऱ्या भगिनींना गुलाब पुष्प देऊन शुभेच्छा देण्यात आल्या.

संभव फाउंडेशनचे अध्यक्ष आतिश सिरसट यांनी प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन रामेश्वर इराबत्ती यांनी केले. यासीन पटेल यांनी आभार मानले.



यावेळी शिवपुत्र घटकांबळे, आतिश लोंढे, महेश शिवशरण आदी मान्यवर उपस्थित होते

### हसन नवाजचे शतक, पाकिस्तानचा न्यूझीलंडवर विजय

**ऑकलंड** : शुक्रवारी सलामीवीर हसन नवाजने झळकावलेल्या विक्रमी पहिलल्या शतकाच्या बळावर पाकिस्तानने तिसऱ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडचा ९ गड्यांनी विजय मिळविला. या विजयाबरोबरच पाकिस्तानने पाच सामन्यांच्या मालिकेत आव्हान कायम राखले. त्यांनी न्यूझीलंडची आघाडी २-१ ने कमी केली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या न्यूझीलंड संघाला १९.५ षटकांत २०४ धावांत गुंडाळल्यानंतर पाकिस्तानने अवघ्या १६ षटकांत १ बाद २०७ धावा काढून आपला विजय साकार केला. आपल्या आंतरराष्टीय कारकिर्दीतील पहिल्या दोन सामन्यात शून्य धावा काढल्यानंतर हसन नवाजने ४५ चेंडूंत १० चौकार व ७ षट्कारांसह नाबाद १०५ धावांची शानदार खेळी केली.

# सोलापूर जि.प.च्या कामांना माहिती तंत्रज्ञानाची जोड

## विभागीय आयुक्त पुलकूंडवार यांचे गौरवोद्‌गार

## सोलापूर जिल्हा परिषदेला विभागीय आयुक्तांची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. २१ मार्च -**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामांना माहिती तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. मालमत्ता नोंदी, मनुष्यबळ व्यवस्थापन, शंभर दिवस अभियान या कामांनी माहिती तंत्रज्ञानाची जोड देण्यात आल्याचे पाहून विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकूंडवार यांनी कौतुकाची थाप टाकत सिईओ कुलदीप जंगम यांचे कामांचे कौतुक केले.

सोलापूर जिल्हा परिषदेने राबविलेल्या पुणेचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकूंडवार यांनी सोलापूर जिल्हा परिषेदेस भेट देऊन सुरू असलेल्या कामंची पाहणी केली. सोलापूर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्या हस्ते त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, शिक्षणाधिकारी कादर शेख, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जिल्हा कृषी अधिकारी हरिदास हावळे, जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव उपस्थित होते. प्रकल्प संचालक अमोल जाधव यांनी पंढरपूर तिर्थक्षेत्राच्या कामावर आधारित कॉफी टेबल बुक विभागीय आयुक्त पुंडकुलवार यांना भेट देऊन स्वागत केले.



सीईओ कुलदीप जंगम यांनी लाईव्ह संकेतस्थळावर जिल्हा परिषदेच्या मालमत्ता नोंदी, गुगलवरील स्थळांचे चित्रण, जिल्हा परिषदेच्या मनुष्यबळ व्यवस्थापन प्रणालीची माहिती दिली. समाज कल्याण विभाग अंतर्गत ८५०० अपंगानी विविध सुविधांसह घरपोच दिलेल्या सुविधांची माहिती दिली. यावेळी विभागीय आयुक्त यांनी जिल्हा समाज कल्याण विभागाने केलेल्या युआयडी कामाचे कौतुक केले.

या प्रसंगी जिल्हा परिषदे युनियनच्या वतीने चेअरमन डॉ. शत्रुघ्नसिंह माने यांनी आयुक्त पुलकूंडवार यांचे स्वागत केले तर मराठा सेवा संघ शाखा जिल्हा परिषदच्या वतीने अविनाश गोडसे यांनी विभागीय आयुक्त पुलकूंडवार यांना छावा कादंबरी देऊन स्वागत केले.

### सोलापूर जिल्हा परिषेदेचा चेहरा मोहरा बदलतोय

सोलापूर जिल्हा परिषदेने शंभर दिवस अभियानातील कामांना माहिती तंत्रज्ञानाची जोड दिली आहे. त्याच बरोबर अद्यावत सभागृहांचे नूतनीकरण , अभ्यागत व कर्मचारी यांचे भोजन व्यवस्थेसाठीच्या सुविधा, अभ्यागतांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, गार्डन आवार व हिरकणी कक्षाची फिरून पाहणी करून सिईओ कुलदीप जंगम यांनी केलेल्या कामांचे कौतुक केले. सर्व माहिती संकेतस्थळावर एका छताखाली आणली आहे. असेही विभागीय आयुक्त पुलकूंडवार यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचे संकल्पनेतील शंभर दिवस अभियानाची निगडीत विविध उपक्रमाचे पाहणी विभागीय आयुक्त पुलकूंडवार यांनी केली. केंद्र शासनाची सुसंवाद स्वच्छता तक्रार निवारण कार्यालयीन सोयी सुविधा कामकाजातील सुविधा अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण सेवा विषयक बाबी आणि कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान याचा वापर आर्थिक गुंतवणुकीस प्रोत्साहन नाविन्यपूर्ण उपक्रम यामध्ये शिखर जीवनमान कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा याबाबतची माहिती घेऊन त्यांनी सोलापूर जिल्हा परिषदेच्या कामाचे कौतुक केले.

# दिशा, सुशांतला, कुणी न्याय देता का न्याय?

(पान ४ वरून) ▶

याचिका न्यायालय स्वीकारेल का? स्वीकारली तर चौकशी कशाप्रकारे होईल? कारण याचिकाकर्त्यांनी चौकशी सीबीआयला सोपवण्याची विनंती केली आहे, तसेच सुनावणी देखील महाराष्ट्रात व्हावी असं म्हटलं आहे. कारण इथे आरोपींची दादागिरी चालते असा प्रश्न याचिकाकर्त्यांनी उपस्थित केला आहे. यावर माननीय न्यायालयाचे म्हणणे काय आहे हे पाहावे लागणार आहे. कदाचित आठवडाभरात न्यायालय यावर सुनावणी करू शकेल. आता प्रश्न उपस्थित राहतो की आताच ही याचिका दाखल का केली? काहींनी आरोप केलेत की महानगरपालिकेची निवडणूक जवळ येते म्हणून हा राजकीय डाव आहे. पुन्हा पूर्वीसारख्या गोष्टी चघळल्या जातील आणि विसरल्या जातील? यातील महत्त्वाचा मुद्दा आपण लक्षात घेतला पाहिजे तो असा की ओझा असतील, खान असतील, प्रभाकर सूर्यवंशी, अर्णब गोस्वामी किंवा नितेश राणे असतील हे सगळे लोक सातत्याने या प्रकरणाचा पाठपुरावा करत होते. नितेश राणे तर अधनमधनं हे प्रकरण जिवंत ठेवत होते. परंतु भाजपातले पहिल्या फळीतले नेते गप्प होते. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतानाही सरकारतर्फे या प्रकरणावर कारवाई करण्याचा दबाव टाकण्यात आला नाही किंवा पुढे जाऊन अशी कारवाई होईल याची लक्षणेही दिसली नाहीत आणि अचानक सतीश सालियान यांनी याचिका दाखल केली. ही याचिका अचानक दाखल झालेली नाही. नीलेश ओझा यांच्या चेहऱ्यावरील आत्मविश्वासाचे भाव स्पष्ट सांगून जातात की आता या प्रकरणाच्या मुळापर्यंत जाण्याची शक्यता आहे. आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी दिलेलीा व्यक्तव्ये देखील बोलकी आहेत. आक्रमक ठाकरे आता व्हिक्टिम झाल्यासारखे बोलत आहेत.

हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे गुन्हेगार कोण हे माननीय न्यायालय ठरवेल. खरंतर आपण कोणावरही गलिच्छ टीका करू नये किंवा कोणालाही क्लीन चिट देऊ नये. ते काम न्यायालयाचं आहे, ते त्यांनाच करू द्यावं. एक सामान्य नागरिक म्हणून आपण प्रार्थना करायला हवी की या प्रकरणाचा छडा लागून या दोन्ही मुलांना न्याय मिळायला हवा. मग कोणीही गुन्हेगार असोत. ते न्यायदेवतेसमोर समान आहेत. जर यावेळी न्याय मिळाला तर सर्वसामान्य गरीब आणि मध्यमवर्गीय लोकांना आशेचा किरण प्राप्त होईल. कारण न्याय हा गरिबांसाठी व सर्वसामान्यांनाही मिळतो हा संदेश यातून पोहोचेल. आम्हा जनतेला राजकारण नको, न्याय हवाय! विचार करा त्या बापाला काय वाटलं असेल ज्याची एक वयात आलेली मुलगी देवाघरी गेली. हा विचार महाराष्ट्रातील प्रत्येक बापाने करायला हवा. 'कुणी न्याय देता का न्याय' हे भाव सतीश सालियान यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहेत.

writerjayeshmestry@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संक्षिप्त वृत्त




### मेजर अक्रुर शिंदे यांना अँन्टी करप्शन बोर्ड दिल्लीचा महाराष्ट्र समाजरत्न पुरस्कार

**करमाळा दि.२१ मार्च-**

अँन्टी करप्शन बोर्ड भारत सरकार,नवी दिल्लीचे राज्यस्तरीय अधिवेशन नुकतेच सिन्नर जिल्हा नाशिक येथे आयोजित करण्यात आले होते . आणि या कार्यक्रमा दरम्यान झालेल्या सन्मान सोहळ्यामध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या पदाधिकाऱ्यांचा मानचिन्ह आणि प्रमाणपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. करमाळा तालुका आजी माजी सैनिक कल्याणकारी संघटनेचे अध्यक्ष, व सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष,श्री अक्रूर शंकरराव शिंदे यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर करमाळा तालुक्यातील विविध सामाजिक,राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मेजर अक्रूर शिंदे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### आकाश खुर्दच्या हत्येप्रकरणी न्यायासाठी आईसह पत्नीची मुख्यमंत्र्यांकडे धाव

**पिलीव, दि. २१ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील आकाश अंकुश खुर्द याची अतिशय अमानुषपणे हत्या केली. यामुळे आकाशचे कुटूंब अक्षरशः उघडयावर पडले आहे. खरेतर आकाशच्या खुनात प्रियशी, तिचा पती व तिचा भाऊ हे तिघेजणच आहेत असे पोलिसांकडून सांगितलं जात आहे. पण आकाशच्या आई व पत्नीला हे मान्य नाही. कारण या खुनात अजून बरेच जण सामील आहेत. पण पोलीस सध्या त्या दिशेने तपास करीत नाहीत. यामुळे संपूर्ण प्रकरणच सध्या संशयास्पद आहे. यासाठी आकाशची आई अनिता अंकुश खुर्द हिने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणीस यांच्याकडे याबाबत तक्रार केली आहे. या प्रकरणाचा ताबडतोब तपास लावून सर्व आरोपींना ताबडतोब अटक करुन कडक शिक्षा दयावी अशी मागणी अनिता खुर्द यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### भोसे येथे जनावरांच्या कारणावरुन एकास काठीने मारहाण; चौघा विरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा, दि.२१ मार्च-**

भोसे येथे जनावरे दारात बांधू नको म्हटल्याच्या कारणावरुन चिडून शिवीगाळी, दमदाटी करत एकास काठीने मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी रुपा सिताराम कोळी, अथर्व सिताराम कोळी, बटाट्या सिताराम कोळी, अमृता सिताराम कोळी या चौघाविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीसांच्या माहितीनुसार दि.१६ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता यातील फिर्यादीची सुन रुपा हि जनावरे आमचे दारात बांधू नका असे म्हणाल्यावर वरील आरोपींनी तेथे येवून त्यांनी तुमच्या दारात जनावरे का बांधू देत नाही असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी करीत काठीने फिर्यादीच्या उजव्या हातावर, पायावर मारहाण करुन जखमी केले. फिर्यादीची पत्नी गोकुळा हिस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. यशवंत भाऊ कोळी (वय ७५) यांनी फिर्याद दिली आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणी व सदस्यांची आज बैठक

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे व सर्व सेलचे जिल्हा पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, तालुका अध्यक्ष यांची शनिवार दि.२२ रोजी दुपारी दोन वाजता सोलापुरातील शासकीय विश्रामगृहात बैठक आयोजित केली असल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष बळीरामकाका साठे यांनी दिली. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या आदेशानुसार एक तास राष्ट्रवादीसाठी या उपक्रमांतर्गत ही बैठक आयोजित करण्यात आली असल्याचे सांगून जिल्हाध्यक्ष काका साठे म्हणाले की, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा आढावा या बैठकीत घेण्यात येणार आहे. त्यामुळे या बैठकीला पक्षाचे माजी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्यांनी तसेच माजी पदाधिकारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.जेणेकरुन यावेळी निवडणुकीच्या अनुषंगाने आढावा देखील घेण्यात येईल.तेव्हा सर्वांनी या बैठकीला उपस्थित राहावे.असे आवाहन जिल्हा अध्यक्ष साठे यांनी केले आहे.

### गुळमिरे विद्यामंदीरचे स्नेहसंमेलन उत्साहात

**बार्शी, दि. २१ मार्च-**

संतोष गुळमिरे प्राथमिक विद्यामंदीरचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून नगरपालिका शिक्षण मंडळ बार्शी प्रशासनधिकारी अनिल बनसोडे उपस्थित होते. यावेळी संतोष गुळमिरे, विजयकुमार गुळमिरे, तेजस्वीनी कथले, बसवेश्वर गाढवे, संतोष सुर्यवंशी, वनिता बुचुडे, सोनल गुळमिरे, मोहन बुचूडे, दिपक उंबरदंड उपस्थित होते. यावेळी मुलांनी खंडोबा नृत्य, देशभक्तीपर गीत, देवीचे गीत दिंडी गीत सादर करत पालकांची मने जिंकली.

## निधन वृत्त...

### शिवानंद स्वामी



**सोलापूर, दि. २१ मार्च-**

वर्धमान नगर अपार्टमेंट सोसायटीचे खजिनदार, अपार्टमेंट मधील मनमिळाऊ स्वभावाचे व्यक्तीमत्व, प्रसिद्ध व्यापारी शिवानंद मलकय्या स्वामी (वय ५५) यांचे शुक्रवारी पहाटे ५ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज सायंकाळी ५ वाजता त्यांच्या मुळ गावी चलगेरी, (ता. आळंद) जिल्हा गुलबर्गा येथे अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, तीन मुले, नातवंडे असा परिवार आहे. प्रसिद्ध व्यापारी, उद्योगजक संगनबसव स्वामी यांचे ते भाऊ होत.

### राजूबाई गुंडला



**सोलापूर, दि. २१ मार्च -**

जुना विडी घरकुल येथील रहिवासी राजूबाई काशिनाथ गुंडला (वय ८६) यांचे शुक्रवार, दिनांक २१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा शनिवार, दिनांक २२ मार्च रोजी सकाळी ९ वाजता राहत्या घरापासून निघणार आहे.

# कर वसुलीसाठी पंढरपूर नगरपरिषदेची धडक मोहिम

## २० थकीत मालमत्ता धारकांचे नळकनेक्शन तोडले

## थकीत मालमत्ता धारकांवर जप्तीची कारवाई करणार- मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२१ मार्च -**

पंढरपूर नगरपरिषदेने शहरातील थकित मालमत्ता धारकांना कराची रक्कम भरणेबाबत वारंवार लेखी मागणी बील व नोटीसद्वारे व स्पिकरद्वारे सुचना देवुन सुद्धा व जप्ती पुर्व नोटीस दिल्यानंतरही त्यांनी कराची रक्कम न भरल्याने त्यांच्या नावाची यादी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येईल अशा सूचना दिल्या होत्या व सदर मालमत्ता धारकांनी कराची रक्कम न भरल्याने शहरातील २० नळ कनेक्शन बंद करण्यात आल्याची माहिती मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव यांनी दिली.



**वीस मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन आले तोडण्यात**

या बरोबरच महाराष्ट्र नगरपलिका अधिनियम १९६५ मधील कलम १५२ मधील तरतुदी नुसार थकबाकी दारांना जप्तीची कारवाई करण्याची नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. तदनंतरही सदर मालमत्ताधारकाने थकबाकीची रक्कम न भरल्याने आज नगरपरिषदेने सुरु केलेल्या कर वसुली धडक मोहिमेमध्ये शहरातील वेगवेगळ्या भागातील एकूण २० मालमत्ताधारकांचे नळ कनेक्शन तोडण्यात आले आहेत. तसेच ज्या मालमत्ताधारकांची १० हजाराच्या पुढे थकबाकी आहे अशाही मालमत्ताधारकांची नावे वृत्तपत्रात लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असुन त्याच्या मालमत्तेची जप्ती करण्यात येणार आहे.

**जप्त मालमत्तेस नगरपरिषदेचे नाव लावण्याची तरतुद**

मालमत्ता जप्त केल्यानंतरही मालमत्ता धारकांने रक्कम न भरल्यास शासन निर्देशानुसार व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम १५६ मधील तरतुदीनुसार जिल्हाधिकारी यांच्या मंजुरीने सदर मालमत्तेस नगरपरिषदेचे नाव लावण्याची तरतुद करण्यात आल्याने अशा थकबाकीदार मालमत्ता धारकांवर याप्रमाणे कारवाई करण्याची संकेत मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव व कर अधिकारी सुप्रिया शिंदे यांनी दिले आहेत.

सदरची विशेष धडक मोहिम प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे व मुख्याधिकारी डॉ प्रशांत जाधव व उपमुख्याधिकारी अँड.सुनील वाळुजकर यांच्या मार्गदर्शनाखाली कर अधिकारी सुप्रिया शिंदे, भांडार व खरेदी पर्यवेक्षक विजय शहाणे, सहाय्यक कर निरीक्षक अंजली काबुगडे,वॉरंट लिपिक संभाजी देवकर , प्रशासकीय अधिकारी रवींद्र सूर्यवंशी, सहाय्यक कार्यालय अधीक्षक सुवर्णा हाके या पथक प्रमुखांच्या समवेत ८ वसुली लिपिक व चार शिपाई सहित जप्तीच्या कारवाईसाठी ४ पथके व ४ वाहने कार्यरत असल्याची माहिती कर अधिकारी सुप्रिया शिंदे यांनी दिली आहे .

**५२ टक्के वसूल झाला**

पंढरपूर शहरामध्ये एकूण २१ हजार ८२९ मालमत्ता धारक व ५ हजार झोपडपट्टी धारक आहेत. पाणीपट्टीसह ३१मार्च अखेर एकूण मागणी २५ कोटी ५३ लाख ७६ हजार ७०२/- रुपये आहे त्यापैकी २० मार्च २०२५ अखेर १३ कोटी १२ लाख ६३ हजार ०३२/- रुपये इतका वसूल झाला आहे व ३१ मार्च ०२५ अखेर १२ कोटी ४१ लाख १३ हजार ६७०/- रुपये येणे बाकी आहे. सद्या वसुलीची टक्केवारी पाहता ५२ टक्के वसूल झाला आहे.

**२५ कर्मचा-यांची ४ विशेष वसुली-जप्ती पथकं**

सदर वसुलीसाठी नगरपरिषदेतील २५ कर्मचा-यांची ४ विशेष वसुली-जप्ती पथकाद्वारे कर वसुलीलाठी धडक मोहिमे राबविण्यात येत आहे. कर वसुलीची मोहिम प्रभाविपणे राबविण्याच्या दृष्टीने शहरातील ५० हजाराच्या वर थकबाकी असणा-या २००० मालमत्ता धारकांची थकबाकीदारांची यादी तयार करण्यात आली असुन या थकबाकीदारांना पुरेशी व वाजवी संधी देवुनही त्यांनी थकबाकी रक्कम न भरल्याने अशा मालमत्ता धारकांची नावे वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल अशा सूचनाही दिल्या व स्पिकरद्वारेही त्यांच्या घरासमोर थकबाकीची रक्कम भरावी म्हणुन नावे पुकारण्यात आली आहेत.

# अवैध वाळू वाहतूक करणारे दोन टिपर पकडले

## महसूलच्या महिला अधिकाऱ्याची कारवाई; पाच जणाविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२१ मार्च**

अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिपर चालकाने दारुच्या नशेत वाहन चालवून महसूल अधिकाऱ्यांच्या कामात अडथळा आणल्या प्रकरणी टिपर चालक श्रीकांत सुभाष पवार (वय ३४ रा.वाढेगाव), अज्ञात टिपर चालक, धनाजी भाऊसाहेब जानकर (रा.सांगोला) व अज्ञात दोन इसम यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी, बठाण येथील भिमा नदी पात्रातील गाळमिश्रीत वाळूचा जाहीर लिलाव झाला असून वाळूची पावती घेणे बंधनकारक असताना काही वाहने बिगर पावतीची वाळू वाहतूक होत असल्याच्या तक्रारीवरुन नायब तहसिलदार शुभांगी जाधव यांनी दि.२१ रोजी दुपारी २ वाजता कारवाईची मोहिम हाती घेतली होती. शहरातील जुना टोलनाका सोलापूर रोडवर हे पथक कारवाईसाठी आले असता जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस



पथक एका विना नंबरप्लेट असलेल्या टिपरला थांबवून कारवाई करत असताना सदरच्या वाहनाचा चालक वाकड्या तिकड्या अवस्थेत वाहन चालविताना पोलीसांना मिळून आला. त्याने त्या चालकाची ब्रेथ अँनालायझर टेस्ट केली असता पॉझीटीव्ह आली. नायब तहसिलदार शुभांगी जाधव यांनी टिपरमध्ये काय आहे पाहिले असता त्यांच्या निदर्शनास वाळू असल्याचे दिसून आले. चालकाला याबाबत नाव विचारल्यावर श्रीकांत पवार (रा. वाढेगाव) असे सांगितले. सदरचे वाहन व अन्य एक बिगर पावती वाळूचे वाहन पोलीसांच्या मदतीने तहसिल कार्यालयाकडे घेवून जात असताना एका काळ्या रंगाची स्कॉर्पीओ एम.एच.१० बी.जी.७००५ मधून तीन व्यक्ती आले व खाली उतरुन त्यांनी ती वाहने माझी असून माझ्या सोबत अन्य माझे मित्र आहेत. बी.आर.०६ जी.बी.९०९२ हा टिपर माझा असल्याचे सांगितले. वाळूच्या परवनाबाबत विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले. त्यातील व्यक्ती टीपरमध्ये बसून टिपर चालू करुन जबरदस्तीने ताब्यातून घेवून पळून गेला व शासकीय कामात अडथळा आणला असल्याचे मंडलाधिकारी धनंजय इंगोले यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. दरम्यान भर दुपारी तीन वाजता टिपर चालकाने पळवून नेल्याने याबाबत उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. एका चालकाने नाव न छापण्याच्या अटीवर कालच नवीन टिपर खरेदी केला होता. पावती न फाडता केवळ एन्ट्री घेवून टिपर सोडल्याने माझ्यावर कारवाई झाली असल्याचे प्रसार माध्यमांना सांगितले.

# जीवे मारण्याचा प्रयत्न व अ‍ॅट्रॉसिटीमधून निर्दोष मुक्तता

**बार्शी, दि. २१ मार्च-**

माढा तालुक्यातील सापटणे येथील फिर्यादीने टेंभुर्णी पोलीस स्टेशनला फिर्याद दिली होती. फिर्यादीच्या तक्रारीनुसार त्याने आरोपीकडून तीन वर्षांपूर्वी रुपये दहा हजार हातउसने घेतले होते. त्यापैकी एक वर्षानंतर रुपये पाच हजार परत दिले. बाकी रुपये ५,०००/- देणे होते. दि. ४ डिसेंबर २०१९ रोजी फिर्यादीला आरोपीने एका किराणा दुकानासमोर उर्वरित रुपये ५,०००/- कधी देणार असे म्हणून त्याला बेदम मारले. त्यानंतर फिर्यादी घरी गेला. त्याच दिवशी रात्रीच्या सुमारास गावातील ओढ्याजवळ आरोपीने फिर्यादीवर कोयत्याने हल्ला केला. फिर्यादीच्या डोक्यात कोयत्याने वार केले. फिर्यादीचा मेहुणा त्या ठिकाणी आला व त्याने फिर्यादीची सोडवणूक केली. तसेच मोटरसायकलवर फिर्यादीला सोलापूर येथील दवाखान्यात ऍडमिट केले. सोलापूर येथे फिर्यादीवर औषधोपचार झाल्यानंतर फिर्यादीने आरोपीच्या विरुद्ध टेंभुर्णी येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला. गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यानंतर बार्शी येथील जिल्हा न्यायालयामध्ये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. सदर प्रकरणाची सुनावणी बार्शी येथील सत्र न्यायालयामध्ये झाली. सर्व साक्षीदारांचे जाबजवाब पाहून व युक्तीवाद ऐकून मे. सत्र न्यायाधीश यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली. सदर प्रकरणामध्ये आरोपीच्यावतीने अ‍ॅड. शिवाजी क्षीरसागर यांनी काम पाहिले.

# अक्कलकोट येथे ६१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ मार्च -**

मौनतपस्वी गुरू जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या अक्कलकोट येथील समाधान शिबिरात ६१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. १७० रुग्णांची नेत्र तपासणी झाली. यापैकी मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी ४० रुग्णांची निवड झाली. तसेच १३० जणांना चष्मे ही वाटप करण्यात आले. यावेळी ३०० रुग्णांनी शिबिराचा लाभ झाला.



येथील ग्रामीण रुग्णालयात मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन बसवलिंग महास्वामी यांच्या हस्ते हानगल कुमार शिवयोगी, मौनतपस्वी जडेय शांतलिंगेश्वर महास्वामी यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाले. यावेळी डॉ. नवीत जीवने, डॉ. गणेश इंदूरकर यांच्यासह ग्रामीण रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी यांनी योगदान दिले. यावेळी शांतवीर शिवाचार्य महास्वामी चलगेरी, मल्लिकार्जुन पाटील, महेश हिंडोळे, बसलिंगप्पा खेडगी, आनंद तानवडे, प्रथमेश म्हेत्रे, अमोलराजे भोसले, डॉ. अशोक राठोड उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी बसवराज माशाळे, दत्तकुमार साखरे, डॉ राजू मलंग, कांतू धनशेट्टी, श्रीकांत झिपरे, राजू एकबोटे, प्रमोद लोकापूरे, शेखर अडवितोटे, राजकुमार एकबोटे, डॉ. सुनील बिराजदार, सुरेश पाटील, शिवकुमार कापसे, ओंकार लोकापूरे, अभिजित लोके, प्रथमेश इंगळे, बाळकृष्ण म्हेत्रे, मलम्मा पसारे, सुवर्णा साखरे यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. पुलकुंडवार यांच्याकडून पंढरपूर-लोणंद रेल्वे प्रकल्पाच्या कामाचा आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

पंढरपूर-लोणंद रेल्वे मार्गाच्या क्षेत्राच्या संपादनाबाबत विभागीय महसूल आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी नियोजन भवन येथे आढावा घेतला. महसूल विभागाकडील नोंदी, गाव नकाशे तसेच भूमि अभिलेख यांच्याकडील नोंदी व नकाशे याद्वारे या रेल्वे मार्गाच्या क्षेत्राची तपासणी करण्यात यावी, असे त्यांनी सुचित केले.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, माळशिरसच्या उपविभागीय अधिकारी विजया पांगारकर, पंढरपूरचे उपविभागीय



अधिकारी सचिन इथापे, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक श्री. घोडके, रेल्वे विभागाचे अधिकारी तसेच मंडल अधिकारी व तलाठी उपस्थित होते. या रेल्वे प्रकल्पाचे भूसंपादनाबाबतचे जुने रेकॉर्ड रेल्वे विभागाकडे असू शकते त्या अनुषंगाने रेल्वे विभागाच्या रेकॉर्ड कार्यालयाने अभिलेखाची तपासणी करावी व ते रेकॉर्ड सोलापूर जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून द्यावे. सोलापूर जिल्हा प्रशासन चांगले काम करत असून रेल्वे विभागानेही त्यांना तेवढेच सहकार्य करावे, अशी सूचना डॉ. पुलकुंडवार यांनी केली.या रेल्वे प्रकल्पांतर्गत माळशिरस तालुक्यातील बारा व पंढरपूर तालुक्यातील ५ गावांचा समावेश आहे. सद्यस्थितीत जुन्या गावांची विभागणी झाल्याने माळशिरस तालुक्यात तीन गावे तर पंढरपूर तालुक्यात दोन गावे वाढलेली असून एकूण गावांची संख्या २० झाली आहे. हा रेल्वेमार्ग ब्रिटिशकालीन रेल्वे मार्ग आहे.

# भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करण्याची शिवसेनेची मागणी

## तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा

## तालुकाप्रमुख बुक्कानुरे यांचे निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२१ मार्च-**

अक्कलकोट तालुक्यातील कृषी विभागात भ्रष्टाचार वाढला असून अनुदान फाईल अडकून पडल्या आहेत. यामध्ये तालुका कृषी अधिकाऱ्यासह महाईसेवा केंद्र आणि दलालाचा समावेश आहे. भ्रष्टाचार करणाऱ्यावर तात्काळ कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शिवसेना तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी तहसीलदारांना एका निवेदनाद्वारे दिला आहे.



कृषी कार्यालयात शेततळे, फळबाग, विहीर ड्रिप , रोपवाटिका, पिकविमा प्रधानमंत्री शेतकरी सन्मान यासह अन्य कामात पैसे घेतल्याशिवाय कुठलीच फाईल कृषी विभागात क्लियर होत नाही. दुष्काळामुळे शेतकरी आधीच होरपळला आहे. एक युरिया किंवा डीएपी खत घेतल्यावर डुप्लिकेट खत घेण्यास दुकानदार भाग पाडतात. तालुक्यातील महा-ई-सेवा केंद्रवाले दहा रुपयाच्या कामासाठी हजार दोन हजार रुपये घेत आहेत. संबंधित महा-ई-सेवा केंद्रावरती गुन्हा दाखल करून कारवाई व्हावी अशी मागणी तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे यांनी केले आहे. पुरवठा विभागामध्ये रेशन कार्डधारक अन्नसुरक्षा कार्डसाठी चार ते पाच हजार रुपये जो देतो त्याचेच कार्ड मंजूर केले जात आहे.

शेतकऱ्याकडून नोंदी घेण्यासाठी व इतर कामासाठी भरमसाठ पैसे घेणारे मंडल अधिकारीवर कारवाई व्हावी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असे निवेदनात नमूद केले आहे. यावेळी तालुका संघटक शरण सुरवसे, शहर प्रमुख राम जाधव, मल्लिनाथ अर्वतकल, उप तालुका प्रमुख श्रीशैल स्वामी, शांतीलाप्पा कळसगुंडा , विभाग प्रमुख मृगेंद्र मुंडन कॅरी, मल्लिनाथ कल्याण, स्वामीनाथ प्रचंडे, सुनील धर्मशाली, आदित हिबारे, नागू शिंदे, चिनू पाटील, सिद्धू किणगे, सह शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# गुंजेगाव येथील दुहेरी खून प्रकरणी सर्व सात आरोपी अटकेत

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२१ मार्च**

गुंजेगाव येथील रिना आप्पासो ढोबळे (वय ३५) व चंद्रकांत तात्यासो पाटील (वय ४५,रा.राजापूर) या दुहेरी खून प्रकरणातील एकूण आत्तापर्यंत सात आरोपींना अटक करण्यात आली.

या घटनेची हकीकत अशी, गुंजेगाव येथे दि.११ मार्च रोजी वरील दोघांचा आरोपी लक्ष्मण ढोबळे, सतिश कारंडे, प्रदिप कारंडे, गणेश ढोबळे, निशांत ढोबळे, ज्ञानेश्वर खोळपे, कैलास कारंडे आदींनी दोघांच्या डोकीत कोयता, काठी, लोखंडी पाईप मारुन खून केला होता. सदर घटना घडताच पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी गुंजेगाव येथील घटनास्थळी भेट देवून फरार आरोपींना तात्काळ पकडण्याच्या सुचना केली. तपासिक अंमलदार, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी तपासाची चक्रे फिरवुन सर्व सात आरोपींना अटक केली. आरोपींकडून लोखंडी पाईप,काठ्या कोयता आदी साहित्य जप्त केले आहे. मयत रिना व चंद्रकांत या दोघात प्रेमसंबंध होते. तसेच मयत रिना हिच्या पतीचे चार ते पाच वर्षापुर्वी निधन झाल्याने तिच्या नावावर असलेली दोन एकर जमीन विकल्याने या रागापोटी आरोपींनी दोघांचा खून केल्याचे तपासात उघड झाले आहे. एकाच वेळी दोघांचा खून झाल्याने मंगळवेढा तालुका हादरुन गेला होता. सुरुवातीला न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी दिली होती. त्याची मुदत संपल्यानंतर पुन्हा आरोपींना न्यायालयात उभे केले असता चार दिवसाच्या पोलीस कोठडीत वाढ करण्यात आली आहे.

## संक्षिप्त वृत्त



### श्री चौडेश्वरी पतसंस्थेतील महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २० मार्च-**

श्री चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पतसंस्थेतील महिला कर्मचाऱ्यांचा आणि महिला संचालिकांचा सन्मान चौडेश्वरी पतसंस्थेचे चेअरमन विठ्ठल बडगंची व तोगटवीर समाजाचे अध्यक्ष नागनाथ कोंतम यांच्या हस्ते करण्यात आला या प्रसंगी व्हा. चेअरमन चंद्रकांत रंगम संचालिका उमा पुडूर, अंबिका उदगिरी, संचालक लक्ष्मीकांत उदगिरी, नरेंद्र बत्तुल, मोहन खंडे, विलास बडगंची, शंकर कोंतम, विष्णू म्याकल, अजय रंगम, भगवंत फलमारे, ॲड अंबादास कंदीकोंडा, व्यवस्थापक राजेंद्र उदगिरी, युवक संघटनेचे अध्यक्ष दत्तात्रय बडगंची उपस्थित होते.

### विद्या वाचस्पती शंकर अभ्यंकरांची देवी भागवतावर पाच दिवसांची प्रवचनमाला

**सोलापूर, दि. २० मार्च-**

कै. नागेश नीलकंठ सहस्त्रबुद्धे यांच्या प्रथम वर्ष स्मृतिसाठी विद्या वाचस्पती शंकर अभ्यंकरांची देवी भागवतावर २२ ते २६ मार्च या कालावधीत हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात पाच दिवसांची प्रवचनमाला संध्याकाळी सहा ते साडेआठ यावेळेत होणार आहे. सहस्त्रबुद्धे परिवारातर्फे आयोजित केली आहे. कै. नागेश नीलकंठ सहस्त्रबुद्धे यांचे गेल्या वर्षी वैष्णोदेवी येथे आकस्मिक निधन झाले. कै. नागेश यांनी सोलापुरात अनादी केटरर्सच्या माध्यमातून पहिले पोळीभाजी केंद्र सुरू केले. अत्यंत कष्टातून आपल्या व्यवसायाची भरभराट केली आणि अनेकांना रोजगार मिळवून दिला. समाजासाठी वैचारिक प्रबोधन कीर्तन महोत्सवाच्या माध्यमातून सहस्त्रबुद्धे परिवारातर्फे होतंच असतं. तशाच प्रकारचं प्रबोधन आदरणीय विद्या वाचस्पती शंकर अभ्यंकरांच्या देवी भागवत प्रवचन माले मधून होणार आहे.आदरणीय शंकर अभ्यंकरांचा व्यासंग खूपच मोठा आहे. त्यांची अध्यात्मिक विषयावरची साहित्य निर्मिती पण उल्लेखनीय आहे. या प्रवतनमालेचा भाविक श्रोत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन सहस्त्रबुद्धे परिवाराने केले आहे.





### डॉ. वाल्मीक कीर्तीकरची हॅटट्रिक; उत्कृष्ट जिल्हास्तरीय समन्वयक

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या वतीने करिअर कट्टाअंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात राज्य स्पर्धेत छत्रपती शिवाजी रात्र महाविद्यालयाला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले तसेच उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. वाल्मिक कीर्तीकर यांना उत्कृष्ट जिल्हास्तरीय समन्वयकाचे प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. सन २०२२- २३, २०२३- २४, आणि २०२४- २५ अशी सलग तीन वर्ष डॉ. वाल्मीक कीर्तीकर यांना करिअर कट्टाचा उत्कृष्ट जिल्हास्तरीय समन्वयकाचा प्रथम पुरस्कार मिळाल आहे. या तीन वर्षांमध्ये त्यांनी स्पर्धा परीक्षा आणि उद्योजकीय विकास या क्षेत्रात विद्यार्थ्यांसाठी भरीव कामगिरी केली आहे याची दखल घेऊन सदरील पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली होती. हा पारितोषिक वितरण समारंभ डी. बी. एफ. दयानंद महाविद्यालय आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने दयानंद महाविद्यालयात आयोजित केला होता.




### आंतरराष्ट्रीय संशोधन स्पर्धेत अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ द्वितीय

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

पंजाब येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्वेषण २०२४-२५ या संशोधन स्पर्धेमध्ये पीएच.डी कॅटेगरी मधून इंजिनिअरिंग व टेक्नॉलॉजी विभागामधुन स्मिता महेश पोरे या संशोधक विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक पटकावला. असोसिएशन ऑफ इंडीयन युनिव्हरसिटीच्या जनरल सेक्रेटरी पंकज मित्तल यांचे हस्ते पन्नास हजार रूपयाचा धनादेश व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी असोसिएशन ऑफ इंडीयन युनिव्हरसिटीचे जॉईंट डायरेक्टर अमरेंद्र पाणी, चितकारा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संधीर शर्मा, प्र कुलगुरू मधु चितकारा आदी उपस्थित होते. त्या आधी तिने विद्यापीठ स्तरावर प्रथम, राज्य अविष्कार व आंतरदेशिय (राष्ट्रीय) अन्वेशन वेस्ट झोनमधून (तृतिय) विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले आहे. शेवाळपासून ईथेनॉल (बायोडिझेल) निर्मिती हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे, त्याना ह्या संशोधनाला नुकतेच एक युके व जर्मनीचे पेटंटही मिळाले आहे. बाकी दोन पेटंट मिळण्याच्या मार्गावर आहेत. त्यांचे सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे यांनी तिचे अभिनंदन केले. अविष्कार कॉर्डिनेटर म्हणून प्रा.डॉ. विनायक धुळप व प्रा.डॉ. वनिता सावंत यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

## 'मुख्यमंत्री' १०० दिवसीय कृती आराखडा कार्यक्रमात

# राज्यस्तरावर सोलापूरचा प्रथम क्रमांक आणा

- विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार
- सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयांकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा
- प्रत्येक शासकीय कार्यालयाचा सहभाग बंधनकारक
- जिल्हाधिकाऱ्यांचा 'सनद वाटप' उपक्रम कौतुकास्पद
- सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही त्वरित बसवून घ्या
- उद्योग वाढीसाठी उद्योगस्नेही वातावरण करा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेप्रमाणे राज्यात सर्वत्र १०० दिवसीय कृती आराखड्याची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. सोलापूर जिल्ह्यात या अंतर्गत काम सुरू आहे.

या कार्यक्रमातून सर्वसामान्यांचा शासकीय कार्यालयाकडे पाहण्याचा पूर्वीचा नकारात्मक दृष्टिकोन बदलून सकारात्मक दृष्टिकोन व्हावा तसेच या कार्यक्रमांतर्गत राज्यस्तरावर सोलापूर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे, असे आवाहन विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित १०० दिवसीय कृती आराखडा कार्यक्रमाच्या आढावा बैठकीत पुलकुंडवार मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, उपजिल्हाधिकारी महसूल तथा प्रभारी उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्यासह सर्व संबंधित विभाग व कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले की, या शंभर दिवशी कृती आराखडा कार्यक्रमात जिल्ह्यातील राज्य शासनाच्या सर्व शासकीय कार्यालयानी सक्रिय सहभाग घेणे बंधनकारक आहे. जरी अद्याप पर्यंत याच सहभागी झालेले नाहीत अशा कार्यालयाने जिल्हा प्रशासनाशी संपर्क करून आराखड्यातील सात सुत्री कार्यक्रमाची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. सोलापूर जिल्हा प्रशासन या अंतर्गत चांगले काम करत असून या अंतर्गत राज्यस्तरावर जिल्ह्याचा प्रथम क्रमांक येण्यासाठी सर्व कार्यालय प्रमुखांनी अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे असे आवाहन त्यांनी केले.

या अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयाचा पोट खराबा जमीन तसेच बिगर शेती असलेल्या जमिनीसाठी सनद वाटप कार्यक्रम हा अत्यंत चांगला असून, राज्यातील इतर जिल्ह्यापेक्षा वेगळा व लोकांसाठी खूप महत्त्वपूर्ण कार्यक्रम असल्याचे डॉ. पुलकुंडवार यांनी सांगून अभिलेखासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करून त्या अनुषंगाने अभिलेखाचे निंदनीकरण व सुसूत्रीकरण केले जात असल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले. त्याप्रमाणेच सोलापूर जिल्हा परिषद तसेच महापालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही बसवून घेण्याची कार्यवाही त्वरित पार पाडावी. यासाठी आवश्यक निधी शासकीय तसेच सीएसआर फंडातून उपलब्ध करून घ्यावा, असेही त्यांनी सूचित केले.

जिल्ह्यात गुंतवणूक झाल्यानंतर उद्योग वाढ मोठ्या प्रमाणावर होऊ शकते त्या अनुषंगाने गुंतवणूक तसेच पायाभूत प्रकल्पासाठी कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही असे प्रयत्न केले पाहिजेत. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्हा प्रशासन १०० दिवशी कृती आराखड्या अंतर्गत करत असलेल्या कामकाजाची सविस्तर माहिती दिली. तसेच नाविन्यपूर्ण काम काजाची ही माहिती त्यांनी दिली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती सादर केली.

## तेरा वर्षानी मिळणार पगार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**



सोलापूर जिल्ह्यातील चांगदेव पाटील विद्यालय, दहिटणे तालुका बार्शी येथील सहशिक्षक विक्रम काळे व भाग्यश्री साबळे यांचा शालार्थ आयडी तीन दिवसांच्या उपोषणानंतर मिळाला असल्याची माहिती प्रहार शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सचिन नागटिळक यांनी दिली.

एक जानेवारी २०२३ पासून शासनाने २० टक्के टप्पा अनुदान दिले होते . परंतु शालार्थ आयडी नसल्याने काळे व साबळे हे गेल्या तेरा वर्षापासून वेतनापासून वंचित होते. शालार्थ मिळण्यासाठी त्यांनी गेल्या दीड वर्षापासून पाठपुरावा केला होता. परंतु उपसंचालक कार्यालयाने त्रुटी काढल्याने त्यांचा शालार्थ रखडला होता.शालार्थ मिळावा या मागणीसाठी प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग पुणे येथे १८ मार्च पासून सहकुटुंब बेमुदत उपोषण केले होते. उन्हातील या तीव्रतेची दाखल घेवून अखेर तीन दिवसांनी सर्व कागदपत्रांची त्रुटी पूर्तता करून मूळ कागदपत्रे, रोस्टर पाहून त्याना शालार्थ देण्यात आला. शालार्थ मिळाल्याने त्यांच्या वेतनाचा मार्ग मोकळा झाला आहे. वेतन मिळणार असल्याने त्यांचा तेरा वर्षांचा वनवास संपला असल्याची भावना काळे व साबळे यांनी व्यक्त केली. यासाठी वरिष्ठ लिपिक मयूर प्रधान, शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, उपसंचालक हारून आतार यांनी सहकार्य केल्याची भावना नागनाथ साबळे यांनी व्यक्त केली. प्रहार शिक्षक संघटनेच्या उपोषणात जिल्हाध्यक्ष सचिन नागटिळक, विक्रम काळे, कोमल काळे त्यांची मुले, नागनाथ साबळे, सोमशेखर केशेट्टी, निलेश माने, मालकप्पा ढब्बे आदि उपस्थित होते.

## क्षयरोग दिनानिमित्त सोमवारी विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम अंतर्गत महापालिकेच्या वतीने २४ मार्च जागतिक क्षयरोग दिन निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात येतात. हुतात्मा स्मृती मंदिरात दुपारी ३ वाजता कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात आरोग्य कर्मचारी, रुग्ण यांचा मेळावा, रोगमुक्त झालेल्यांचा सन्मान करण्यात येणार आहे, अशी माहिती मनपा आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहरात जवळपास १६९६ रुणांवर सध्या उपचार सुरू आहेत. नियमित थुंकी तपासणी गरजू रुग्णांच्या क्ष किरण तपासण्या केल्या जातात. नवीन अभियानात आत्तापर्यंत ८७४ नवीन शहर रुग्ण शोधण्यात आले आहेत. नियमित औषध उपचार घेतले तर रुग्ण रोगमुक्त होऊ शकतो. सोलापूरकरांनी टीव्हीवर मात करण्याच्या या राष्ट्रव्यापी संकल्पनेत स्वतःहून पुढे येऊन योगदान द्यावे, असे आवाहन आरोग्य अधिकारी राखी माने यांनी केले आहे.



सन २०२५ च्या जागतिक क्षयरोग दिनाचे घोषवाक्य ''होय। आपण क्षयरोग निश्चित संपवू शकतो, प्रतिज्ञा करा, तरतूद करा, सेवा द्या''. राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त अभियान, निक्षय शिबीरे आयोजीत करण्याची योजना केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांनी तयार केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३० जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे. यामध्ये सोलापूर महानगर पालिका कार्यक्षेत्राची निवड करण्यात आलेली आहे, असे डॉ. अरुंधती हराळकर यांनी सांगितले. शहर क्षयरोग केंद्राकडून सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रा मधील अतिजोखमीच्या सर्व ठिकाणी दि.२४ मार्च २०२५ पर्यंत १०० दिवसीय क्षयरोग मुक्त अभियान अंतर्गत निक्षय शिबीरांचे आयोजन केले असून, या ठिकाणी निक्षय वाहन मधून विविध तपासण्या करुन क्षयरुग्ण शोध मोहिम चालू आहे. निक्षय मित्र बनून क्षयरुग्णांना पोषण आहार देऊन क्षयरुग्णांना व सोलापूर शहराला क्षयमुक्त करण्यास मदत करावी, असे आवाहन डॉ. माने यांनी केले आहे.

## घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरचा अवैध वापर थांबवा

▸ ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनची मांगणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरचा होणारा अवैध वापर थांबवा, अशी मागणी ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशनचे प्रशासकीय अधिकारी प्रशांत जामगडे यांनी पत्रकार परिषदेत केली.

जिल्ह्यामध्ये घरगुती गॅस सिलेंडरचा उपयोग अवैधप्रकारे ऑटो रिक्षा तसेच व्यावसायिक आस्थापनांमध्ये मोठ्या प्रमाणात होत आहे. अशा ठिकाणांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे. घरगुती गॅसच्या अवैध वापरामुळे जिल्ह्यात एखादा मोठा स्फोट होण्याचा धोका आहे. संबंधित विभाग त्यावर योग्य ती कार्यवाही करण्याकरीता टाळाटाळ करत असतात, असा आरोप त्यांनी केला आहे. जर स्फोट होऊन निष्पाप नागरीकांच्या जीवाला काही बरे वाईट झाले तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? हा एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. घरगुती सिलेंडरवर ५ टक्के जीएसटी आकरण्यात येते तसेच व्यावसायिक सिलेंडर व ऑटो एलपीजी यावर १८ टक्के जीएसटी आकरण्यात येते. या सर्व अवैध प्रकारामुळे महसुल विभागाला १३ टक्के जीएसटीचे थेट नुकसान होत आहे. हा सर्व काळाबाजार आटोक्यात आणला तर सामान्य नागरीकास सिलेंडर ३०० रुपयामध्ये सुद्धा मिळु शकतो. घरगुती गॅससिलेंडरचा काळाबाजार नक्की कुठून होतो?

या पत्रकार परिषदेस रविंद्र ब्राम्हणे, कृष्णा पवार, सोमनाथ पवार उपस्थित होते.

## सिंहगडमधील कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्तांनी केले मार्गदर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**



एन बी नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात महापालिकेच्या स्वच्छतेची कार्यशाळेत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी गुरुवारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कचरा वर्गीकरणाच्या प्रकाराविषयी माहिती दिली.

यावेळेस सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, उपप्राचार्य डॉ. शेखर जगदे, डॉ. रवींद्र व्यवहारे, प्रा. माणिक शिंदे, महापालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

अतिरिक्त आयुक्त रवी यांनी शहर स्वच्छतेसाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. ओला कचरा, सुका कचरा, घरगुती घातक कचरा, सॅनिटरी कचरा अशा कचरा वर्गीकरणाचे प्रकार आणि त्याचे महत्त्व याविषयी दृकश्राव्य माध्यमातून माहिती दिली. महापालिकेच्या स्वच्छता विभागात कर्मचाऱ्यांची अपुरी संख्या असल्याने साडेबारा लाख लोकसंख्या असलेल्या शहराची स्वच्छता प्रभावीपणे होत नाही. त्यासाठी आवाहन केल्यानुसार स्वयंसेवी संस्थेसह शहरवासीयांना सहकार्य केल्याने शहर स्वच्छतेसाठी मदत होत आहे. कचरा वर्गीकरण, घंटागाडीतच कचरा टाकावा यासह स्वच्छता जनजागृतीसाठी शाळा, महाविद्यालयात जावून महापालिका प्रबोधन करीत आहे. याच अनुषंगाने अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि त्यांच्या पथकाने सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात येऊन मार्गदर्शन केले. ही कार्यशाळा कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्वच्छतेची विविध उपक्रमाची माहिती देत स्वच्छतेची शपथ घेऊन कार्यक्रमाचा समारोप झाला.

**स्वच्छतेसह ग्रीन बिल्डिंगविषयी कौतुक**

प्राचार्य डॉ. शंकर नवले यांनी महाविद्यालयातील सांडपाण्याचा पुनर्वापर करुन साडेतेरा हजार झाडांना देत असल्याचे सांगत ग्रीन बिल्डिंगविषयी माहिती दिली. यावर अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी आपल्या भाषणात सिंहगड महाविद्यालयातील स्वच्छता आणि शिस्तीचे कौतुक केले. प्रवेशद्वारापासून संपूर्ण परिसरात स्वच्छता आणि प्लास्टिकचा वापर आढळून न आल्याने कौतुक केले.

**इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल**

अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी आपणही इंजिनिअरिंगचा विद्यार्थी असल्याचे सांगत आता एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) च्या वापरामुळे इंजिनिअरिंग विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल होणार असल्याचे सांगितले. एआयमुळे बेरोजगारी वाढणार नसल्याचे ठामपणे सांगितले. आता शेती सुधारणेत, ऊस लागवड पद्धतीत एआयचा वापर होत आहे. नुकतीच पुण्यात यावर परिषद झाल्याचे सांगितले.

## अंगणवाडी सेविकांना मिळणार प्रोत्साहन भत्ता

● लाडक्या बहिणींचा अर्ज भरण्यास मदत करणाऱ्यासांठी १ कोटी ३७ लाख प्राप्त

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरलेल्या अंगणवाडी सेविकांच्या प्रोत्साहन भत्त्यापोटी जिल्ह्याच्या महिला व बालविकास विभागाला १ कोटी ३७ लाख ७७ हजार ७०० रुपये प्राप्त झाले आहेत.

अंगणवाडी सेविकांना पुढील आठवड्यात मिळण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस, महा ई सेवा केंद्र चालकांनी लाडक्या बहिणींचे अर्ज भरले होते. सरकारने प्रत्येक अर्जासाठी प्रोत्साहन भत्ता म्हणून ५० रुपये देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार प्रशासनाकडून राज्याकडे निधीची मागणी करण्यात आली होती. ९ महिन्यां पासून अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता मिळाला नव्हता. ग्रामीण भागात अर्ज भरताना अंगणवाडी सेविका व मदतनिसांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले होते. अनेकदा ऑफलाइन माहिती घेऊन रात्री उशिरापर्यंत किंवा पहाटे ऑनलाइन माहिती भरण्याचे काम त्यांना करावे लागले होते. लाडक्या बहिणींना लाभ वाटप सुरू होऊनही कामाचे पैसे मिळण्यास इतका विलंब झाल्याने त्यांच्याकडून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

आता महिला व बालविकास विभागाकडे निधी प्राप्त झाले असून येत्या दोन दिवसांत बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांकडे निधी वर्ग करण्यात येणार आहे. पुढच्या आठवडयात अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.



## शिवसेना उबाठाच्यावतीने नागपूर घटनेचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने नागपूर येथे दिनांक १७ मार्च रोजी उसळलेल्या हिंसाचाराच्या घटनेचा निषेध करण्यात आला आहे.

या हिंसाचारात अनेक पोलीस कर्मचारी जखमी झाले असून, सार्वजनिक आणि खासगी मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नागपूरमधील या घटनांचा शहर आणि जिल्ह्यात कोणताही नकारात्मक परिणाम होऊ नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती दक्षता घ्यावी. तसेच नागपूर शहरातील सामान्य नागरिक आणि पोलीस कर्मचारी यांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावी सुरक्षा व्यवस्था उभारण्यात यावी. या हिंसाचारात जे दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकड— निवेदनाद्वारे केली आहे.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापुरात रविवारी वकिलांची राज्यस्तरीय परिषद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

सोलापूर बार असोसिएशनच्या वतीने येत्या सोलापुरात रविवार दि. २३ मार्च रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात एक दिवसीय वकिलांची राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती अध्यक्ष एड. विजय शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.या परिषदेसाठी राज्यभरातून एक हजारावर वकील व्यावसायिक उपस्थित राहणार आहेत. याचे उद्घाटन न्यायाधीश अभय ओक यांच्या हस्ते होणार असून विविध सत्रात नामवंत कायदेतज्ञ आपले विचार विविध विषयांवर मांडणार आहेत. सकाळी आठ वाजता परिषद सुरू होईल. सायंकाळी पाच वाजता समारोप होणार आहे. या पत्रकार परिषदेस एड. मनोज पामुल, एड. विनायक कटारे आदी उपस्थित होते.



## ▶▶ क्राईम वृत्त...




### मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी एका जाणाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना १६ मार्च रोजी रात्री आठ वाजून दहा मिनिटाच्या सुमारास बाळे येथे घडली.याप्रकरणी विश्रांती चंद्रकांत बेळ्ळे (वय-३०,रा.मु.पोस्ट कुमठे गाव) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून महबूब अब्दुल शेख (वय-२१,रा.मु.पो. कंदलगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत अधिक माहिती अशी की,बार्शी ते सोलापूर रोडवरील बाळे येथे दुचाकी क्रमांक एमएच.१३.ईई.८६०६ यावरील्ड महबूब शेख याने पायी चालत जाणाऱ्या फिर्यादी यांची आई शारदा विभुते (वय-५६,रा.बाळे) यांना महबूब याने भरधाव वेगात मोटरसायकल चालवून धडक देऊन गंभीर जखमी करत त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादित नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार कसबे हे करीत आहेत.

### एटीएममध्ये अडकलेले पैसे काढून देतो म्हणून ४० हजाराला गंडा

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

पांजरापोळ चौक येथील एटीएम सेंटर मधील मशीन मध्ये फिर्यादी आयेशा सादिक शेख (वय-२०,मु.पो.कळमण) यांचे अडकलेले पाचशे रुपये काढून देतो असे म्हणत अज्ञात इसमाने आयेशा यांचा विश्वास संपादन करून तेथील बँक ऑफ महाराष्ट्राचे एटीएम कार्ड घेऊन पिन टाकून कार्डची अदलाबदली करून परस्पर एटीएम मधून फिर्यादी यांच्या बँक खात्यामधून चाळीस हजार रुपये काढून त्यांची फसवणूक केली आहे.याप्रकरणी आयेशा शेख यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १८ मार्च रोजी दुपारी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास पांजरापोळ चौक येथे घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.

### हॅन्डल लॉक केलेली दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

जुनी मिल चाळ येथे हॅण्डल लॉक करून ठेवलेले दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीडी.५०२३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची फिर्याद प्रभाकर अशोक चौगुले (वय-४१,रा.मु.पोस्ट मुंढेवाडी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना १५ मार्च रोजी सकाळी दहा ते दहा वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने घरासमोरून दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

घरासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीएल.९५६७ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १९ ते २० मार्च दरम्यान रविवार पेठ येथे घडली.याप्रकरणी प्रभाकर राम कांबळे (वय-५१,रा.रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार बाबर हे करीत आहेत.

### चोरट्याने घरात प्रवेश करून सोन्या-चांदीचे दागिने पळविले

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

उघड्या दरवाज्यातून कोणीतरी अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून बेडरूम मधील कपाटातील ७ लाख २६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे व चांदीचे दागिने चोरून नेल्याची घटना १७ नोव्हेंबर २०२४ ते २० मार्च २०२५ दरम्यान न्यू पाच्छा पेठ अशोक चौक येथे घडली.याप्रकरणी श्रीनिवास यल्लप्पा पोशम (वय-५६,रा.न्यू पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञान चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोसई. मोरे हे करीत आहेत.

# शहरातील २८ अनियमित बांधकामे पांडणार : मनपा आयुक्त ओंबासे

**एकूण तब्बल ९६ बांधकामे आहेत अनियमित**

**पनाशसह अनधिकृत बांधकामे आयुक्तांच्या रडावर**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च -**

महापालिकेतील बोगस बांधकाम परवाना प्रकरणातील एकूण ९६ पैकी २८ बांधकामात नियमितता निदर्शनास आली आहे. ही २८ बांधकामे पाडण्याशिवाय पर्याय नाही. या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महापालिकेत बांधकाम परवाना विभागात कार्यरत नसतानाही म हापालिकेतील तत्कालीन उप अभियंता जाकिर नाईकवाडी, श्रीकांत खानापुरे, क्षीरसागर आणि घाटे अशा चौघांनी बांधकाम परवानगीची समांतर प्रक्रिया बाहेर राबवून बनावट शिक्याचा वापर करून तब्बल शहर- हद्दवाढ भागातील तब्बल ९६ प्रकरणात बांधकाम परवानगी दिली होती. या व्यतिरिक्त आणखीही अनेक प्रकरणे तशीच आहेत. हा प्रकार उजेडात येताच प्रथम महापालिका प्रशासनाने चौघांना निलंबित आणि नंतर सक्तीने सेवानिवृत्ती दिली होती. तर एकाच दंडात्मक कारवाई केली होती. मात्र सदर बाजार पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. या प्रकरणी काही जणांना अटक केली झाली आहे. दरम्यान, या प्रकरणी विचारले असता महापालिका आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी ही माहिती दिली. या अनियमित २८ बांधकामांमध्ये साईड मार्जिन सोडणे यासह विविध नियम पाळण्यात आले नाही. यामुळे बांधकामे पाडावी लागणार आहेत, उपलब्ध नस्तीम धील नकाशावरून छाननी केले असता अनियमितता निदर्शनास आली आहे, असेही आयुक्तांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर, उपायुक्त आशिष लोकरे आदी उपस्थित होते.

### ड्रेनेज, जलवाहिनी दुरुस्ती कामासाठी रोबोटचा वापर

सोलापूर शहरातील ड्रेनेज आणि जलवाहिनी दुरुस्तीच्या कामासाठी रोबोटचा वापर करण्यात येणार आहे. त्या संदर्भात माहिती घेण्यात आली आहे. सुरुवातीला दोन रोबोट वापरण्यात येणार आहेत. यासाठी यंदाच्या अंदाजपत्रकात तीन कोटीची तरतूद करण्यात येत आहे. आयआयटी मद्रासने हे रोबोट प्रमाणित केले आहे. या दोन्ही दुरुस्तीच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात रस्ता खोदण्यात येतो. ते टाळण्यासाठी मदत होणार आहे.

### उत्पन्न वाढीसाठी विविध उपाययोजना आणि पर्याय

सोलापूर महापालिकेचे उत्पन्न वाढावे यासाठी विविध उपाय योजना आणि पर्याय शोधण्यात येत आहेत. शहरातील नव्या मिळकती आणि नळ शोध मोहीम ही राबविण्यात येणार असून नवे तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे. महापालिकेचे मिनी व मेजर गाळे यांची थकबाकी वसुलीसाठी ही यावेळी सूचना केल्या. बड्या थकबाकीदारांना नोटिस बजावण्याचे आदेश दिले. कन्सल्टंट नेमून महापालिकेची स्वतंत्र यंत्रणा उभारण्याचा प्रयत्न आहे, असेही आयुक्तांनी सांगितले.

### पनाश बांधकाम प्रकरणी माहिती मागवली

विजापूर रोडवरील बहुचर्चित पनाश टॉवर प्रकरणी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी तत्काळ माहिती मागवली आहे. याप्रकरणी चुकीच्या पद्धतीने बांधकाम परवानगी दिली असल्यास म हापालिकेतील तत्कालीन संबंधित अधिकाऱ्यांनाही नोटीसा बजावण्यात याव्यात. डेव्हलपमेंट प्लॅन नुसार बांधकाम केले नसल्यास ते रद्द होते. या प्रकरणातील पॉवर ऑफ ॲटर्नीची खातर जमा करावी. संबंधितांना नोटीसा बजावण्यात याव्यात. माहिती घेऊन गुन्हा दाखल करता येऊ शकतो, असे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

### विजापूर रोडवरील ते अतिक्रमण काढण्याचे आदेश

शहरातील विजापूर रोडवरील रस्त्याच्या दुतर्फा अतिक्रमण करून खोकी, टपऱ्या टाकून तसेच पक्के बांधकाम करण्यात येत आहे. याकडे लक्ष वेधले असता येथील सर्विस रोडवरील अतिक्रमण तत्काळ काढण्यात यावे, असे आदेश महापालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिले.

### आदिला नदी परिसरातील अतिक्रमण हटविण्याच्या सूचना

जुना पुना नाका तसेच बाळे येथील आदीला नदी परिसरातील अनधिकृत बांधकाम अतिक्रमण हटविण्याचे आदेशही यावेळी महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधितांना दिले.

## दलित वस्त्यांचा निधी इतरत्र वळविल्याप्रकरणी कारवाई करा

**आर.बी. दयावान सामाजिक संस्थेचे सोमवारपासून उपोषण**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

महानगरपालिकेने कोट्यावधी रुपयांच्या प्रशासकीय कामांच्या मंजुरीच्या वेगवेगळ्या निविदा काढून दलित वस्त्यांचा निधी अन्यत्र वळविला आहे. यात अधिकारी आणि ठेकेदार यांचे संगणमत आहे असा आरोप करत याप्रकरणी चौकशी करून संबंधितांवर ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आर. बी. दयावान बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सचिव विश्वभूषण कांबळे यांनी पत्रकार परिषदेत केली.

महापालिकेकडे याविषयी वारंवार तक्रारी दिल्या आहेत. दलित वस्त्यांच्या सुधारणासाठी मंजूर असलेला निधी अन्यत्र देणे हे अयोग्य आहे. संबंधित दोषी अधिकारी आणि ठेकेदार यांच्यावर कारवाई करावी. तसेच मुकुंद नगर येथील सार्वजनिक शौचालय दुरुस्ती करण्याकरता ८ लाख ४१ हजार इतकी तरतूद हसून वीस हजार रुपयेही काम झाले नाही याही कामाची पाहणी करावी आणि चौकशी अंति कारवाई करावी आदी मागण्यासाठी सोमवार दि. २४ मार्च रोजी संस्थेच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी विश्वभूषण कांबळे यांनी दिला आहे.

या पत्रकार परिषदेत रिहान नदाफ, दादा सरवदे, वैभव शिंदे ,कांताबाई बनसोडे, ज्योती शीरकुल, विश्वरत्न कांबळे आदी उपस्थित होते.

## भूमीलेख कार्यालयातील शिपाई अडकला अँटी करप्शनच्या जाळ्यात

**नक्कलसाठी मागितली ६ हजारांची लाच**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

सोलारप्लांट साठी शेतजमीन भाडेतत्त्वावर देण्याकरिता अक्कलकोट भूमी अभिलेख कार्यालयात नक्कल मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेल्या शेतकऱ्याकडून सहा हजाराची लाच घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने कार्यालयातील शिपायाला रंगेहाथ पकडले आहे.

लोकसेवक महेश भागवत घाडगे वय ३२ वर्षे, पद शिपाई नेम उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट ता. अक्कलकोट जि. सोलापूर वर्ग ४, रा. मु.पो. शिवणे ता. सांगोला जि. सोलापूर असे त्या अटक करण्यात आलेल्या शिपायाचे नाव आहे.

यातील तक्रारदार यांची मौजे करजगी ता. अक्कलकोट जि. सोलापूर येथे गट नं. ५१५ व गट नं. ५१६ येथे एकुण ३४ एकर शेतजमीन असुन सदर शेतजमीन हि सोलार प्लांटसाठी भाडेतत्वावर देण्याचे तक्रारदार यानी ठरविले होते. त्याकामी त्यांनी नमुद शेतजमीनीचा गाव नकाशा, स्कीम उतारा, गट नकाशे, टिपण, फाळणी व आकार बंद नक्कल इत्यादी कागदपत्रे मिळणेसाठी उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, अक्कलकोट येथे जावुन विनंती अर्ज सादर केला होता. वरील नमुद आरोपी घोडके यांनी सदरचा विनंती अर्ज स्वतः कडे ठेवुन घेवुन रु. ६००० लाचेची मागणी करुन, लाच रक्कम दिल्यानंतरच सदर अर्जावर पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे तक्रारदार यांना सांगीतले. प्रस्तुत प्रकरणी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये आरोपी घोडके यांनी रु. ६००० लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम रु. ६००० कार्यालयामध्ये स्वतः



स्वीकारली आहे. याप्रकरणी लोकसेवक महेश भागवत घाडगे (रा.मु.पो.शिवणे ता. सांगोला) यांच्याविरुध्द अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलमप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयातील पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले,पोलीस अंमलदार एएसआय/एस.व्ही. कोळी,पोना.संतोष नरोटे,पोकॉ.गजानन किणगी व चालक पोकॉ.शाम सुरवसे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

### किरकोळ कारणावरून डोक्यात घातली फरशी

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

किरकोळ कारणावरून तरूणाच्या डोक्यात फरशी घालून जखमी केल्याची घटना १९ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास एस आर पी एफ कॅम्प जवळ घडली.याप्रकरणी सुमित चंद्रकांत काळे (वय-३६,रा.वैष्णवी नगर,सैफुल विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून दोन अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेची हकीकत अशी की,फिर्यादी हे पाणी आणण्यासाठी दुचाकीवरून साई वॉटर सप्लाय येथे गेले असताना तेथे चार ते पाच इसम आपसात भांडण करत होते.त्यावेळी भांडण करू नका येथे महिला आहे.असे समजावून सांगत असताना त्यातील दोन इसम ांनी फिर्यादी यांना शिवीगाळ करून दुसऱ्या इसमाने रस्त्यावर पडलेल्या फरशीने डोक्यात मारून जखमी केले आहे.असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गायकवाड हे करीत आहेत.

### चारित्र्याच्या संशयावरून डोक्यात घातली कुऱ्हाड

**सोलापूर, दि. २१ मार्च-**

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन शिवीगाळ करत लोखंडी कुऱ्हाड डोक्यात घालून गंभीर जखमी केल्याची घटना २० मार्च रोजी रात्री सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास सिद्धेश्वर नगर भाग ३



नई जिंदगी येथे घडली.याप्रकरणी अलिशा उर्फ अलमान महीनुद्दीन पिरजादे (वय-१४,रा. सिद्धेश्वर नगर भाग ३,नई जिंदगी) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून महीनुद्दीन आलीसाब पिरजादे (रा.सिद्धेश्वर नगर ३,नई जिंदगी) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचे वडील अलीसाब फिर्यादी यांची आई शबाना महीनुद्दीन पिरजादे यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला शिवीगाळ करून लोखंडी कुऱ्हाड हातात घेऊन फिर्यादी यांची आई शबाना यांना तुझे जान से मारता हू,जिंदा नही छोडूंगा असे म्हणून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या आईच्या डोक्यात लोखंडी कुऱ्हाड मारून गंभीर जखमी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मोरे हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ; ६ जणांवर गुन्हा

**सोलापूर** : विवाहित ही सासरी नांदत असताना सासरकडील मंडळी यांनी आम्हाला मुलगा हवा आहे, तु गरोदर राहिली तर आम्ही मुलगा आहे की मुलगी आहे हे चेक करून मुलगी असेल तर गर्भ काढून टाकू व तुझ्या पतीचे दुसरे लग्न करू असे म्हणून शिवीगाळ केली. तसेच सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन शारीरिक व मानसिक तसेच आर्थिक त्रास दिल्याची फिर्याद पूजा महेश गरदास (वय-३०,रा.कामगार वसाहत,सुनील नगर) यांनी एम आयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती महेश,सासरा शंकर,सासू उमा,नणंद आश्विनी,जाऊ अर्चना (सर्व.रा.होमकर नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ५ मे २०१७ ते १ मार्च २०२५ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी सोलापूर येथे घडली .

## अक्कलकोट रस्ता एमआयडीसीतील विकासकामांचा मार्ग मोकळा

**आ. देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात उद्योग सचिवांसमवेत बैठक**

**अंतर्गत रस्त्यांसह विविध प्रश्न लागणार मार्गी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

अनेक दशकांपासून प्रलंबित असलेल्या अक्कलकोट रस्ता एमआयडीसी आणि होटगी रस्ता एमआयडीसीतील विकासकामांचा मार्ग मोकळा झाला आहे. आमदार देवेंद्र कोठे यांच्या उपस्थितीत गुरुवारी मंत्रालयात उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या दालनात उद्योग विभागाच्या सचिवांसमवेत झालेल्या बैठकीत दोन्ही एमआयडीसीतील विकासकामांसाठी विशेष बाब म्हणून प्रस्ताव पाठवण्याच्या सूचना उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद या बैठकीस



दूरदृश्यप्रणालीद्वारे हजर होते.

अक्कलकोट रस्ता एमआयडीसी आणि होटगी रस्ता एमआयडीसी मध्ये मूलभूत सुविधांचा प्रचंड अभाव आहे. अक्कलकोट रस्ता एमआयडीसी १९९२ साली सोलापूर महानगरपालिकेकडे हस्तांतरित झाल्यानंतर एमआयडीसीमधील विकासकामांना निधी देण्यास राज्य शासनाला तांत्रिक अडचणी येत आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून येथील उद्योजक आणि कामगारांना तसेच नागरिकांना रस्ते, पथदिवे आणि अन्य सुविधांच्या अभावामुळे त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याचा थेट परिणाम उद्योगांवर होत आहे. त्यामुळे या दोन्ही एमआयडीसीमध्ये मूलभूत सुविधांची पूर्तता करावी, अशी मागणी उद्योजकांकडून वारंवार केली जात आहे. सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता एमआयडीसीतील मूलभूत सुविधांसाठी शासनाचा निधी मिळणे आवश्यक आहे. यावर उपाय म्हणून शासनाने त्वरित मार्ग काढावा, अशी मागणी आमदार कोठे यांनी केली.

एमआयडीसी सोलापूर महानगरपालिकेला हस्तांतरित झाल्यामुळे शासनाचा निधी मिळण्याबाबत अधिकाऱ्यांकडून साशंकता होती. महानगरपालिकेकडून हा भाग हस्तांतरित करून घ्यावा आणि सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशीही चर्चा झाली. मात्र, दुहेरी कर आकारला जाणे जाचक ठरेल म्हणून हाही प्रस्ताव बाजूला पडला. बैठकीचा नकारात्मक सूर पाहून सोलापूरहून आलेले उद्योजक देखील हताश झाले. आमदार कोठे यांनी मात्र आग्रहाने भूमिका लावून धरली. याबाबतीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन उद्योजकांच्या व्यथा आपण त्यांच्यासमोर मांडल्या असता, त्यांनी पत्रावर उद्योगविभागाच्या प्रधान सचिवांच्या नावाने सकारात्मक शेरा मारून विशेष बाब म्हणून यातून सकारात्मक मार्ग काढण्याच्या सूचना उद्योग सचिवांना दिल्या आहेत. शिवाय उद्योगमंत्री उदय सामंत देखील सकारात्मक असल्याचे आमदार कोठे यांनी सांगितले. या समस्यांबाबत विविध वर्तमानपत्रातील कात्रणेही आमदार देवेंद्र कोठे यांनी बैठकीत दाखवली. यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम व चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी यआणि देखील या औद्योगिक वसाहती मधील समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक स्थिती आणि एम आयडीसीतील मूलभूत सुविधांची गरज ओळखून उद्योग सचिवांनी उद्योग विभागाच्या उपसचिवांना दूरध्वनीवरुन संपर्क साधला. याप्रसंगी उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अनबलगन यांचा सत्कार आमदार कोठे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी यंत्रमागधारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष राजू राठी, मल्लिकार्जुन कमटम व सिद्धेश्वर कमटम आदी उपस्थित होते.

### माध्यमांची भूमिका महत्त्वाची ठरली

अक्कलकोट रस्ता एमआयडीसी आणि होटगीरोड एमआयडीसी येथील समस्यांबाबत माध्यमांनी वारंवार बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. आमदार देवेंद्र कोठे यांनी विविध कागदपत्रांसह वर्तमानपत्रातील कात्रणेही अधिकाऱ्यांना दाखवत उद्योजक आणि कामगारांच्या व्यथा तळमळीने शासनासमोर मांडल्या. त्यामुळे यात माध्यमांचीही भूमिका महत्त्वाची ठरली.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०६३

**सुंदर तें ध्यान उभा विटेवरी ।**
**कर कटावरी ठेवूनियां ।।**

तुकाराम महाराजांनी त्यांच्या गाथेची सुरुवात महाराष्ट्राचं आराध्य दैवत असणाऱ्या पांडूरंगाच्या स्वरुपाच्या वर्णनाने केली आहे. ज्याच्यावर आपली भक्ती, श्रध्दा, प्रेम आहे, त्याच्या स्वरुपाची माहिती असणे आवश्यक असते. पांडूरंगावर श्रध्दा ठेवणाऱ्यांची संख्या भरपूर आहे. अनेकांना पंढरपूरला जाऊन श्रींचे प्रत्यक्ष दर्शन घेता आले नसेल. कोणाला परिस्थितीमुळे, कोणाला अडचणीमुळे, कोणाला अन्य कारणास्तव इच्छा असूनही या आराध्य दैवताच्या प्रत्यक्ष दर्शनापासून वंचित राहावे लागले असेल. अशा सर्वच भक्तांना घरबसल्या पांडूरंगाच्या स्वरुपाची जाणिव करुन

देण्याचा प्रयत्न महाराजांनी केला आहे. पंढरपूरला जाऊन दर्शन घेणाऱ्या सर्वांनाच पांडूरंगाचे स्वरुप समजले असेलच असेही नाही. डोकया-मनात विचाराचे वादळ घेऊन दर्शन घेणाऱ्यांची संख्याही काही कमी नसते. मनच स्थिर नसेल तर समोरच्याचा खऱ्या अर्थाने परिचय होईलच कसा? अस्थिर मनाच्या भक्तांनाही पांडूरंगाचा परिचय व्हावा यासाठीही हा अभंग मदतीला येऊ शकतो. आपले संपूर्ण आयुष्य ज्या पांडूरंगाच्या सेवेत खर्च करीत आहोत, जो आपला जीव की प्राण झाला आहे. तो पांडूरंग कसा आहे? हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**सुंदर तें ध्यान उभा विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ।।**
**तुळशीहार गळां कासे पीतांबर । आवडे निरंतर हेंचि ध्यान ।।**
**मकर कुंडलें तळपती श्रवणीं । कंठी कौस्तुभमणी विराजित ।।**
**तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ।।**

कमरेवर हात ठेवून पांडूरंग उभा आहे, असे न म्हणता महाराज त्याचे ध्यान उभे आहे, असे म्हणतात. हे महत्त्वपूर्ण आहे. पांडूरंगाचे हे ध्यान समजण्यासाठी तुकोब्बा माऊलींसारखी एकाग्रता लागते. तुळस ही अत्यंत पवित्र व गुणकारी आहे. श्रीकृष्णाची तुला ज्या एका तुळसी पत्राने झाली, त्या तुळशीचा हार गळयात आहे आणि कंबरेला पीतांबर धारण केले आहे. माशाच्या आकाराची कुंडले कानात तळपत असून गळयात कौस्तुभ मणी आहे. असे सुंदर, ध्यान म्हणजेच माझे



सर्व सुख असल्याने मी ते श्रीमुख आवडीने पाहीन असे ते म्हणतात. संसारात अडकलेल्या जीवाला स्वत:चा परिचय होणे अवघड असल्याने पांडूरंगाच्या ध्यानाचा परिचय होणेही कठीण आहे. सर्व भक्तांना पांडूरंगाचा थोडा जरी परिचय झाला तरी समाजातील, त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील, कुटूंबातील तरी अनेक प्रश्न कमी होतील. पांडूरंगांचे हे ध्यान केवळ सांगण्याचे, ऐकण्याचे किंवा पाहण्याचे नसून ते अनुभवण्याचे आहे. पांडूरंग विटेवरच का उभा आहे? तुळशीचा हारच का धारण केला? अशा प्रश्नांची उत्तरे शोधून त्यामागील हेतू आपल्या जीवनात उतरविला तर खरे सुख समाधन काय असते, हे कळून आपल्या जीवनातील आनंदलहरी वाढतील.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, जागतिक जल दिन दिन, कालाष्टमी, शुक्राचे पुर्वेस दर्शन |
| दि. २२ मार्च २०२५ | ....राहू काल.... |
| विक्रम संवत् २०८०-८१ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| शके - १९४६ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| संवत्सर - क्रोधी नाम | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| मास - फाल्गुन | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| कृ. अष्टमी (२९.२३) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| ऋतु - वसंत | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| नक्षत्र - मूळ (२७.२२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| योग - व्यतिपात (१८.३५) | |
| करण - बालव (१६.५८) | |

### राशीभविष्य

**मेष** : व्यापार, नौकरीमधील स्थिती मध्यम राहील. व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल. कौटुंबिक सहकार्य आज मिळणार नाही. शक्यतो प्रवास टाळा.

**वृषभ** : नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील. व्यवहारात सावधानी बाळगा. वाचनाची गोडी वाढले.

**मिथुन** : तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत. जीवनात नवीन संधी निर्माण होईल. बेफीकीरीने कामे करून नका.

**कर्क** : विद्यार्थी वर्गासाठी आजचा दिवस शुभ आहे. आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील. काही घटनांमध्ये आपल्याला आज मन:स्ताप सहन करावा लागेल.

**सिंह** : देण्या-घेण्याच्या व्यवहारात सावधानी बाळगा. संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल. वाचनाची गोडी वाढले. शक्यतो प्रवास टाळा.

**कन्या** : दुसऱ्यावर रोष करू नका. लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील. व्यापार व्यवसायात विस्तार होईल. कौटुंबिक स्थितीत सुधारणा होईल.

**तुळ** : परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल. राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. रागावर नियंत्रण ठेवा. व्यापार फायदेशीर राहणार आहे.

**वृश्चिक** : टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे. उपयोगी चर्चा घडून येईल. व्यवस्यातील विस्ताराच्या दृष्टीने केलेल्या योजना यशस्वी होतील. मुलांची काळजी राहील.

**धनु** : विरोधकांपासून सावध रहा. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे. मानसिक संतोष निमर्ण होईल. व्यवसाय चांगला चालेल. आर्थिक प्रकरणात सावधानी बाळगा. दांम्पत्य जीवन सुखी राहील.

**मकर** : लोकप्रियता वाढणार आहे. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे. शासनाकडून पैसा किंवा सन्मान मिळेल. जीवनसाथी बरोबर वाद विवाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : नौकरीमध्ये असणाऱ्यांची बदली किंवा पदोन्नती मिळण्याचा योग आहे. सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. निष्कारण चिंता निर्माण होईल.

**मीन** : कौटुंबिक सहकाय कमी प्रमाणात मिळेल. कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या. आर्थिक बाबतीत समाधानी रहाल.

# पहिली ते नववीची वार्षिक परीक्षा ८ ते २५ एप्रिलपर्यंत

### राज्यातील परीक्षांमध्ये एकवाक्यता : १ मे रोजी निकाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून जिल्ह्यातील पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाचवेळी घेण्यात येणार आहेत. त्यानुसार ८ ते २५ एप्रिलपर्यंत सकाळी ८ ते ११ या वेळेत विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. या पार्श्व



भूमीवर पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक शिक्षण विभागाने सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना पाठविले आहे. दरवर्षी इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा शाळा त्यांच्या सोयीनुसार एप्रिलच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यापर्यंत घ्यायच्या. पण, या परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांना उन्हाळी सुट्टी लागल्यासारखीच स्थिती होती. परीक्षा झाल्यावर विद्यार्थी शाळेत येत नाहीत . पण, आता सर्वच शाळांची परीक्षा ८ ते २५ एप्रिल या दरम्यान होणार असल्याने विद्यार्थ्यांना परीक्षा संपेपर्यंत शाळेत हजर राहावे लागणार आहे. त्यानंतर १ मे रोजी नेहमीप्रमाणे निकाल जाहीर होणार आहे.

२०२४-२५ च्या शैक्षणिक वर्षाचा शेवटचा टप्पा सुरू असून अनेक शाळांनी विद्यार्थ्यांची तोंडी परीक्षा सुरू केली आहे. एप्रिल महिन्यात अंतिम तथा वार्षिक परीक्षा घेण्यात येणार आहे. यंदा पहिल्यांदाच इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा एकाचवेळी घेतली जाणार आहे. त्यानुसार वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची जूनमध्ये शाळा सुरू होण्यापूर्वी फेरपरीक्षा घेण्यात येणार आहे . त्यामुळे त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश देता येणार संपणार असल्याने प्रत्येक शाळेला आहे. दरम्यान, परीक्षा २५ एप्रिलला नेहमीप्रमाणे १ मे रोजी निकाल लावावा लागणार असून त्यादृष्टीने शिक्षकांना परीक्षा झाल्यावर लगेचच उत्तरपत्रिका तपासाव्या लागणार आहेत. मार्च व एप्रिल महिन्यात शाळा सोईनुसार वार्षिक परीक्षा घ्यायचे. मात्र यावर्षी राज्यातील सर्व शाळांमध्ये एकाचवेळी संबंधित विषयाची परीक्षा घेतली जाणार आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांसाठी शाळा व सुट्टी समान असणार आहे.

#### वेळापत्रक प्राप्त

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार शाळेच्या परीक्षांचे वेळापत्रक प्राप्त झाले आहे. सर्व विद्यार्थ्यांची एकाच वेळी परीक्षा घेण्यात येणार असून ८ ते २५ एप्रिल पर्यंत विद्यार्थी शाळेत राहणार आहेत. १ मे रोजी निकाल लावण्यात येणार आहे.

**- वाघेश शास्त्री, मुख्याद्यापक,**
**उध्दवराज प्राथमिक शाळा, सोलापूर**

#### २५ एप्रिलपर्यंत शाळेत हजर राहणे बंधनकारक

यापूर्वी एप्रिल महिन्याच्या पहिल्या आठवडयात परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थी शाळेला गैरहजर राहायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊन एप्रिलमधील शाळेच्या वेळेचा दुरूपयोग होऊन मुले खेळात दंग व्हायचे. मात्र अध्यापन कार्यावर परीणाम होत होते. म्हणून नवीन निर्णयानुसार विद्यार्थ्यांना २५ एप्रिलपर्यंत शाळेत हजर राहणे बंधनकारक आहे.

#### ऐन ऊन्हाळ्यात परीक्षा

यावर्षी फेब्रुवारी व मार्च महिन्यात ऊन्हाचा पारा ४० अंशापर्यंत पोहोचला आहे. यावर्षी नवीन शैक्षणिक धोरणानुसार राज्यातील सर्व शाळांची परीक्षा एकाच वेळी ८ ते २५ एप्रिलपर्यंत होणार आहे. मात्र यावेळी कडक व तीव्र ऊन्ह असल्याने विद्यार्थ्यांवर परीणाम होणार आहे. म्हणून पुढील शैक्षणिक वर्षात एप्रिलच्या पहिल्या आठवडयात परिक्षा घेण्यात यावेत.

**- सुरेश टेळे, पालक, मंद्रुप**

#### पुढील शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून

शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने दिलेल्या वेळापत्रकानुसार राज्य मंडळाच्या सर्वच शाळांमधील इयत्ता पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा ८ ते २५ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. त्यांचा निकाल १ मे रोजी जाहीर होईल आणि पहिलीच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश २ मे पासून सुरू होणार आहेत . चालू शैक्षणिक वर्षातील नियोजित उन्हाळा सुट्या देखील द्याव्या लागणार आहेत. त्यामुळे २०२५-२६ चे शैक्षणिक वर्ष १५ जूनपासूनच सुरू होईल, अशी माहिती शिक्षणाधिकाऱ्यांनी दिली.

# ‘पिरॅमिड’ ट्रस्टच्या कार्यशाळेची सांगता



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

येथील दि सोलापूर पिरॅमिड स्पिरिच्युअल ट्रस्टतर्फे अंत्रोळीकरनगर येथील रघुनंदन अपार्टमेंट व जुना विडी घरकूल येथील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिरात आयोजित पाचदिवसीय ध्यान व ज्ञान कार्यशाळेची यशस्वी सांगता झाली.

ब्रह्मर्षी पितामह सुभाष पत्रीजी यांनी संपूर्ण जगामध्ये भगवान गौतम बुध्दांनी सांगितलेल्या ‘आनापानसती’ या श्वास ध्यानाचा प्रसार केला. पिरॅमिडवर संशोधन करून त्याच्या उपयोगाने ध्यान अत्यंत प्रभावी होते, हे सिध्द केले. ध्यानामुळे शरीर आणि मनाचे आरोग्य हे औषधांशिवाय उत्तम होते हा अनुभव अनेकांनी घेतला आहे. दीपा मेहता यांनी ‘ध्यान विज्ञान’ या विषयावर मार्गदर्शन केले. नेहा मिरजगावकर यांनी ध्यानाचे सत्र घेतले. दुसरा दिवस उन्मनी जंगे यांनी श्वास विज्ञान या विषयावर माहिती दिली. ब्रह्मर्षी पत्रीजी यांच्या शिकवणुकीचा आधार असलेल्या ‘श्वासच आपला गुरू’ याची माहिती दिली. तिसऱ्या दिवशी कविता मिरजगावकर यांनी पीएसएसएम चा पाया म्हणजे पिरॅमिड यांची माहिती देत पिरॅमिडचे महत्त्व, फायदे समजावून सांगितले. वर्षा कत्ते यांनी पिरॅमिड कसे बनवायचे याचे प्रात्याक्षिक करून दाखवून दिले. चौथा दिवशी पीएसएसएमचे १८ सूत्रे याबद्दलची माहिती स्मिता दुधनकर यांनी दिली. अतिशय सोप्या भाषेत पीएसएसएमचे कार्य त्यांनी समजावून सांगितले. पाचवा दिवशी म्हणजे शेवटचा दिवशी जुना विडी घरकूल येथील श्री गणेश पिरॅमिड ध्यान मंदिर येथे आयोजित करण्यात आले. ब्रह्मर्षी पत्रीजींनी सांगितलेल्या विचारांचे परिणाम, विचारांचे प्रकार, भावनिक व भौतिक पातळीवर होणारे बदल समजून सांगितले. या ध्यान सत्रात जवळजवळ ५० ते ७५ महिला, पुरुष तसेच युवकांनी सहभाग घेतला.



# शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्षपदी सिद्राम कटगेरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ (शिवाजीराव पाटील गट) च्या राज्य कार्यकारिणी मंहामंडळ सभा पार पडली. या सभेत गेली २५ वर्ष शिक्षक संघाचे विविध पदावर काम करीत असलेले सिद्राम कटगेरी यांची राज्य उपाध्यक्षपदी निवड केली. सभेस ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आ. निरंजन डावखरे, आमदार प्रविण स्वामी शिक्षक संघाचे जेष्ठ सल्लागार माधवराव पाटील, बाळासाहेब काळे उपस्थित होते. सिद्राम कटगेरी यांनी दक्षिण सोलापूर प्राथमिक शिक्षण सह. पतसंस्था मंद्रुपचे ४ वर्ष यशस्वीपणे पतसंस्थेचे कामकाज केले.



# महामानव डॉ. आंबेडकर ट्रेड युनियनतर्फे पालिका आयुक्तांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती व रमजान ईद सणानिमित्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासंदर्भात निवेदन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले. सोलापूर शहरामध्ये विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमजान ईद हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने महापालिका कर्मचाऱ्यांना ॲडव्हान्स १५ हजार रुपये व मार्च महिन्याचे वेतन एप्रिल १० तारखेच्या आत अदा करावे यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी ट्रेड युनियन अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे आणि मुख्य लेखापाल डॉ. रत्नराज जवळगेकर यांचे आभार मानले. याप्रसंगीट्रेड युनियनचे खजिनदार अरुण मेत्रे, राम चंदनशिवे, सुनील शिंदे, संतोष गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# अनुसूचित जाती जमाती सदस्य लोखंडे यांचा २४ मार्चला सोलापूर जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

अनुसूचित जाती जमाती सदस्य (सचिव दर्जा) गोरक्ष लोखंडे हे दि. २४ मार्च रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे आहे.

**दौरा कार्यक्रम** : सकाळी १०.३० ते दुपारी १२.०० : सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी १२ ते १ : मुख्याधिकारी नगरपंचायत माळशिरस यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी १ ते २ : मुख्याधिकारी नगरपरिषद मोहोळ यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी २ ते ३ : मुख्याधिकारी नगरपरिषद मैंदर्गी यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. दुपारी ३ ते ४: मुख्याधिकारी नगरपरिषद अकलूज यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी ४ ते ५ : मुख्याधिकारी नगरपंचायत माढा यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी ५ ते ६ : मुख्याधिकारी नगरपंचाय बार्शी यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी. सायंकाळी ६ ते ७ : मुख्याधिकारी नगरपंचायत करमाळा यांचे सोबत अनुसुचित जाती जमातीच्या निधीबाबत आढावा व कामाची पहाणी व नंतर शासकीय विश्रामगृह सोलापूर येथे मुक्काम. मंगळवार २५ मार्च रोजी सकाळी ८ : वाजता मोटारीने सोलापूर येथून लातूर कडे रवाना

# महिलांचे संस्कार हे समाजापुढे आदर्श असावे : लायन मोहन भूमकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. २१ मार्च-**

ड्रीम फाउंडेशनच्या वतीने होळीनिमित्त आणि जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर लायन्स क्लब ऑफ सोलापूर सिटी चे अध्यक्ष लायन मोहन भूमकर, डॉक्टर अर्चना खारे, स्मिता राठी, उज्वला देवधर, डॉक्टर शैलेश पटणे, ड्रीम फाउंडेशनचे अध्यक्ष स्वप्निल इंगळे, उपाध्यक्ष आयेश शेख, सचिव एजाज शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महिलांना महिला आरोग्य विषयी मार्गदर्शन डॉक्टर अर्चना खरे यांनी मार्गदर्शन केले.यावेळी लायन्स क्लब सोलापूर सिटी चे अध्यक्ष लायन मोहन भूमकर यांनी महिलांचे संस्कार हे समाजापुढे आदर्श असावे आणि



निर्भय असावे.असे गौरवशाली मत मांडले. महिलांचे सत्कार शुभेच्छा दिले. ड्रिम फाउंडेशनचे अध्यक्ष यांनी सर्व प्रमुख पाहुण्यांचे सत्कार केला. एजाज शेख यांनी आभार मानले.

# मंजूर आकृतीबंधानुसार आस्थापनातील रिक्त पदे भरावीत

### महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

मंजूर आकृतीबंधानुसार महापालिका आस्थापनातील रिक्त पदे भरावीत यासह विविध आठ मागण्यांचे निवेदन महापालिका कामगार संघटना संघर्ष समितीच्या वतीने महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांना देण्यात आले.

मनपा दवाखाने ८ प्रसुतिगृहाकडील मिडवाईफ, आया, सफाई कामगारांना सलग ७ दिवस रात्रपाळीत ८ तासांऐवजी १२ तासाची ड्युटी करावी लागते. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने त्या सेवकांना सलग ३ दिवस रात्रपाळीत ड्युटी दिल्यानंतर एक दिवस डे ऑफ देण्यात यावा. जे कर्मचारी सलग ३ वर्षापेक्षा



जास्त कालावधीत एकाच खात्यात सेवा बजावत आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या बदल्या इतर खात्यात करण्यात याव्यात. आरोग्य खात्याकडील मयत सेवकांच्या वारसांची अनुकंपा नोकरी मागणी प्रलंबित अर्ज ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी. मनपा कर्मचाऱ्यांनी भाडेतत्वावर मागणी केलेल्या अर्जाप्रमाणे मनपा निवास स्थानाचे वाटप करण्यात यावे. सोलापूर महापालिका कर्मचाऱ्याची विभागीय चौकशी करीता बाह्य यंत्रणेद्वारे विभागीय चौकशी अधिकारी न नेमता मनपा मधील शासकीय अधिकाऱ्यांमार्फत विभागीय चौकशी करण्यात यावी. कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन निश्चित एका तारखेस अदा करण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी संस्थापक जनार्दन शिंदे, अध्यक्ष सायमन गट्टू, जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे,श्रीनिवास रामगल आदींसह पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः- (८५) उज्वल

श्री गुरुजींचे जीवन श्रेष्ठ समर्पणाचे उज्वल उदाहरण आहे ते सरसंघचालकपदी ३३ वर्षे कार्यरत होते व या ३३ वर्षात ३३ वेळा भारत वर्षाची त्यांनी परिक्रमा केली आहे. या परिक्रमेत ते लाखो लोकांना प्रत्यक्ष भेटले आहेत. त्यांच्यासोबत विचारांचे आदान प्रदान केले आहे. श्री गुरुजी अनेक शाळा महाविद्यालयात गेले आहेत. तिथल्या शिक्षकांशी, शिक्षणाधिकाऱ्यांशी, पत्रकारांशी पालकांशी व अशा अनेक जिज्ञासू व्यक्तींशी बोलले आहेत. व इतिहासाशी प्रतारणा म्हणजे आपले भविष्य अंधकारमय करणे ठरेल, असे ते आवर्जून प्रतिपादन करत असत. आपण आपल्या महान परंपरेत जन्मल्याचा अभिमान लहानपणापासून चित्तात रुजवला पाहिजे. आपण हिंदू म्हणून जगले पाहिजे.

हिंदू दिसले पाहिजे आणि जगाने हिंदू म्हणून आपल्याला ओळखावे असा आपण प्रयत्न केला पाहिजे. हे तेव्हाच शक्य आहे, जेव्हा आपण आपल्या परंपरेचा गौरव मानू. तेव्हा जगाच्या दृष्टीनेही आपण गौरवाचा विषय ठरू.

अशा या ऋषितुल्य गुरुजींच्या चरणी मी शतशत नमन करते.

**क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### बार्शीत महिला न्यायाधीश, वकिलांचा सन्मान

**बार्शी, दि. २१ मार्च-**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून बार्शीतील जिल्हा व सत्र न्यायालयात महिला न्यायाधीश व महिला वकिलांचा सन्मान करण्यात आला. न्यायालयाच्या आवारात हा कार्यक्रम पार पडला. अध्यक्षस्थानी जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. विक्रमादित्य मांडे हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दुसरे जिल्हा व सत्र न्यायाधीश लहू चव्हाण, वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश अंकुश खानोरकर, कनिष्ठ दिवाणी न्यायाधीश एस. बी. विजयकर, बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड-पाटील, फौजदार सोनम जगताप, डॉ. सई गुंड व वकील संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. बार्शी न्यायालयात नऊ न्यायाधीशांपैकी पाच महिला न्यायाधीश आहेत. यामध्ये वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश रेवती कंटे, कनिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती पी. व्ही. राऊत, गायत्री पाटील, हर्षदा पाटील, आर. पी. बागडे यांचा, तर सत्तरच्या आसपास महिला वकिलांचा सन्मान करण्यात आला. याकामी बार्शी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. रणजित गुंड, ॲड. सारिका शहा, ॲड. योजना घोलप यांनी परिश्रम घेतले.



### महात्मा फुले जन आरोग्य योजनेबाबत बैठक

**सांगोला, दि. २१ मार्च-**

महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यात सक्षमपणे व सुरळीत सुरू राहून रुग्णांना याचा जास्तीत जास्त फायदा होण्याकरिता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी बैठकीत बोलताना सांगोल्याचे आ.डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, राज्यात जे धर्मादाय हॉस्पिटल आहेत तिथे गोरगरीब, सर्वसामान्य जनतेला व्यवस्थित रूग्णसेवा मिळावी. त्याचबरोबर खाजगी हॉस्पिटल कडून रूग्णांची होणारी आर्थिक फसवणूक थांबविण्यात यावी. महात्मा फुले जन आरोग्य योजना राज्यात सक्षमपणे व सुरळीत सुरू राहून रुग्णांना याचा जास्तीत जास्त फायदा व्हावा. यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी तातडीने याची दखल घेत प्रशासकीय यंत्रणेला सूचना देत धर्मादाय हॉस्पिटल तसेच खासगी हॉस्पिटल येथे गोरगरीब रुग्णांना वेळेवर उपचारांसाठी मदत करण्याचे आदेश दिले. या बैठकीला आ.समाधान आवताडे, आ.सुनील प्रभू आ.भास्कर जाधव, आ.कालिदास कोळंबकर आदी उपस्थित होते.



### मराठा सेवा संघ पंढरपूर विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नवनाथ कोडग

**अकलूज, दि. २१ मार्च-**

मराठा सेवा संघ सोलापूर पंढरपूर विभागाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नवनाथ कोडग यांची एकमताने निवड झाली असून त्यांच्यावर या निमित्ताने शुभेच्छांचा वर्षाव होताना दिसत आहे. जिजाऊ रथयात्रा माळशिरस तालुक्यात सोमवार दिनांक २४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता येत आहे. जिजाऊ रथयात्रेचे स्वागत व त्या संदर्भात करण्यात येणारे नियोजन यासाठी शासकीय विश्रामगृह,अकलूज येथे मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड व जिजाऊ ब्रिगेड यासह सर्व कक्षांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीसाठी मराठा सेवा संघ,जिजाऊ ब्रिगेड,संभाजी ब्रिगेडचे सर्व पदाधिकारी यांची उपस्थिती होती. या बैठकी दरम्यान मराठा सेवा संघाचे जिल्हा सचिव धनाजी म्हस्के यांच्या उपस्थितीत मराठा सेवा संघ जिल्हा उपाध्यक्ष(पंढरपूर विभाग) म्हणून शिवश्री नवनाथ कोडग, जिल्हा संघटक पदी शिवश्री भारत युवराज सांगडे तसेच सेवा संघ जिल्हा परिषद सोलापूर शाखेच्या अंतर्गत माळशिरस तालुका अध्यक्ष म्हणून शिवश्री पांडुरंग बाळासाहेब सुर्यवंशी यांच्या निवडी झाल्या त्याबद्दल त्यांना निवडीचे पत्र देण्यात आले.




### रमजानचे रोजे शांतता, बंधूभाव, संयम शिकवतात : जयवंतराव जगताप

**करमाळा, दि. २१ मार्च-**

करमाळा शहरातील शिवाजीनगर भागात हाजी हाशमोद्दीन तांबोळी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने नगरसेवक हाजी अल्ताफशेठ तांबोळी व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष अमीरशेठ तांबोळी यांनी ईप्तार पार्टीचे आयोजन केले होते. या इप्तार पार्टीसाठी सर्व हिंदू मुस्लिम समाजातील नेते, सामाजिक कार्यकर्त्यांना आमंत्रित केले होते. यामध्ये प्रामुख्याने करमाळा तालुक्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप, जेऊर ग्रामपंचायतचे सरपंच युवा नेते पृथ्वीराज पाटील, नगरसेवक संजय सावंत शिवसेनेचे संघटक प्रविण कटारिया, माजी उपनगराध्यक्ष कमलाकर वीर, नगरसेवक प्रशांत ढाळे,ज्येष्ठ पत्रकार नासीर कबीर, केमचे उपसरपंच सुलतान शेख, उमरड ग्रामपंचायतचे सदस्य इरफान शेख माजी नगरसेवक फारुक जमादार, दिगंबर रासकर आदी उपस्थित होते. इप्तार पार्टी यशस्वी करण्यासाठी मुस्लिम समाजातील सामाजिक कार्यकर्ते हाजी अतीक बेग, वाजीद शेख, तौफिक शेख, सोहेल पठाण,असीम बेग, समीर शेख यांनी परिश्रम घेतले.

# भोईंजे-आहेरगाव येथे शिवार साहित्य संमेलन

## २२ व २३ मे रोजी आयोजन ; राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, माजी मंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री जयकुमार गोरे राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. २१ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील ७९ वे अखिल भारतीय साहित्य संमेलनानंतर माढा तालुक्यातील भोईजे-आहेरगाव येथे 'शेतकरी साहित्य इर्जिक परिषद महाराष्ट्र' यांच्या वतीने कवी नारायण सुमंत यांच्या मार्गदर्शनाखाली व संत गुरू रविदास महाराज आश्रमचे संस्थापक व निमंत्रक राजाभाऊ शिंदे यांच्या सहकार्याने शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन २२ व २३ मे रोजी करण्यात आले असल्याची माहिती संमेलनाचे कार्यवाह कवी सुरेशकुमार लोंढे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



सुरेशकुमार लोंढे पुढे म्हणाले की, आपल्या भागात सर्वात मोठे शिवार साहित्य संमेलन आयोजित केले. मराठीस अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे यानिमित्त हे आयोजन असून भाषेची वृद्धी व भाषा समृद्ध करणे व अभिजितपणा टिकविण्यासाठी वाढविण्यासाठी सहित्यिक म्हणून जबाबदारी आहे. खूप वर्षात जिल्ह्यात मोठे संमेलन झालेले नाही.ग्रामीण नवोदिताना संधी मिळावी म्हणून आयोजन केले आहे.सर्व संमेलने मोठ्या शहरात होतात. ग्रामीण साहित्यिकासाठी हा खरा खटाटोप आहे. माढा तालुक्यातील हा पहिला मोठा प्रयोग आहे.

या संमेलनाचे उदघाटन शनिवारी २२ मार्च २०२५ रोजी सकाळी १० वा. राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे हे उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साहित्यिक डॉ.विठ्ठल वाघ हे आहेत.

तसेच दुपारी २ ते ३ या वेळेत कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात देशाचे माजी कृषिमंत्री शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली मराठी 'बंदीश गायन' होणार असून निवेदन कवी नारायण सुमंत करणार आहेत. यावेळी गायिका गौरी घाडगे-इंदापूर, गायिका राजेश्वरी वैद्य-जोशी-पुणे या आहेत. तिसरे सत्र डॉ.सदानंद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.नरेंद्र पाठक, डॉ.सयाजी मोकाशी, पाशा पटेल व आमदार सुरेश धस यांच्या उपस्थितीत संतांची समता आणि आजचे सत्ताकारण या विषयावर परिसंवाद होणार आहे. चौथ्या सत्र कविवर्य फ.मु.शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होत असून जेष्ठ कवी व कवियत्रींचा सन्मान व कवी संमेलन होणार आहे.

रविवार २३ मार्च रोजी सकाळी ९ वा. पाचव्या सत्रात कथाकथन होणार असून योगीराज वाघमारे हे अध्यक्षस्थानी आहेत. सहाव्या सत्रात काव्य,शिल्प, चित्र या विषयावर होत आहे.सातवे सत्र नितीन कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली होत असून या सत्रात कवी संमेलन होणार आहे. सायं.५ वा.संमेलनाचा समारोप माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व खा.धैर्यशीलसिंह मोहिते-पाटील व उद्योजक सुरेश ताकतोडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

या कार्यक्रमास खा.धैर्यशीलसिंह मोहिते-पाटील, आ.अभिजित पाटील, आ.नारायण पाटील, माजी आ.बबनराव शिंदे, माजी आ.संजयमामा शिंदे, आ.प्रशांत परिचारक, संत सुरेंदरदास बाबा (पंजाब) यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार असून कवी, साहित्यिक, लेखक वाचक यांच्यासह परिसरातील नागरिकांनी या शिवार संमेलनास अवश्य भेट द्यावी असे संयोजकांनी आवाहन केले आहे. ग्रंथदिंडी, वृक्षारोपण,मुहूर्तमेढ रोपण, ग्रंथ प्रदर्शन यासह हेही कार्यक्रम होणार आहेत.

## बनावट शिक्के प्रकरणात अटकपूर्व जामीन नामंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २० मार्च-**

माढा तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माजी आमदार विनायकराव उर्फ पांडुरंग पाटील यांच्या बोगस सह्या करुन तसेच संस्थेचे बोगस लेटर पॅड व शिक्के बनवून संस्था हडप करण्याचा प्रयत्न केलेल्या आरोपींचा अटकपूर्व जामीन नामंजूर झाला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी श्यामसुंदर भिसे यांनी संस्थेचे सचिव आहे असे भासवून यातील इतर १३ आरोपींसोबत संगनमत करुन खोटे प्रोसिडिंग तयार करुन माढा येथील दिवाणी न्यायालय येथे इतर सह आरोपींबरोबर खोट्या व बनावट कागदपत्रांच्या आधारे तडजोड हुकूमनामा बनविला तसेच इतर सह आरोपी यांच्याकडून खोट्या व बनावट पावती बुकावरती पैसे भरुन घेऊन सदर सहा आरोपी हे संस्थेचे सभासद असल्याचे भासविले व धर्मदाय आयुक्त सोलापूर यांचेकडे खोट्या कागदपत्राच्या आधारे बदल अर्ज मंजूर केलेला होता. सदर बदल अर्ज मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रद्द केला. सदरील आरोपी यांनी मे. कोर्टाची फसवणूक केली तसेच संस्थेची ही फसवणूक केली व संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार विनायकराव उर्फ पांडुरंग पाटील व इतर सभासद यांच्या खोट्या सह्या करुन खोटे प्रोसिडिंग कोर्टात दाखल केल्याप्रकरणी संस्थेचे सचिव औदुंबर पाटील यांनी माढा येथील फौजदारी न्यायालय येथे क्रिमिनल प्रोसिजर कोडचे कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल होणे कमी अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावर युक्तिवाद होऊन फौजदारी न्यायालय माढा यांनी कुडूवाडी पोलीस ठाणे यांना सदर प्रकरणी गुन्हा दाखल करुन चौकशीचे आदेश दिले.

त्यानंतर सदर प्रकरणी कुडूवाडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नंबर ५१९/२०२३ अन्वये भादवि कलम ४०९, ४२०, ४२७, ४६६, ४६७, ४६८, ४७१, ५००, १९३, १९९, २००, १२०ल सह ३४ या कलमान्वये आरोपी श्यामसुंदर भिसे, भारत काळे, राजाभाऊ सुसलादे, संतोष भिसे, सुदेश भिसे, तुकाराम पाटील, कैलास मदने, जयश्री भिसे, दिपाली मदने, तृप्ती भिसे, मीना पाटील, अमृत मोरे, राजश्री भिसे, विवेक काळे यांचे विरोधात गुन्हा नोंद झाला.सदरील आरोपी यांनी बार्शी येथील मे. जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी यांचे कोर्टात अटकपूर्व जामीन मिळणेकामी अर्ज दाखल केला. सदर अर्जावर दोन्ही पक्षातर्फे युक्तिवाद करण्यात आला व सदर प्रकरणी सदरील आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश विक्रमादित्य मांडे साहेब यांनी दि. १८ मार्च रोजी नामंजूर केला. सदर मे. कोर्टाच्या आदेशामुळे आरोपीचा माढा तालुका शिक्षण संस्था हडप करण्याच्या प्रयत्न असफल झाला. सदर प्रकरणी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. दिनेश देशमुख व मा. आमदार विनायकराव पाटील यांच्यातर्फे ॲड. विजय सुर्वे यांनी काम पाहिले.

## नामसाधना मंडळाचा वर्धापन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ मार्च-**

सांगोल्यात एकनाथ षष्ठीच्या दिवशी स्थापन झालेल्या व धार्मिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या नामसाधना मंडळ या संस्थेचा ४१ वा वर्धापन दिन गुरुवारी महादेव गल्लीतील श्री दत्त मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

वर्धापन दिनानिमित्त सामुदायिक जप झाल्यानंतर माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठानच्या अध्यक्षा निलिमा कुलकर्णी-खर्डीकर, ॲड. सारंग वांगीकर, ॲड. सचिन पाटकुलकर, गौरी कुलकर्णी, संजय मदने, पवन लाटणे, इंजि.संतोष भोसले यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. ॲड. गजानन भाकरे व निलिमा कुलकर्णी खर्डीकर यांनी एकनाथ षष्ठी निमित्त आपले विचार व्यक्त केले. ४१ व्या वर्धापन दिनानिमित्त निलिमा कुलकर्णी खर्डीकर यांनी नामसाधना मंडळाला ४ हजार १०० रुपयाची देणगी अध्यक्ष मनोज ढोले यांच्याकडे सुपूर्द केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष भोसले यांनी तर आभार अच्युत फुले यांनी मानले.

## वनविभागातील अपहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी

### आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांची विधानसभेत मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २१ मार्च-**

विधानसभा सभागृहात लक्षवेधी सूचनेअंतर्गत वनविभागात झालेल्या अपहाराची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी आ. डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी विधानसभेत केली.

यामध्ये सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा या तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यातील सामाजिक वनीकरण विभागाच्या वृक्ष लागवड योजनेमध्ये संबंधित विभागाच्या तत्कालिन अधिकारी व इतर ७ अधिकारी यांनी १०९ कोटी रूपयांचा अपहार केल्याचे मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले. त्याचबरोबर राज्य शासनाच्या वन विभागाने सुमारे ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दीष्ट डोळयासमोर ठेऊन प्रत्येक जिल्ह्यातील वन विभागाअंतर्गत सामाजिक वनीकरण योजनेंतर्गत वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता.

परंतु सांगोला, पंढरपूर, मंगळवेढा तालुक्यात प्रत्यक्षात वृक्ष लागवड न करता, रोपवाटीका न जगवता, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड न करता, खते व पाणी न देता, त्याचे संगोपन न करता खाजगी वन संरक्षक व इतरांच्या नावे बोगस बिले काढून तत्कालीन वन अधिकारी व इतर ७ जणांनी बनावट, बोगस अहवाल, प्रतिज्ञापत्र व इतर कागदपत्रे तयार करून शासनाची दिशाभूल करून करोडो रूपयांची संगनमताने शासनाची फसवणूक करण्यात आली आहे तरी शासनाची फसवणूक करण्यात येणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणतीही कारवाई अद्याप करण्यात आलेली नसून दोषींवर लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी केली.

## कलबुर्गी-दौंड उन्हाळी सुट्टी विशेष शटल सुरू होणार

**जिल्ह्यातील रेल्वे प्रवाशांची होणार सोय**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.२१ मार्च-**

दौंड-कलबुर्गी-दौंड शटल पॅसेंजर १ एप्रिल ते २ जूलै दरम्यान उन्हाळी सुट्टी विशेष पॅसेंजर म्हणून धावणार आहे. यामुळे नियमित प्रवास करणारे प्रवासी, विद्यार्थी, व्यापारी वर्ग, भाविकांची सोय झाली आहे.

दौंड व कलबुर्गी रेल्वे दर सोमवार, मंगळवार, बुधवार, शुक्रवार व शनिवारी धावणार आहे दौंड येथून पहाटे पाच वाजता निघेल. सोलापूरला सकाळी आठ वाजून ४० मिनिटांनी पोहचेल. कलबुर्गी येथे सकाळी ११ वाजून २० मिनिटांनी पोहोचेल. कलबुर्गी येथून दुपारी चार वाजून दहा मिनिटांनी निघेल. सोलापूरला सहा वाजून ४० मिनिटांनी येईल. दौंड येथे रात्री १० वाजून २० मिनिटांनी पोहोचेल.तसेच गुरुवारी व रविवारी दौंड येथून पहाटे ५ वाजता सुटेल कलबुर्गि येथे त्याच दिवशी रात्री ११:२० मि. पोहोचेल या गाडीला भिगवण, पारेवाडी, जेऊर, केम, कुर्डवाडी, माढा, मोहोळ, सोलापूर, टिकेकरवाडी, होटगी, अक्कलकोट रोड, बोरोटी, दुधनी, गाणगापूर रोड या ठिकाणी थांबणार आहे. या गाडीस दहा जनरल, दोन एसएलआर असे १२ डबे असतील.

### प्रवासी संघटनेच्या मागणीला यश

प्रवासी सेवा संघाने मागणी केलेली दौंड-कलबुर्गी-दौंड ही शटल रेल्वे होळी सणाच्या कालावधीसाठी रेल्वे प्रशासनाकडून मंजूरी मिळालेली होती. सदरची शटल रेल्वे कायमस्वरूपी चालविण्यासाठी प्रवासी सेवा संघाकडून रेल्वे प्रशासनाच्या विभागीय कार्यालय सोलापूर व क्षेत्रीय कार्यालय मुंबई येथे निवेदन देऊन पाठपुरावा करण्यात आलेला आहे. सदरच्या शटलला रेल्वे प्रशासनाने मुदतवाढ दिल्याने प्रवाश्यांची दीर्घकालीन होत असलेली गैरसोय दूर झालेली आहे. दौंड-कलबुर्गी-दौंड शटलला कायमस्वरूपी मंजूरी व उजनी लाभक्षेत्रातील वाशिंबे या ग्रामीण विभागतील रेल्वे स्टेशनला थांबा मिळण्याकरीता प्रवासी सेवा संघ प्रयत्नशील राहणार आहे.

**- संजय पाटील, अध्यक्ष प्रवासी सेवा संघ**

## संस्कार करणारी जि. प. शेळकेवस्ती शाळा

**प्रा. गणेश करे-पाटील**

### यशकल्याणी संस्थेकडून शाळेला झेरॉक्स प्रिंटर भेट



**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि.२१ मार्च-**

जि.प. शाळा शेळके वस्ती दहिगाव येथील स्नेहसंमेलनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. करे-पाटील बोलत होते. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले की, निकोप समाज बांधणीसाठी शिक्षक व शाळांची भूमिका महत्वाची असून संविधान मूल्य जोपासण्याचे संस्कार ग्रामीण भागातील शिक्षक विशेषत्वाने करत आहेत हे अभिमानास्पद आहे. सर्वधर्मसमभावाचे संस्कार करणारी जि. प. शेळकेवस्ती शाळा आदर्शच आहे, असे प्रतिपादन गणेश करे-पाटील यांनी व्यक्त केले.

यावेळी यशकल्याणी सेवाभावी संस्थेच्यावतीने प्रा.करे पाटील यांनी शाळेला अत्याधुनिक झेरॉक्स प्रिंटर मशीन भेट दिली. वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध पारंपारिक लोकगीते, कालभैरवाष्टक, विविध नृत्यप्रकार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे प्रा. गणेश करे-पाटील, दहीगावच्या सरपंच प्रियांका गलांडे, उपसरपंच नितीन नरुटे, वि.का.सो.चेअरमन हरिश्चंद्र शेळके, इंग्लिश टिचर्सचे जिल्हा अध्यक्ष. प्रा बाळकृष्ण लावंड, प्रा. जयेश पवार, प्रा. विष्णू शिंदे, पत्रकार गजेंद्र पोळ, जेष्ठ निवृत्त शिक्षक गायकवाड गुरुजी, शा.व्य.समिती अध्यक्ष ज्योतिराम पाडुळे, उपाध्यक्ष महादेव शेंडगे, मा. अध्यक्ष बापू कोंडलकर, रवी पाडुळे, महेश शेळके, विनायक महाराज पाडुळे, नानासाहेब गलांडे, महादेव कोंडलकर, विठ्ठल पाडुळे, योगेश वाघमोडे उपस्थित होते. मुख्याध्यापक दस्तगीर शेख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. सूत्रसंचलन राहुल जाधव यांनी केले तर सहशिक्षक विजयकुमार राऊत यांनी आभार मानले.

## मंगळवेढा येथील वखार महामंडळ केंद्रात २० लाखांचा अपहार

### कनिष्ठ साठा अधिक्षकावर गुन्हा दाखल


**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २१ मार्च-**

मंगळवेढा येथे असलेल्या वखार महामंडळ केंद्रातील शासकीय गोदाम क्रमांक दोन मध्ये शेतकरी व व्यापारी यांनी भाडे तत्वावर ठेवलेल्या १६८० पोती सरकी पेंड व ४ खत पिशव्या असा २० लाख ६ हजार ६८० रूपये किंमतीच्या मालाचा अप्रामाणिकपणे स्वतःच्या फायद्याकरीता अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन लोकसेवक तथा कनिष्ठा साठा अधिक्षक महेश शिवशरण सलगरे (वय ४५ रा.पंढरपूर) यांच्या विरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान या अपहारामुळे शेतकरी व व्यापारी वर्गातून मोठी खळबळ उडाली आहे.

मंगळवेढा येथे असलेल्या वखार महामंडळातील केंद्रावर आरोपी हे कनिष्ठ साठा अधिक्षक म्हणून दि. १५/१२/२०२० पासून कार्यरत होते. तसेच सचिन रामकृष्ण शिरसट यांची प्रशासकीय बदली झाल्याने सेवाज्येष्ठतेप्रमाणे व वरिष्ठांच्या आदेशाने वखार केंद्राचा चार्ज घेण्यासाठी दिनांक २०/८/२०२४ रोजी ते हजर झाले होते. सचिन शिरसट हजर झाल्यापासून मंगळवेढा वखार केंद्राचे पुर्वनियुक्त कनिष्ठ साठा अधिक्षक तथा आरोपी महेश सलगरे हे वखार केंद्राचा चार्ज देण्यास टाळाटाळ करत होते. तेंव्हा याबाबत शिरसट यांनी फिर्यादी विजय दारकुंडे उपमहाव्यवस्थापक विभागीय कार्यालय, पुणे यांना सांगितल्यावर त्यांनी वखार केंद्राचे दप्तर तपासणी करण्याच्या सुचना दिल्या. दप्तर तपासले असता दप्तरी नोंदीमध्ये व वखार केंद्रातील प्रत्यक्ष मालाचे साठयामध्ये तफावत आढळून आली. त्यामुळे सचिन शिरसट यांनी वखार केंद्राचा चार्ज घेण्यास नकार दिला. तेंव्हापासून आरोपी महेश सलगरे हे कर्तव्यावर गैरहजर होते. दिनांक १५/१०/२०२४ रोजी सचिन शिरसट यांनी चार्ज घेतला व त्यांनी जा.क्र.मरावमं/मंगळवेढा/२३८/२०२४, दिनांक २१/१०/२०२४ अन्वये केंद्रातील दप्तरी नोंदी व प्रत्यक्ष साठयामध्ये असलेली तफावत लेखी पत्राद्वारे फिर्यादीस कळवल्यानंतर या घटनेबाबत महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना ही घटना कळवली. तदनंतर दिनांक २३/१०/२०२४ रोजी लातूर विभागीय व्यवस्थापक निलेश लांडे यांनी मंगळवेढा वखार केंद्राचे इन्सपेक्शन केले.

तपासणी दरम्यान त्यांना गोदाम क्रमांक दोन मधील पाच वखार पावत्यावरील १६८० पोती सरकी पेंड त्याची किंमत २० लाख ६ हजार ६८० व डेड स्टॉक मधील एक किलो वजनाच्या ४ खत पिशव्या त्याची किंमत ६८० रूपये असा मुद्देमाल व वखार भाडे १ लाख ७१ हजार ८०५ रूपये नोंदी प्रमाणे कमी आढळून आल्याने तसा लेखी अहवाल महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ पुणे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना सादर केला असल्याचे पुणे विभागीय कार्यालयातील उपमहाव्यवस्थापक विजय कारभारी दारकुंडे (वय ४९ रा.कात्रज पुणे) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलिस करीत आहेत. दरम्यान या अपहारामुळे शेतकरी व व्यापारी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे.

## झिंजेवस्ती येथे विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार



**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २१ मार्च -**

माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथे विविध स्पर्धा परीक्षेतून तसेच क्रिडा क्षेत्रात दैदीप्यमान यश संपादन करणाऱ्यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

यामध्ये राजवर्धनसिंह झिंजे याने १२५ किलो वजनगटात कुस्ती स्पर्धेत व वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविल्याबददल गणेश शिवाजी इंगळे यांची रेंज फॉरेस्ट ऑफीसरपदी निवड झाल्याबद्दल सारंग पाटील याने ९४ किलो वजनगटात राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग प्रथम क्रमांक, नितीन संजय राऊत यांनी डॉकटर पदवी मिळविल्याबद्दल झिंजेवस्ती येथे अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाबूराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी वनपाल शिवाजी इंगळे, विठ्ठल मदने, नबाजी मदने, गणेश झिंजे, नंदकिशोर कदम, श्रीमंत कदम, वैभव शिकारे, संजय पाटील, संजय राऊत, सोपान कदम, राहुल कदम, बाळकृष्ण कदम, तुकाराम कदम, दत्तू माळी, एकनाथ माळी, पोपट रजपूत उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## लोकसेवा विद्यालयात जागतिक वन दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ मार्च-**

लोकसेवा विद्यालय आगळगाव प्रशालेत २१ मार्च हा जागतिक वन दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना जागतिक वन दिनाचे महत्त्व आणि पृथ्वीवरील सजीव सृष्टीसाठी वनांची गरज याविषयी माहिती देण्यात आली.

पर्यावरण वाचले तरच आपल्या सर्वांचे अस्तित्व आहे असा संदेश त्यांना देण्यात आला. यावेळी शासनाच्यावतीने प्रशालेच्या समोरील रस्त्याच्या दुतर्फा नुकत्याच लावलेल्या वड, पिंपळ, कदंब इत्यादी झाडांसाठी विद्यालयातील जवळपास ४०० विद्यार्थ्यांनी आठवड्यातून दोन दिवस एक बाटली माझ्यासाठी आणि एक बाटली झाडासाठी या उपक्रमाची सुरुवात करुन चार विद्यार्थ्यांनी एका झाडाला चार लिटर पाणी घालून या उपक्रमाची सुरुवात केली. या उपक्रमामुळे आठवड्यातून किमान १०० झाडांना प्रत्येकी चार लिटर पाणी मिळून त्यांचे संवर्धन केले जाणार आहे. यावेळी सचिन उकिरडे, एम.पी. नाईकनवरे, पी.एम. शिंदे, ए. एस. टोपे, एस.सी. बचुटे, एस.एम. मिरगणे, एन.बी. कोळेकर, पी.डी. माने, एस.डी. मोरे, एस.एम. अवतार, आर.डी. गरड, सी.पी. दोडमणी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...




### पंढरीत महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी मोर्चा

**पंढरपूर, दि. २१ मार्च -**

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार म्हणजे भारतासह जगभरातील बौद्धांचे प्रमुख तीर्थक्षेत्र होय. या महाबोधी महाविहाराचे व्यवस्थापन बौद्धांच्या ताब्यात नाही. येथील टेम्पल अॅक्ट रद्द करून ते बौद्धांच्याच ताब्यात असावे, यासाठी विविध बौद्ध संघटनांकडून आंदोलन केले जात आहे. अनेक बौद्ध बांधवांकडून आंदोलन करून केंद्र सरकारला निवेदन पाठवण्यात आले आहे. महाबोधी महाविहार मुक्ती संघर्ष समिती पंढरपूर यांच्या वतीने शुक्रवारी तहसीलदार यांच्यामार्फत महाराष्ट्र सरकारने बिहार व केंद्र सरकारला कळवावे आणि बुद्धगया महाबोधी महाविहार हिंदू पंडितांच्या तावडीतून मुक्त करून बौद्धांच्या हातात द्यावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी मागणीचे निवेदन नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड यांना देण्यात आले. यावेळी दीपक चंदनशिवे, आप्पासाहेब जाधव, सुनील वाघमारे, बाळासाहेब कसबे, सुजितकुमार सर्वगोड, दिलीप देवकुळे, एल.एस सोनकांबळे, अंबादास वायदंडे, गोविंद सर्वगोड, संतोष पवार, उमेश वाघमारे, संतोष सर्वगोड, उमेश सर्वगोड, अमित कसबे, जितेंद्र आठवले, विष्णू धाईंजे, समाधान लोखंडे, शीलरत्न झेंडे, पोपट क्षीरसागर उपस्थित होते.




### पंढरीत विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान

**पंढरपूर, दि. २१ मार्च -**

महिला दिनाचे औचित्य साधून नवनवीन उद्योगात, व्यवसाय, शेती व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांना राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे उद्योग व व्यापार सेलचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन ज्योतिर्लिंग बहुउद्देशीय समाजसेवी संस्था गादेगाव व ज्योतिर्मय योग निसर्गोपचार केंद्र पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. यावेळी ज्योतिर्मय योगच्या संचालिका योगगुरु डॉ. ज्योती अनिल शेटे, यांच्या मार्गदर्शना खाली त्यांच्या योग साधिकेने कार्यक्रमात सहभागी होऊन आपले कला गुण सादर केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजश्री डेडे, अनिता नागराळे, अॅड. सुकेशनी शिर्के-बागल, उद्योजक राजेश वाघमोडे, डॉ. माणिक मस्के, मिलिंद वायकर आदी उपस्थित होते.



### होटगी स्टेशनचे सरपंच जगनाथ गायकवाड यांच्यावर अविश्वास प्रस्ताव

**सोलापूर, दि. २१ मार्च -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी स्टेशनचे सरपंच जगन्नाथ शिवाजी गायकवाड यांच्या विरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. होटगी स्टेशन ग्रामपंचायतीच्या दहा पैकी आठ सदस्यांनी एकत्र येऊन तहसीलदार किरण जमदाडे यांच्याकडे शुक्रवारी दुपारी अविश्वास प्रस्ताव दाखल केला. सरपंच जगन्नाथ गायकवाड यांच्या विरुद्ध तहसीलदार यांच्याकडे दाखल केलेल्या प्रस्तावावर सुभाष रामचंद्र पाटोळे, निसार अहमद कांबळे, गायत्री कुणाल ठक्के, नीलम लक्ष्मण भोसले, मीना घनश्याम पोरे, जिजाबाई अशोक धायगोडे, फातिमा बंदगी नदाफ, मोहनबी मलंग शेख या आठ ग्रामपंचायत सदस्यांच्या सह्या आहेत. सरपंच गायकवाड हे ग्रामपंचायतीचा कारभार करताना ग्रामपंचायत सदस्यांना विश्वासात न घेणे, ग्रामपंचायत कामामध्ये हयगय व कसूर करणे, ग्रामपंचायतीचा कारभार मनमानी पध्दतीने करणे, ठरावाप्रमाणे अंमलबजावणी कामामध्ये कुचराई करणे, सदस्य व ग्रामविकास अधिकारी यांच्यामध्ये सलोखा ठेवून दैनंदिन पारदर्शी कारभार न करणे अशी तक्रार करण्यात आली आहे. यापूर्वी सरपंच जगनाथ गायकवाड यांच्यावर तीन अपत्यासंदर्भात तक्रार दाखल करण्यात आली होती. गुरूवारी २७ मार्च रोजी दुपारी बारा वाजता होटगी स्टेशन ग्रामपंचायत मध्ये तहसीलदार यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

### सांगोल्यात एकनाथ षष्ठी साजरी

**सांगोला, दि. २१ मार्च -**

फाल्गुन कृष्ण षष्ठी हा दिवस एकनाथ षष्ठी म्हणून साजरा केला जातो. सांगोला शहरात समर्थ नगर परिसरात मनिषा ठोंबरे यांच्या निवासस्थानी सालाबादप्रमाणे पारंपरिक पद्धतीने एकनाथ षष्ठी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी महिला गोविंद ग्रुप तर्फे विष्णूसहस्त्रनाम पठण करण्यात आले. त्यानंतर यमाई महिला भजनी मंडळ, सांगोला यानी भजन सेवा सादर केली. पुष्पवृष्टी नंतर प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## बाजार समितीचे प्रशासक निंबाळकरांची २४ तासातच उचलबांगडी

- डॉ.बगले यांची याचिका
- हायकोर्टाने दिली स्थगिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च -**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकपदावर दुसऱ्यांदा फेरनियुक्ती करून घेतलेल्या मोहन निंबाळकर यांची २४ तासातच पुन्हा उचलबांगडी झाली आहे. राष्ट्रवादीचे दक्षिण सोलापूरचे नेते डॉ.बसवराज बगले यांनी दाखल केलेल्या तातडीच्या याचिकेवर निकाल देऊन मुंबई उच्च न्यायालयाने निंबाळकर यांच्या नियुक्तीला स्थगिती दिली आहे व त्यांना तात्काळ पदभार सोडण्याचे आदेश दिले आहेत.

पुणे येथे पणन विभागाच्या उपसंचालक पदावर कार्यरत असलेल्या मोहन निंबाळकर यांच्या नियुक्तीला हरकत घेऊन त्यांनी केलेल्या नियमबाह्य कामकाजाबद्दल डॉ. बगले यांनी पणनमंत्री आणि प्रधान सचिवाकडे पुराव्यासह तक्रारी केल्या होत्या. त्यावर पणन संचालकांचा खुलासा सरकारने मागविला होता. शिवाय जिल्हा उपनिबंधकांच्या परस्पर पत्रव्यवहार करून बेकायदेशीर कामकाजाचा सपाटा लावल्याने त्यांच्याविषयी जिल्हा उपनिबंधकांनी सुध्दा गंभीर आरोपांचा अहवाल सादर केला होता. डॉ.बगले यांच्या आरोपात तथ्य असल्यामुळे सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रविण दराडे यांच्या आदेशानुसार निंबाळकर यांना सोलापूर बाजार समितीच्या प्रशासक पदावरून तडकाफडकी हटविण्यात आले होते. पणन विभागाचे उपसचिव संतोष देशमुख यांनी ५ मार्च रोजी आदेश काढून निंबाळकर यांना कार्यमुक्त केले होते. तर शहर उपनिबंधक प्रगती बागल यांची प्रशासक पदावर नियुक्ती केली होती.

प्रशासक पदावर असणाऱ्या व्यक्तीला त्या संस्थेच्या कामकाजाबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार नसताना मोहन निंबाळकर यांनी हुकुमशाही पध्दतीने पणन संचालकांशी संगनमत करून बेकायदेशीर कामकाज करीत असल्याबद्दल डॉ.बगले यांनी तक्रारी केल्या होत्या. त्याची चौकशी करून कारवाई करा असे आदेश पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दिले होते. मात्र पणनमंत्र्यांनी पून्हा निंबाळकर यांचीच फेर नियुक्ती करण्यासाठीचे फर्मान सोडले होते. त्यानुसार निंबाळकर यांनी गुरूवारी २० मार्च रोजी सकाळी ११ वाजता एकतर्फी पदभार घेतला होता. मात्र बगले यांच्या तत्परतेमुळे निंबाळकर यांची अवघ्या २४ तासात पुन्हा दुसऱ्यांदा उचलबांगडी झाली आहे. त्यामुळे पुन्हा खमंग चर्चा सुरू झाली आहे. मुंबई उच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल करून तातडीने सुनावणी घेण्याची विनंती डॉ.बगले यांनी गुरूवारी केली होती. त्यानुसार शुक्रवारी सकाळीच न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्यापुढे युक्तीवाद झाला. युक्तीवादातील महत्वाचे मुद्दे, दाखल केलेले पुरावे, जिल्हा उपनिबंधकांचा गंभीर व वस्तुनिष्ठ अहवाल आणि शासनाने केलेली चूक लक्षात घेऊन मोहन निंबाळकर यांच्या नियुक्ती आदेशाला न्यायमूर्तींनी स्थगिती दिली आणि दोन आठवड्यात निंबाळकरांच्या नियुक्तीबाबत प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश शासनाला दिले आहेत. प्रशासक निंबाळकरांना तात्काळ बाजार समितीचा पदभार सोडण्याचे आदेश दिले आहेत. शुक्रवारी सकाळी झालेल्या सुनावणीत डॉ.बगले यांच्याकडून प्रसिध्द विधिज्ञ अॅड. गुरबाळा बिराजदार यांनी काम पाहिले.

## कवी डॉ. राहुल पालके यांनी केले कवितांचे सादरीकरण

**जागतिक कविता दिनानिमित्त कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २१ मार्च -**

दुनिया डिजीटल झाली, माणसांची ओळख सोशल मिडियावरच राहिली ... दुधारी शस्त्र घेवूनी हाती मानवा, आता तुला विधायक विचारच तारी या 'डिजीटल दुनिया' कवितेच्या ओळींनी डॉ. राहुल पालके यांनी कविता विश्वातून तरुणाईला साद घातली.

येथील श्री शिवाजी महाविद्यालयात जागतिक कविता दिनानिमित्त कर्मवीर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत कविता वाचनाचे आयोजन करण्यात आले होते. बालपणापासून तारुण्याचा प्रवास रेखाटताना त्यांनी आजच्या तरुणाईला वेधक व बोधक अशा कवितांचे सादरीकरण केले. शिवझुंज, भारत, माझे महाविद्यालय, आत्मविश्वास, इच्छाशक्तीचे बळ,पोशिंद्याचा राजा अशा विविध कवितांमधून त्यांनी विद्यार्थी मनाचा कोपरा उलगडला. त्यांनी कुसुमाग्रज, विं. दा. करंदीकर, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ, सूरदास, कालिदास, मैथिली शरण गुप्त भारतेंदु, विल्यम वर्डस्वर्थ, पी. बी. शेली, जॉन किटझ, कमला दास आदी कवींचा काव्यलेखनाचा प्रवास उलगडला. अमेरिकन कवी रॉबर्ट फ्रॉस्ट यांच्या 'स्टॉपिंग बाय वूडझ ऑन अ स्नोवी इव्हिनिंग' या कवितेमधील ओळींची आठवण करुन विद्यार्थ्यांना ध्येयशील राहण्याचा संदेश दिला. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वलिखित व आवडत्या कवींच्या कवितांचे सादरीकरण केले. यावेळी प्रा. मारुती मस्के, डॉ. राजश्री गव्हाणे, कुणाल गव्हाणे उपस्थित होते.



## प्रेमसंबंधातून तरुणाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२१ मार्च-**

आगळगाव येथे एका तरुणाने प्रेम संबंधातून झालेल्या मानसिक त्रासाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.



या प्रकरणी एका महिलेवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रामचंद्र बाबुराव नारायणकर (वय ६६, रा. आगळगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा सागर (वय २५) याचे एका विवाहित महिलेसोबत मागील पाच वर्षांपासून प्रेमसंबंध होते. संबंधित महिला त्याच्याकडून वेळोवेळी आर्थिक मदत घेत होती. काही दिवसांपासून त्याने पैसे देणे बंद केल्याने तिने वारंवार त्याच्यावर दबाव आणला आणि धमक्या दिल्या. १८ मार्च रोजी सकाळी सागरचे आई-वडील वारंवार त्या महिलेचा नाद सोड असे सांगितले होते. त्या महिलेने घरी येऊन सागरला पुन्हा धमकी दिली की, तु जर मला पैसे आणून दिले नाही किंवा भेटायला आला नाही, तर मी तुझ्या विरोधात पोलीस ठाण्यात खोटी तक्रार करेन. या मानसिक तणावाखाली सागर सतत अस्वस्थ होता.

## अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस निवड यादी प्रसिद्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. २१ मार्च-**

एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण)व प्रकल्प अकलूज (ग्रामीण) मधील अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस निवड यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ४ अंगणवाडी सेविकासाठी अर्ज तर २८ मदतनीसपदासाठी अर्ज मागविण्यात आले होते.

त्याची निवड आज प्रसिद्ध करण्यात आली.खळवे, साळमुख या दोन गावातील जागा प्रलंबित आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अकलूज अंतर्गत अंजुम आरा नाईकवाडी (तांबवे), प्रतीक्षा भोसले (कोंडारपट्टा) या दोन महिलांची सेविकापदी निवड करण्यात आली.

तसेच हेमलता साठे (अकलूज), गुलनार बागवान (अकलूज), यास्मीन जमादार (सवतगव्हाण), सुनैना मुलाणी (मिरे),आशाबाई येवले (लवंग),विद्या अंकुशराव (चौंडेश्वरवाडी), हिनाकौसर नदाफ (चौंडेश्वरवाडी), वैष्णवी गायकवाड (प्रतापनगर), माधुरी नवले (माळीनगर) या नऊ महिलांची मदतनीस पदी निवड करण्यात आली आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प माळशिरस (ग्रामीण)मध्ये पूनम काशीद (धर्मपुरी) व शिवानी गायकवाड (काळमवाडी) या दोन ठिकाणी अंगणवाडी सेविकाची निवड करण्यात आली. तसेच अश्विनी गोरड वैशाली गोरड, रेवती गोरड (गोरडवाडी ३) शोभा नाईकनवरे (बोंडले), संगीता कोळेकर, आम्रपाली बनसोडे (धानोरे २), योगिता खुडे (निमगाव), हिमाली मारकड, रेश्मादेवी ठवरे (डोंबाळवाडी २) ,भक्ती गोरे (फोंडशिरस),विद्या मारकड, (मारकडवाडी), किरण कदम (कदमवाडी), प्रियांका गोफणे (मांडवे), प्रियांका पारसे (कोळेगाव), स्वाती केंगार, कावेरी भुसारे (नातेपुते २), शुभांगी राम शेंडगे (एकाशिव) या १७ मदतनीस यांची निवड करण्यात आली आहे.

तसेच सेविका व मदतनीस यांची प्रतीक्षा यादी करण्यात आली आहे असून २० मार्च २०२६ पूर्वी या भरती करण्यात आलेल्या गावात राजीनामा, मयत, सेवा निवृत्त झाल्याने पद रिक्त झाल्यास त्या स्वर्गाप्रमाणे प्रतीक्षा यादी मधील महिलांची अनुक्रमानुसार निवड करण्यात येणार असल्याची माहिती माळशिरस बाल विकास प्रकल्प अधिकारी आसमॉ आतार, अकलूज बाल विकास प्रकल्प अधिकारी बालाजी आल्लडवाड यांनी दिली.

## उळे येथे नाथषष्ठीनिमित्त नामसंकीर्तन संपन्न

**● क्षीरसागर परिवाराकडून ४६ वर्षापासून दिली जाते पंगत**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२१ मार्च -**

उळे (ता. दक्षिण सोलापूर) येथील हनुमान मंदीरात नाथषष्ठीनिमित्त श्रीगुरू देहूकर सांप्रदायिक भजनी मंडळाच्या सहाय्याने हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांची गुलालाची नामसंकीर्तन सेवा झाली. त्यानंतर श्री क्षिरसगार महाराज यांच्यावतीने महाप्रसादाची पंगत देण्यात आली.

येथे गेल्या ४६ वर्षापासून दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांच्यावतीने हा नाथषष्ठीचा एकदिवसीय उत्सव केला जातो. यंदाचे ४७ वे वर्ष होते. रात्रीची कीर्तनसेवा कोंडी (ता.उत्तर सोलापूर) येथील हभप पुरूषोत्तम महाराज सुतार यांची झाली. यावेळी उळे, कासेगाव, तामलवाडी, होनसळ, राळेरास, उळेवाडी, एकरूख, तरटगाव येथील भाविक उपस्थित होते.



गेल्या ४६ वर्षापूर्वी येथे हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांच्यावतीने नाथषष्ठीचा उत्सव सरू करण्यात आला. त्यास जगद्गुरू श्रीसंत तुकाराम महाराजांचे वंशज वै.श्रीगुरू सोपानकाका देहूकर, वै.श्रीगुरू ज्ञानेश्वर माऊली देहूकर, श्रीगुरू बापूसाहेब महाराज देहूकर यांचे आशिर्वाद लाभले. तर वडील वै. रामचंद्र रूद्रप्पा क्षिरसगार व आई वै. गंगाबाई यांचे विशेष प्रयत्नातून नाथषष्ठीचा उत्सव सुरू झाल्याचे हभप दत्तात्रय महाराज क्षिरसागर यांनी सांगितले. या उत्सवात आतापर्यंत श्रीगुरू देहूकर महाराजांसह परिसरातील सर्व महाराजांची कीर्तनसेवा झाली. तीन तप पूर्ण झाल्यावर म्हणजे ३६ व्या वर्षी श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांची कीर्तनसेवा झाली होती. पुढील वर्षी या चार तपपूर्ती सोहळा असणार आहे. त्यानिमित्त मोठा उत्सव करण्याचा संकल्प असल्याचे दत्तात्रयमहाराज क्षिरसागर यांनी सांगितले. या उत्सवाची सुरवात करताना वडील वै. रामचंद्र व आई वै. गंगाबाई यांनी घरी दररोज भजनसेवा व पुराणकथा निरूपण सुरू केलेली सेवा आतापर्यंत सुरू असल्याचे श्री. क्षिरसागार यांनी सांगितले. आहे. सध्या कुटूंबातील माझी पत्नी सौ. शशिकला, मुलगा विष्णूपंत व सोमनाथ, सूना, नातू यांचा नाथषष्ठी उत्सवात हिरीरीने सहभाग असतो. याशिवाय ग्रमास्थांचेही मोलाचे सहकार्य लाभत असल्याचे श्री. क्षिरसागर महाराजांनी सांगितले.

परिसरातील भाविकांसह दत्तात्रय क्षिरसगार महाराजांनी २०२३ ला पैठणमध्ये श्रीसत एकनाथ महाराजांची चरित्रकथा निरूपणासह नामसप्ताहाचे आयोजन केले होते. यामध्ये श्रीगुरू देहूकर सांप्रिदायिक भजनी मंडळाचे सहकार्य लाभले होते.

## मंद्रुपच्या जिल्हा परिषद शाळेत पक्ष्यांसाठी जलपात्र

**● जागतिक चिमणी दिनानिमित्त बसवनगर पोलीस पाटलांचा उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २१ मार्च-**

झळा वाढल्या उन्हाच्या, तहान भागवू पक्षांच्या घोषणा देत जागतिक चिमणी दिनानिमित्ताने मंद्रूप येथील जिल्हा परीषद शाळेच्या आवारातील अनेक झाडांवर शाळेच्या मुलां-मुलीं समवेत पक्षांना उन्हाळ्यात पाण्याची सोय व्हावी यासाठी झाडांवर पक्षी-जलपात्र बांधून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापक प्रकाश कुंभार,पोलीस पाटील पक्षी मित्र प्रविण राठोड,सचिन साठे, जहाँआरा तांबोळी ,विमल सदरखेड,कविता दिवाणजी, अश्विनी स्वामी, अंजली ढोले, बलभीम नारायणे, प्रकाश उटगीकर, राजू राठोड, सोमनाथ धुळे, राऊ पवार, मडोळव्वा स्वामी, महानंदा बिराजदार, मथुरा चंदनशिवे, राजप्रज्ञा क्षीरसागर, सुप्रिया महाजन,संगिता स्वामी शिक्षक-शिक्षिका यांच्यासह मशापा कोळी,महेश पांढरे, यल्लाप्पा धोत्रे उपस्थित होते.



यावेळी मुख्याध्यापक प्रकाश कुंभार म्हणाले की, दिवसेंदिवस तापमानाचा पारा अधिक आग ओकात आहे.यामुळे माणसांचेच काय तर पशु पक्षांचे अतोनात हाल होत आहेत. नैसर्गिक पाण्याचे सर्व स्त्रोत पूर्णपणे आटले आहेत. यामुळे चिमणी आणि इतर पक्षांचे पाण्याअभावी अत्यंत बिकट हाल होत आहेत. पाण्याने तहानलेल्या चिमण्या, पक्षी बेशुद्ध अवस्थेत पडलेले दिसून येतात. मैल न मैल पाण्याची व्यवस्था नसल्याने रानातील पक्षांची काय दुरवस्था व हाल होत असेल याची कल्पना नाही केलेली बरी. म्हणून प्रविण राठोड यांनी पोलीस पाटील मानधनामधून परिसरात २५०० जलपात्रे मोफत दिली आहेत. ते स्वतः माठाचे पक्षी जलपात्र तयार करून घेऊन जिथे पाण्याची व्यवस्था एकदा जलपत्रात पाणी ठेवण्याची विनंती करत आहेत. निसर्गातून लुप्त होत चाललेली अनेक प्रकारे किलबिल करणारी मधुर नैसर्गिक संगीत ऐकावयास मिळेल. उन्हाळ्यात चिमणी,पक्षी जलपात्रातील थंड पाण्याने आपली तहान भागवतील व पाण्याविना होणारे चिमण्या, पक्षांचे प्राण वाचण्यास मदत होणार आहे. सूत्रसंचालन राजू राठोड यांनी तर आभार प्रकाश उटगीकर यांनी केले.

### प्रविण राठोड यांचे कार्य कौतुकास्पद



बसवनगरचे पोलीस पाटील मानधनातुन पक्षी जलपात्र तयार करून चिमण्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. ऊन्हाळ्यात पक्षी जलपात्र मोफत देऊन पक्ष्यांना जीवनदान देणार्या राठोड यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे मंद्रुप पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज यांनी पवार सांगितले.




## भोसे परिसरातून अल्पवयीन मुलास पळविले

**अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.२१ मार्च-**

भोसे परिसरातून एका १६ वर्षीय कॉलेज तरुणास फूस लावून अज्ञात व्यक्तीने पळवून नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

या मुलाच्या वडीलाने पोलीसात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार दि.९ मार्च रोजी कुटूंबातील सर्वजण सायंकाळी चारच्या दरम्यान शेतात काम करत असताना अल्पवयीन मुलगा हा घरी एकटाच होता. काम करुन कुटूंबीय घरी परतल्यावर अल्पवयीन मुलगा घरी दिसला नाही. त्याची रात्री उशीरापर्यंत वाट पाहिली परंतू तो आला नाही. वडिलाने सर्व नातेवाईकाकडे फोनव्दारे चौकशी केली असता तो आमच्याकडे आला नसल्याचे सांगितले. तो अल्पवयीन असल्याने त्यास कोणीतरी अज्ञात कारणासाठी फुस लावून कायदेशीर रखवालीतून पळवून नेले असल्याचे वडिलाने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. आधिक तपास पोलीस करीत आहेत

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## जात्यावरील ओव्या काव्य संग्रहाचे रविवारी प्रकाशन




**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.२१ मार्च -**

कवयीत्री सरुबाई डोके यांच्या जात्यावरील ओव्या आणि भूमिपुत्र वाघ यांचा काव्य संग्रह आभाळमाया संग्रहाचे प्रकाशन दि.२३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता पर्याय संस्था, रामदास वाजे सांस्कृतिक सभागृह कळंब जिल्हा धाराशिव या ठिकाणी होत आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती विश्वनाथ तोडकर (अण्णा), प्राचार्य अनिगुंठे, रमाकांत कुलकर्णी, एम.एन. कोंढाळकर, प्राचार्य अशोक मोहेकर, भास्कर चंदनशिव, प्राचार्य गोविंद बिराजदार, अशोक शिंदे, अमर चौंदे, परमेश्वर पालकर, बालाजी अडसूळ, प्रो. बाळकृष्ण भवर, सतीश टोणगे, सुभाष घोडके अशा विविध मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये कळंब या ठिकाणी कार्यक्रम संपन्न होत आहे.

कळंब शहर व धाराशिव जिल्ह्यातील कथाकार, कवी यांना आयोजकांकडून खास निमंत्रित करण्यात आले असून काव्य संमेलनाचाही कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

## संक्षिप्त वृत्त...



### तांदुळवाडी जि.प. शाळेचे स्नेहसंमेलन संपन्न

**परंडा, दि.२१ मार्च -**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त (तिथी) दिनानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलन अर्थात सांस्कृतिक कार्यक्रम जि.प.कें.प्रा. शाळा, तांदुळवाडी (ता. परंडा) येथे दि.१७ रोजी सोमवार सायंकाळी विविध गुणदर्शन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच श्रीराम खरसडे, गणेश शेळके, विकास पाटील, उपसरपंच भालचंद्र पवार, विशाल दुरुंदे, सरपंच मिनाक्षी गोरे, ॲड. दादासाहेब खरसडे, भोसले, शा.व्य. समिती सर्व सदस्य यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष देवकर, नितीन मटकर, सोनाली खरसडे, उर्मिला उदागे, स्वाती खरसडे, हरिओम दुरुंदे, कैलास दैन इत्यादिंनी परिश्रम घेतले.

### हनुमान जन्मोत्सव कार्यकरणी जाहीर

**लोहारा, दि.२१ मार्च -**

लोहारा तालुक्यातील कास्ती बु येथे दि.१९ मार्च रोजी श्री कल्लेश्वर देवस्थान मंदिरात श्री राम नवमी व हनुमान जन्मोत्सवानिमित्त सुयशकुमार दडगुले यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. यावेळी अध्यक्षपदी राम जावळे, उपाध्यक्षपदी ओंकार परसे, धनाजी कुंभार व शोभायात्रा प्रमुख म्हणून सुयशकुमार दंडगुले आणि संदीप रवळे यांची निवडी करण्यात आल्या. यावेळी अक्षय आंबेकर, कृष्णा सोनटक्के, वैभव भरगंडे, स्वप्नील रवळे, सौरभ भरगंडे, शंकर कोळी, चव्हाण, संकेत कोळी, शुभम पाटील, दिपक भरगंडे, शेखर रवळे, अविनाश कोळी, आप्पा सुतार, तुकाराम दंडगुले, विठ्ठल दंडगुले, सुशांत पाटील, गोपाळ कुंभार, शिवाजी पवार, अविनाश कोळी, कृष्णाथ कोळी, विठ्ठल रवळे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते.





### वागदरीत भवानसिंग महाराज यात्रा संपन्न

**जळकोट, दि.२१ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथील ग्रामदैवत श्री. संत भवानसिंग महाराज यांची यात्रा मोठ्या उत्साहाने व विविध धार्मिक कार्यक्रमाने संपन्न झाली. यात्रेनिमित्त दि.२० मार्च रोजी दिवशी येथील नाथ महाराजांच्या मंदिरासमोर हरी जागराचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ७ वाजता चुंगी येथील सद्गुरु भवानसिंग महाराजांच्या पालखीचे आगमन वागदरीमध्ये होताच येथील भवानसिंग महाराज भजनी मंडळ व ग्रामस्थ यांच्या साह्याने वागदरीनगरी मधून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. या यात्रा कार्यक्रमात वागदरी, नळदुर्ग, चिकुंद्रा, चुंगी, येडोळा, खुदावाडी, गुजनुर, दहिटणा, शहापूर, गुळहळ्ळी, लोहगाव, नंदगाव व परिसरातील भाविक भक्त, महिला, युवक ग्रामस्थ उपस्थित होते.

### दत्तू कदम यांचे निधन

**जळकोट, दि.२१ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील दत्तू गोपाळा कदम (वय ८७) यांचे अल्प आजाराने पुणे येथे एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना शुक्रवारी (दि.२१) रोजी पहाटे ६ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या शनिवार (दि.२२) रोजी सकाळी आठ वाजता जळकोट येथील सार्वजनिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात ४ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. वारकरी संप्रदायात रमणारे व्यक्तिमत्व म्हणून ते परिचित होते.



## जिल्हा वार्षिक योजनेचा निधी जाणार परत...!

# केवळ ९ दिवस शिल्लक; कोट्यावधीचा निधी खर्च होणे बाकी?

**तभा वृत्तसेवा / प्रमोद राऊत**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**

जिल्ह्यातील वार्षिक विकास योजनेच्या निधीचे आगामी वेळापत्रक अत्यंत चिंताजनक बनले आहे. जिल्ह्याला केंद्र आणि राज्य सरकारकडून मोठा निधी मिळतो, परंतु त्याचा वापर आणि खर्च करण्यासाठी केवळ ९ दिवस बाकी राहिले आहेत. अशा परिस्थितीत, जो निधी जिल्ह्याच्या विकासासाठी राखीव ठेवला गेला आहे, तो परत जाण्याची गंभीर शक्यता निर्माण झाली आहे.

वार्षिक विकास योजना ही प्रत्येक वर्षी जिल्ह्याच्या विकासासाठी लागणाऱ्या विविध पायाभूत सुविधांच्या, शिक्षण, आरोग्य, आणि इतर सामाजिक क्षेत्रांतील प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देणारी एक महत्त्वाची योजना आहे. योजनेअंतर्गत मिळणारा निधी, विविध विभागांसाठी निर्धारित केलेला असतो. पण, या निधीचा योग्य वापर न केल्यास, त्याचा लाभ जिल्ह्याच्या लोकांना मिळणार नाही.

जिल्ह्याला या वर्षी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र, यापैकी बऱ्याच निधीचा वापर साधारणपणे डिसेंबरच्या अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतो.

परंतु, जिल्ह्यात विविध कारणांमुळे हे काम साध्या आणि प्रभावीपणे पार पडलेले नाही. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणि योजना पूर्ण करण्याच्या दिरंगाईमुळे, या निधीचा योग्य वापर करण्याची शक्यता कमी झाली आहे.

योजनेचे मुख्य उद्दिष्ट हे असते की, समाजातील गरजू क्षेत्रांना प्राधान्य देऊन त्यांच्यासाठी आवश्यक सुविधांचा विकास करणे. त्यामुळे, शाळा, आरोग्य केंद्र, रस्ते, पाणीपुरवठा, तसेच इतर महत्त्वाचे प्रकल्प यांमध्ये निधी खर्च केला जातो. पण, निधीच्या नियोजित खर्चाच्या तुलनेत कामाचा गती खूपच मंद आहे.जिल्हा प्रशासनाकडून दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्याच्या विकासासाठी असलेला कोट्यावधी रुपयांचा निधी केवळ ९ दिवसांत खर्च करणे आवश्यक आहे.

हे करणे शक्य असणार नाही, कारण संबंधित प्रकल्पांची तयारी, निविदा प्रक्रिया, तसेच इतर व्यवस्थापनासाठी किमान काही महिने लागतात. याच कारणामुळे, या निधीच्या खर्चाची शक्यता न्यून झाली आहे. जिल्हा प्रशासनाने यावर उपाययोजना करण्यासाठी विविध बैठकांचे आयोजन केले आहे.

विविध विभागांना अलर्ट करण्यात आले असून, कामांच्या गतीला वाढविण्यासाठी तातडीने आदेश दिले गेले आहेत. तथापि, अशा परिस्थितीत प्रशासनाने किती प्रभावीपणे काम केले, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल. प्रशासनाच्या या धाडसिक प्रयत्नांमुळे निधीचा काही अंश खर्च होण्याची शक्यता आहे.

शंभर टक्के निधी खर्च होणे आणि योजनेचे उद्दीष्ट पूर्ण करणे, हे निश्चितच अवघड आहे.

जिल्ह्यातील वार्षिक विकास योजनेचा निधी खर्च करण्यासाठी प्रशासनाला कामाचा वेग वाढवावा लागणार आहे. प्रशासनाने जलद गतीने योजना पूर्ण करण्याबरोबरच कामांची गुणवत्ता राखण्याचेही आव्हान असताना कामाच्या स्थितीबाबत डीपीओंना मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता डीपीओंनी भ्रमणध्वनी उचलला नाही.

त्यांच्या या कृत्यामुळे जनतेला दिलासा कसा मिळणार हा प्रश्नच आहे.

### डीपीओ साहेब फोन उचलेनात; जनतेला दिलासा मिळणार कसा?

जिल्ह्यातील अनेक प्रमुख प्रकल्प अर्धवट आहेत. अनेक शाळांमध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा अजूनही पुरेश्या नाहीत. असं असतानाही, निधी पूर्णपणे खर्च न केल्यामुळे, शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होईल. त्याचबरोबर, असे अपव्यय झाल्यास, शासनाच्या विकास योजनांबाबत जनता आणि विरोधकांचे दबाव आणखी वाढेल.जिल्ह्यातील वार्षिक विकास योजनेचा निधी केवळ ९ दिवसांत खर्च करण्यासाठी प्रशासनाला आता कडक निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने जलद गतीने योजना पूर्ण करणे, निविदा प्रक्रिया साध्या ठेवणे आणि कामांची गुणवत्ता राखणे यासाठी योग्य कदम उचलावेत. अन्यथा, कोट्यावधी रुपयांचा निधी पाण्यात जाऊन, जिल्ह्याच्या विकासाची गती मंद होईल, जे प्रत्येक नागरिकांच्या हितासाठी योग्य नसल्याची प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

### निधीच्या अपव्ययाची शंका...

जिल्ह्यातील अनेक प्रमुख प्रकल्प अर्धवट आहेत. अनेक शाळांमध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि आरोग्य सुविधा अजूनही पुरेश्या नाहीत. असं असतानाही, निधी पूर्णपणे खर्च न केल्यामुळे, शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित होईल. त्याचबरोबर, असे अपव्यय झाल्यास, शासनाच्या विकास योजनांबाबत जनता आणि विरोधकांचे दबाव आणखी वाढेल.जिल्ह्यातील वार्षिक विकास योजनेचा निधी केवळ ९ दिवसांत खर्च करण्यासाठी प्रशासनाला आता कडक निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रशासनाने जलद गतीने योजना पूर्ण करणे, निविदा प्रक्रिया साध्या ठेवणे आणि कामांची गुणवत्ता राखणे यासाठी योग्य कदम उचलावेत. अन्यथा, कोट्यावधी रुपयांचा निधी पाण्यात जाऊन, जिल्ह्याच्या विकासाची गती मंद होईल, जे प्रत्येक नागरिकांच्या हितासाठी योग्य नसल्याची प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

## शुक्रवार पेठ भागात भाविकांसाठी ई-रिक्षा व थेट प्रक्षेपण एल.ए.डी स्क्रीनची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२१ मार्च -**

भाविकांसाठी ई रीक्षा व थेट प्रेक्षेपण एल.ए.डी. स्क्रीन, रोडवरील मॅट, छत तसेच पिण्याच्या पाण्याची व्यवस्थे बाबत शुक्रवार पेठ भागातील पुजाऱ्यांच्या वतीने जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थांचे अध्यक्ष यांना निवेदन देण्यात आले.

जिल्हाधिकारी यांनी या विषयी संबंधित आधिकाऱ्यांना सुचना देऊन चैत्र पोर्णिमेच्या आगोदर ई रीक्षा व एल.ए.डी स्क्रीनची व्यवस्था करावी, तसेच तिन्ही अधिकृत गेटच्या हद्दीमध्ये उन्हाची तिव्रता पाहता मंदिर ते तिन्ही गेटपर्यंत रोडवर मॅट व छत आणि पिण्याच्या पाण्याची जागोजागी व्यवस्था तात्काळ करावी, तसेच मंदीर ते भवानी रोडवरील गेटपर्यंत मंदीर स्वच्छता कर्मचाऱ्यामार्फत ज्या प्रकारे स्वच्छता करण्यात येते.

त्याच प्रकारे मंदीर ते पावणारा गणपती गेट, व मंदीर ते आर्य चौक गेट पर्यंतची स्वच्छता दररोज करण्यात यावी ही, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनावर इंद्रजीत साळुंके, बाळासाहेब भोसले, नागनाथ भिसे, रुद्र साळुंके, विक्रम माडजे यांच्या साक्षरी आहेत.

## दशहत माजवणारा बिबट्या अखेर जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२१ मार्च -**

परंडा तालुक्यासह माढा, करमाळा, वाशी, भूम आदी ठिकाणी गेली चार महिन्यांपासून दशहत माजवून धुमाकूळ घालून १७ ते १८ जनावरांचा फडशा पाडणारा बिबट्या अखेर वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला. परंडा तालुक्यातील कपिलापुरी शिवारात हा बिबट्या वन विभागाने पकडला आहे.

मागील दोन दिवसांपासून बिबट्याने कपिलापुरी गावात भितीचे वातावरण निर्माण केले होते. दि.१८ मार्च रोजी कपिलापुरी येथील दत्तू मसगुडे यांच्या शेळीवर भरदिवसा बिबट्याने हल्ला केला होता.



वर्धमान जैन यांच्या शेतात गट नंबर १२८च्या ठिकाणी त्याच रात्री १२.३० च्या सुमारास वर्धमान जैन यांच्या मशीच्या दोन रेड्यांवर बिबट्याने हल्ला चढवला होता. यामुळे वन विभागाने कारवाई करत बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाची मोहिम आखुन कपिलापुरी येथे बिबट्याचा वावर असल्याचे समजताच वन विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले.व बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावण्यात आला. मात्र, १९ मार्च रोजी सायंकाळी ८ वाजण्याच्या सुमारास बिबट्याने पिंजऱ्याचे गज तोडून आत ठेवलेला बोकड घेऊन बिबट्याने पलायन केले.

दि.२० रोजी दुसऱ्या दिवशी वर्धमान गणपती यांच्या शेत गट नंबर १२८ कपिलापुरी या ठिकाणी बिबट्या अखेर वन विभागाच्या पिंजऱ्यात अडकला.

अनेक दिवसापासून परिसरात दहशत निर्माण केलेल्या बिबट्या पकडण्यात यश आल्यामुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पहावयास मिळाले.

यावेळी बिबट्याला पाहण्यासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. सदरील कार्यवाही वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केली.

## शिराढोण येथे नवीन एमआयडीसीसाठी प्रस्ताव देण्याच्या जिल्हाधिकारी यांना सूचना...

# एमआयडीसीतील भूखंड दर कमी करून बांधकाम अट २५ टक्के करण्याचे उद्योगमंत्र्यांचे आश्वासन : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**

एमआयडीसी येथील भूखंडाचे दर कमी करु तसेच शिराढोण येथे एमआयडीसी साठी गायरान जमीन उपलब्ध करण्यासह अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्याचे आश्वासन राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिल्याचे आमदार कैलास पाटील यांनी सांगितले. उद्योगमंत्री यांच्या उपस्थितीत धाराशिव जिल्ह्यातील एम आयडीसीच्या प्रलंबित विषयाबाबत मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस उपस्थित राहून अनेक महत्वाच्या मुद्द्यावर चर्चा केल्याची माहिती आ. पाटील यांनी दिली.

यावेळी वडगाव व कौडगाव एमआयडीसीतील भूखंडाच्या किमती कमी करण्याचा मुद्दा उपस्थित केला. तेव्हा यावर मंत्री सामंत यांनी सकारात्मकता दाखवत भूखंडाच्या किमती कमी करण्यासाठी नवीन धोरण आखण्यात येईल असे सांगितले. तर वडगाव एमआयडीसीत अनेक शेतकऱ्यांचे क्षेत्र वगळण्यात आले आहे. ते क्षेत्रही एमआयडीसीत समाविष्ट करावे अशी मागणी पाटील यांनी सामंत यांच्याकडे केली. यावर पुनर्विचार करण्यात येईल असे त्यानी सांगितले. शिराढोण येथे एमआयडीसीची निर्मिती करण्यासाठी तेथील गायरान जमीन हस्तांतरित करून उद्योग विभागाकडे वर्ग करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. कौडगाव एमआयडीसीमध्ये टेक्सटाइल पार्क उभारण्याची फक्त घोषणा झाली



आहे. घोषणेच्या पुढे काहीही झालेले नसल्याचे यावेळी मंत्री यांच्या पाटील यांनी निदर्शनास आणून दिले. याबाबत त्यांनी येणाऱ्या काही दिवसात निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. धाराशिव एमआयडीसीत प्रस्तावित असलेल्या तालुका क्रीडा संकुलाच्या प्रस्तावाला स्थगिती दिल्याची बाबही पाटील यांनी मांडली. काही दिवसात स्थगिती उठविण्यात येईल असे सामंत यांनी आश्वासित केले. वडगाव एमआयडीसीतील क्षेत्र कमी करण्याबाबतही सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित केले.

एमआयडीसी मध्ये उद्योजकांना पूर्वी २० टक्के बांधकाम करण्याची अट होती ती आता ४० टक्के घालण्यात आली आहे. ती अट कमी करून पूर्वी सारखी २०टक्केच करावी अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. बांधकामाची अट करावी अशी मागणी यावेळी केली. ५ टक्के बांधकामाची अट घालण्यात येईल, असे सांगितल्याची माहिती पाटील यावेळी दिली.

याबरोबरच धाराशिव विमानतळ विकसित करण्यासाठी भरीव निधीची तरतूद करण्यात यावी अशीही मागणी केली. यावेळी माजी मंत्री आमदार अमित देशमुख, आमदार प्रवीण स्वामी यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.

### शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ मार्च -** छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा बसवेश्वर महाराज व वीर महाराणा प्रतापसिंह यांच्या जयंती निमित्त शिव-बसव-राणा सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्या वतीने लातुर येथील शिवशाहीर संतोष साळुंके यांचा शाहीर महाराष्ट्राचा कार्यक्रम आयोजित केला होता.

## विद्यापीठाच्या उपकेंद्रास शैक्षणिक क्षेत्र घोषित करा

### आ. सतीश चव्हाण यांची तारांकित प्रश्नाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या उपकेंद्रास वर्ग केलेला भूखंड शैक्षणिक क्षेत्र म्हणून घोषित करावा अशी मागणी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आ. सतीश चव्हाण यांनी तारांकित प्रश्नाव्दारे दि.२० विधान परिषदेत केली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या धाराशिव येथील उपकेंद्राची स्थापना २००४ मध्ये झाली. शासनाकडून सदर उपकेंद्रासाठी एमआयडीसीच्या माध्यमातून ६० एकर जमीन देण्यात आली. परंतु एमआयडीसीला प्रतिवर्षी सेवा शुल्क म्हणून ३० लक्ष रू. अदा करावे लागते. विद्यापीठ उपकेंद्रांतर्गत विकासकामे विद्यापीठ स्वत:च्या आर्थिक स्त्रोतातून करते, परंतु विकासकामे करण्यासाठी प्रत्येक वेळी विद्यापीठाला एमआयडीसीची परवानगी घ्यावी लागत असल्याचे आ. सतीश चव्हाण यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून निदर्शनास आणून दिले. त्यामुळे धाराशिव येथील विद्यापीठाच्या उपकेंद्रातील विकासकामे करण्यासाठी एमआयडीसीची तांत्रिक मान्यता घेणेबाबतची अट रद्द करून विद्यापीठ उपकेंद्रास एआयडीसीने दिलेला भूखंड शैक्षणिक क्षेत्र म्हणून घोषित करावा अशी आग्रही मागणी आ. सतीश चव्हाण यांनी तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून केली.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सदरील प्रश्नाला उत्तर देतांना सेवा शुल्क माफ करणे तसेच शैक्षणिक क्षेत्र घोषित करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कोणतेही धोरण नाही.

मात्र उच्च शिक्षण विभाग व एमआयडीसीचे संबंधित अधिकारी, विद्यापीठाचे कुलगुरू, कुलसचिव यांची लवकरच संयुक्त बैठक घेऊन सदरील प्रश्न निकाली काढला जाईल असे सभागृहात सांगितले. या चर्चेत आ. विक्रम काळे यांनी देखील सहभाग घेतला.

# श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय आता शासकीय होणार; नाव कायम राहणार

### मित्रचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासकीय करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांनी आज घेतला आहे.

आगामी शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिकेत सदर महाविद्यालय हे शासकीय म्हणून ओळखले जाणार आहे. यानिर्णयामुळे आपल्या भागातील विद्यार्थ्यांना शासकीय शुल्कामध्ये अभियांत्रिकी शिक्षण



मिळणार असून आपल्या मागणीला प्रतिसाद देत मंत्री महोदयांनी आज बैठकी घेतली व त्यात हा निर्णय झाला असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

मराठवाड्यासह धाराशिव जिल्ह्यातील गरीब व होतकरु विद्यार्थ्यांची शासकीय शुल्कामध्ये अभियांत्रिकी शिक्षणाची सोय होऊन या भागाचा शैक्षणिक व आर्थिक विकास व्हावा यासाठी श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान संचलित श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालय शासनाकडे हस्तांतरित करावे यासाठी आपला आग्रह होता व त्या अनुषंगाने याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तत्कालीन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, उदय सामंत व विद्यमान मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करत होतो.

त्याला आज (दि.२१) यश मिळाले असून या निर्णयामुळे या भागातील विद्यार्थ्यांच्या शुल्कामध्ये मोठी बचत होणार आहे.

तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व महाविद्यालयाचा दर्जा सुधारण्याकरिता मदत होईल असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### गरीब व होतकरू विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय...

यासाठी आपण धाराशिवचा आमदार असल्यापासून पाठपुरावा करत होतो. त्याला आता यश आले असून आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री ना. चंद्रकांत पाटील यांचे आभारी आहोत. या निर्णयामुळे या भागातील विद्यार्थ्यांना आता ७०००० रू. ऐवजी २५ ते ३०००० रू. शुल्क लागणार आहे. मराठवाड्यातील विद्यार्थ्यासाठी ७० टक्के जागा आरक्षित राहणार असल्याने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना याचा मोठा लाभ होणार आहे तसेच महाविद्यालयाच्या कर्मचाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगप्रमाणे वेतन मिळणार असल्याचे आ. पाटील यांनी म्हटले आहे.

CMYK

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सुनीता विल्यम्स यांच्या ऐतिहासिक पुनरागमनाचा उमरग्यात जल्लोष!

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२१ मार्च -**

नासा अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांनी २८६ दिवसांच्या ऐतिहासिक अंतराळ प्रवासानंतर पृथ्वीवर यशस्वीपणे पुनरागमन केले. या अभिमानास्पद क्षणाचा आनंद व्यक्त करण्यासाठी उमरगा येथील नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे जल्लोष साजरा केला.



कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. या प्रसंगी उपस्थित नागरिकांनी व कार्यकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करत सुनीता विल्यम्स यांच्या कर्तृत्वाला नमन केला.

यावेळी नितीन नांगरे, ॲड. साईराज टाचले भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष, अतुल शिंदे, सुशील लोंढे, अमोल सगर, गणेश कटके, ज्योतिर्लिंग सोनकावडे, संदीप चौगुले शिवसेना युवा सेना नेते, अतुल कुलकर्णी, समर्थ दंडगे, ऋषी सोमवंशी, श्रीधर ढगे, कपिल कुलकर्णी, संगमेश्वर स्वामी, आकाश कर्पे, संतोष वकारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# वादग्रस्त पवनऊर्जा कंपनीच्या कर्मचाऱ्यासोबत पोलिस अधिक्षकांचे फोटोसेशन

**शेतकऱ्यांची करतेय पिळवणूक... ▶▶ कंपनीने पत्रकारांनाही पाठविल्या आहेत नोटीसा... ▶▶ पोलीस अधीक्षकांसह प्रशासनाचा दुजाभाव?**



**तभा वृत्तसेवा / विशेष प्रतिनिधी**
**धाराशिव, दि.२१ मार्च -**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग प्रकरण ताजे असताना जिल्ह्यातही पवनऊर्जा कंपन्यांच्या बाबत अनेक वाद निर्माण झाले होते. जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांच्या कंपन्याबाबत तक्रारी होत्या. या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीत पोलिस अधिक्षक यांची महत्वाची भूमिका आहे. शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्यांसोबत पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी फोटोसेशन केल्याने प्रशासनावर गंभीर प्रश्नचिन्ह? उपस्थित झाले आहे.

धाराशिव जिल्ह्यातील घाटपिंपरी आणि परिसरात रिन्यु सोलार प्रा. लि. कंपनीकडून पवन ऊर्जा प्रकल्पाचे काम सुरू आहे. मात्र, जिल्ह्यात सुरु असलेल्या अनेक प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसानासह विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या संदर्भात अनेकदा प्रशासनाकडे तक्रारी करण्यात आल्या;

परंतु त्यावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. २० मार्च २०२५ रोजी धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संजय जाधव यांनी या पवन ऊर्जा प्रकल्पाला भेट दिली. त्या वादग्रस्त कंपनीच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांसोबत पोलीस अधीक्षकांचे फोटोसेशनही पार पडले.

हे फोटो समाजमाध्यमांवर झळकताच संतप्त शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांना वेठीस धरून फायदा मिळवणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांसोबत पोलीस अधीक्षक आनंदाने फोटो काढत असतील, तर शेतकऱ्यांसाठी प्रशासन एवढं उदासीन का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

पवन ऊर्जा प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींची नासधूस होत आहे, जमिनीखालील पाण्याचा स्तर खालावत आहे आणि प्रकल्पामुळे गावकऱ्यांना इतरही अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या संदर्भात शेतकऱ्यांनी वारंवार प्रशासनाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांना कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. आश्चर्याची बाब म्हणजे, उपोषणकर्त्या शेतकऱ्यांना भेटण्यासाठी प्रशासनाकडे वेळ नाही, पण कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत फोटोसेशनसाठी मात्र वेळ काढला जातो, हे दुर्दैवी असून शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे लक्ष देणार का, की फक्त कंपन्यांनाच पाठिंबा देणार? हा मोठा प्रश्न आहे.

### शेतकऱ्यांनी कोणाकडे दाद मागायची?

शेतकऱ्यांच्या मते, प्रशासन आणि पोलीस दल शेतकऱ्यांच्या बाजूने असावे, परंतु इथे सर्रासपणे कंपनीला पाठिंबा दिला जात असल्याचे चित्र दिसत आहे. आमच्या हक्कांच्या जमिनी घेतल्या जात आहेत. आमच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. आम्ही आमचे हक्क मागितले, तर आम्हालाच गुन्हेगार ठरवले जाते. पण कंपनीला मात्र सर्व सोयी-सुविधा आणि कायदेशीर मदत मिळते. आम्ही दाद मागायची तरी कोणाकडे? असा सवाल संतप्त शेतकरी विचारत आहेत. स्थानिक शेतकऱ्यांचा आरोप आहे की, या प्रकल्पाच्या कामकाजात पारदर्शकता नाही. कंपन्यांकडून स्थानिक लोकांना विश्वासात घेतले जात नाही. उलट, प्रशासनही कंपन्यांच्या बाजूने भूमिका घेत आहे.

▶▶ पोलिसांनी आमच्यासाठीही अशाच तत्परतेने काम करायला हवं. आम्ही जर आंदोलन केलं, तर पोलिसांनी आम्हाला नोटीस पाठवली जाते, पण कंपन्यांना कुठलीही अडचण येऊ नये म्हणून सर्व यंत्रणा सज्ज असते. हा कुठला न्याय? या प्रकरणामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे. जर प्रशासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केलं, तर आंदोलन आणखी तीव्र होईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. आमच्यासाठी वेळ नाही, पण कंपन्यांसाठी वेळ आहे. जर आम्ही शांतपणे मागण्या मान्य करून घेतल्या नाहीत, तर आम्हाला संघर्षाशिवाय पर्याय नाही. अशा प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून मिळत आहेत.

**- एक शेतकरी**

## जावळे पाटील महाविद्यालयास जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.२१ मार्च -**

महाराष्ट्र राज्य माहिती व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र 'करिअर कट्टा' अंतर्गत लोहारा शहरातील शंकरराव जावळे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लोहारा या महाविद्यालयास (करीअर कट्टा धाराशिव जिल्हास्तरीय उत्कृष्ट महाविद्यालय म्हणुन चौथा पुरस्कार तर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे-पाटील यांना करीअर कट्टा उत्कृष्ट प्राचार्य म्हणुन तृतीय पुरस्कार मिळाला आहे.



तर डॉ. मनोज सोमवंशी यांना करीअर कट्टा उत्कृष्ट महाविद्यालय समन्वयक द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. हा पुरस्कार वितरण समारंभ देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झाला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रमेश पाटील, प्राचार्य डॉ. शेषेराव जावळे पाटील, डॉ. संजय अस्वले, डॉ. हरिदास फेरे, डॉ. नितीन पडवळ, डॉ. दत्तात्रय साखरे, डॉ. मंगेश खराटे, मनोज पाटील, डॉ. विनायक पाटील, डॉ. रामहरी सूर्यवंशी डॉ. शिवाजी कदम, डॉ. बालाजी राजोळे, डॉ. रामेश्वर धप्पाधुळे, डॉ. छाया कडेकर, डॉ. पार्वती माने यांच्यासह आदिंनी अभिनंदन केले आहे.

## महिलांच्या खात्यावर २१०० रुपये द्या; अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.२१ मार्च -**

विधानसभा निवडणुकीच्या अगोदर महाष्ट्रातल्या लाडक्या बहिणींना निवडणूक जाहीरनाम्यामध्ये २१०० रुपयांचे दिलेले आश्वासन पूर्ण करून जाचक अटी शिथिल करून महिलांच्या खात्यावर २१०० रुपये प्रमाणे तात्काळ जमा करण्यात यावे अन्यथा धाराशिव जिल्हा महिला आघाडीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडणार असल्याचा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे महिलाआघाडी शिवसेनेच्या वतीने देण्यात आला आहे.

ज्या महिलेचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख पेक्षा कमी आहे. अशा महिलांच्या उन्नतीसाठी ही योजना सरकारने सुरू केली.

विधानसभा निवडणुकीत हे मानधन १५०० रुपयांवरून २१०० रुपये करणार असल्याचं आश्वासन दिलं गेले होते. त्यांच्या मतदानाच्या आधारावर सध्या खुर्चीत सत्तेत आलात; परंतु प्रत्यक्षात गेले दोन महिन्याचे मानधनहि खात्यात जमा करण्यात सरकारला अपयश आले आहे.

आणि आश्वासन २१०० रुपयाचे देऊन प्रत्यक्षात १५०० रुपये मानधनच खात्यात जमा करण्याचा निर्णय सरकार घेत असल्याने महिलांना अपेक्षाभंग करण्यात आला आहे.




तेव्हा आमची अशी मागणी आहे की, शासनाने निवडणुकीत दिलेल्या आश्वासनानुसार २१०० रुपये मानधन त्वरित लवकरात लवकर सुरू करावे तसेच दोन महिन्याचे थकीत अनुदान तातडीने महिलांच्या बँक खात्यात देण्यात यावे अन्यथा जिल्ह्यातील सर्व महिला रस्त्यावर उतरून सरकारच्या विरोधामध्ये आंदोलन करणार असल्याचाही इशारा यावेळी दिला आहे. या संदर्भात उपजिल्हाधिकारी वैशाली पाटील यांना निवेदन दिलेले आहे.

यावेळी जिल्हाप्रमुख जिनत सय्यद, भूमशहर प्रमुख ज्योती आडागळे, शहर उपप्रमुख गंगा आसलकर, विभाग प्रमुख आलिपशा पठाण, उपविभाग प्रमुख रबाना सय्यद, तालुका समन्वयक उरमीला कावळे, सफिना शेख, पल्लवी साठे, अश्विनी साठे, रुक्मिण काळे, गयाबाई मिसाळ, सिमा क्षिरसागर, संगिता जगदाळे, सुनंदा गरड, वैष्णवी गरड, सुबाबाई शिंदे यांच्यासह महिला उपस्थित होत्या.

## मैलारपूर रस्त्याचे काम निकृष्ठ दर्जाचे; महिन्यातच रस्ता उखडला

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२१ मार्च -**

राष्ट्रीय महामार्गाच्या नळदुर्ग बायपासच्या डांबरीकरणाचे काम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्यामुळे मैलारपुर येथील खंडोबा मंदिरसपासुन गेलेल्या बायपास रस्त्यावर खड्डे पडण्याबरोबरच डांबरी रस्ता उखडला आहे. अवघ्या एक महिन्यातच या बायपास रस्त्याची अशी अवस्था झाली आहे.





सोलापुर-हैद्राबाद रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम सध्या सुरु आहे. या महामार्गाचे काम गेल्या दहा ते बारा वर्षापासुन रखडत पडले होते. या कालावधीत नळदुर्ग ते जळकोट पर्यंतच्या महामार्गावर अनेक भिषण अपघात होऊन अनेकांचा यामध्ये बळी गेला आहे. नळदुर्गकरांच्या तीव्र आंदोलनानंतर या राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला गती येऊन नळदुर्ग बायपासचे काम सध्या पुर्ण होण्याच्या मार्गावर आहे.

दि.२७ आणि २८ जानेवारी रोजी या बायपासवरून एकेरी वाहतुक सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे नळदुर्ग येथे होणारी वाहतुक कोंडीची समस्या आता मिटली आहे.

सध्या नळदुर्ग बायपासमार्गे महामार्गावरील वाहतुक सुरु आहे. मात्र या बायपास रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम संबंधित ठेकेदाराने व्यवस्थित केले नसल्याने मैलारपुर येथील खंडोबा मंदिर परीसरातील बायपास रस्त्यावर एक महिन्यातच खड्डे पडण्याबरोबरच अनेक ठिकाणी हा रस्ता उखडला आहे.

एक महिन्यात या बायपास रस्त्याची अशी दुरावस्था झाली असल्यामुळे या कामाच्या दर्जाबाबत शंका उपस्थित केली जात आहे.

त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी या बायपास रस्त्याची पाहणी करून ज्याठिकाणी या बायपास रस्त्यावर खड्डे पडले आहेत किंवा हा रस्ता उखडला आहे तो तात्काळ दुरुस्त करून घेणे गरजेचे आहे. मात्र बायपास रस्त्यावरही खड्डेच पडले असल्याने नळदुर्गकरांच्या पाचवीला खड्डे पुजले आहेत की काय असा संशय व्यक्त केला जात आहे.

संबंधित ठेकेदाराने बायपास रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम दर्जेदार केले असते तर बायपास रस्त्यावर इतक्या लवकर खड्डे पडले नसते.

त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने हे काम चांगल्या दर्जाचे करून घेणे गरजेचे आहे.

## आष्टा (कासार) येथील जीप ड्रायव्हरच्या जिद्दी कष्टामुळे चार मुलांची उच्चशिक्षणाची कहाणी

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२१ मार्च -**

आष्टा (कासार) येथील जीप ड्रायव्हर प्रकाश बलसूरे यांच्या जिद्द आणि कष्टांच्या बलावर त्यांची चार अपत्ये उच्च शिक्षण घेऊन वडिलांनी दाखवलेल्या प्रकाशाच्या वाटेवर चालत आहेत. आर्थिक परिस्थिती अतिशय कठीण असताना देखील बलसूरे यांनी तीन मुलींना आणि एका मुलाला इंजिनियर बनवले. त्यांच्या कष्टाची प्रेरणा घेऊन अपत्यांनी शिक्षण पूर्ण केले आणि यशस्वी करिअर निर्माण केले.

घरची परिस्थिती अतिशय कमी होती, पण वडिलांनी आपली सर्व शक्ती खर्चून मुलांना शिक्षण दिले. यामुळे त्यांच्या चारही अपत्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले, तर वडील १० वी नापास होते. मुलींच्या शिक्षणासाठी घरी विरोध असताना देखील वडिलांनी त्यांना शिकवण्यासाठी कधीही त्याग केला नाही.



प्रकाश बलसूरे यांच्या कष्टांमुळे त्यांची मुलं उच्चशिक्षित झाली आहेत आणि प्रत्येकाने चांगल्या पॅकेजवर काम करणारा इंजिनियर बनला आहे. मुलींनी आई-वडिलांना ऋण फेडण्यासाठी सुंदर बंगला बांधून त्याच्या चाव्या आई-वडिलांना सुपूर्द केल्या. यामुळे त्यांचे कुटुंब आष्टा (कासार) मध्ये आदर्श बनले आहे.

हे कार्य पाहून सामाजिक संस्थांनी आणि सेवानिवृत्त शिक्षकांनी त्यांचे कौतुक केले आहे. बलसूरे कुटुंबाच्या जिद्द आणि संघर्षाने सर्वांना प्रेरणा दिली आहे.

## जगदाळे महाविद्यालयात जागतिक वन, जल, चिमणी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२१ मार्च -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जागतिक वन दिन जागतिक जल दिन व जागतिक चिमणी दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचा अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, वनस्पती शास्त्र विभाग व ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी निजाम मुलानी (वन विभागाचे सेवा निवृत्त कर्मचारी व वन झाडाचे अभ्यासक) सामाजिक कार्यकर्ते पुष्पराज गपाट कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे व वनस्पती शास्त्र विभागप्रमुख प्रा. शामसुंदर डोके उपस्थित होते. सर्व प्रथम रोप लावलेल्या कुंडीला मान्यवरांच्या हस्ते पाणी घालून कार्यक्रमाचे उदघाट्न करण्यात आले.

यावेळी बोलताना पुष्पराज गपाट म्हणाले कि, पाण्याचा प्रचंड उपसा होतो पण पाणी जिरवले जात नाही तसेच वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन यासाठी पुरुषाबरोबरच स्त्रियांनी पुढाकार घ्यावा आणि पाणी जिरवण्यासाठी शोष खड्डे घ्यावेत त्याच बरोबर शिक्षक वर्गांनी विद्यार्थ्यांना इतर विषयासोबतच सामाजिक भान ठेवण्याचे व पृथीचे व समाजाचे देणे लागते म्हणून झाडे लावावीत व पाणी जिरवण्यासंबंधी धडे द्यावेत असे ते म्हणाले.

वन झाडाचे अभ्यासक निजाम मुलानी यांनी झाडे का लावावीत, खड्डा कसा खोदावा, खड्डा कसा भरावा, झाड कसे लावावे, झाडाला पाणी किती लागते या विषयी सविस्तर माहिती दिली.

### ▶▶ राज्यात सत्तेत असलेली राष्ट्रवादी धाराशिव जिल्हयात मात्र उपेक्षितच...

## प्रा. सुरेश बिराजदारांची विधानपरिषद संधी हुकल्याने कार्यकर्त्यांची निराशा

**तभा वृत्तसेवा / आकाश पोतदार**
**उमरगा, दि.२१ मार्च -**

जिल्ह्यातील कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाच्या असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर आलेल्या असताना व मागील अनेक वर्षापासून सत्तेत असूनही सत्तेपासून वंचित असलेल्या धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना सत्तेत राहूनही निधी, विकास कामे यापासून वंचित रहावे लागत आहे. राष्ट्रवादी पक्षात झालेली मोठी बंडाळी, फुट यानंतरही महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर विश्वास ठेवत जिल्ह्यातील पक्षाची धुरा सांभाळत अडचणीच्या काळात सुरेश बिराजदारांनी धाराशिव जिल्हयातील पक्षाचा किल्ला यशस्वीपणे लढवला.

एकनिष्ठ, अभ्यासू, व कार्यकर्त्यांचा पाठिंबा असलेल्या सुरेश बिराजदार यांना लोकसभेची तयारी करण्यास सांगून ऐनवेळी दादांनी भारतीय जनता पक्षाचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी दिल्याने कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केल्यानंतर बिराजदार यांना विधान परिषदेवर घेऊन धाराशिव जिल्ह्याला ताकद देण्याचे आश्वासन अजित पवार यांनी लोकसभा निवडणुकीतील प्रचाराच्या जाहीर सभेमध्ये दिले होते.

सुरेश बिराजदार यांनीही माघार घेत लोकसभा उमेदवार अर्चना पाटील यांचा प्रचार करत कार्यकर्त्यांनाही कामाला लावले. यानंतर झालेल्या विधान परिषद निवडणुकीत सुरेश बिराजदार यांच्या ऐवजी परभणी येथील विटेकर यांना उमेदवारी दिली आणि कार्यकर्त्यांचा हिरमोड झाला. यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये पक्षाला राज्यात घवघवीत यश मिळूनही जिल्ह्यात राष्ट्रवादीला एकही जागा मिळू शकली नसल्याने धाराशिव जिल्ह्यातील राष्ट्रवादीचा निष्ठावंत कार्यकर्ता विवंचनेत सापडला आहे. त्यातच नवीन शासनाने दि.१७ रोजी जाहीर केलेल्या विधान परिषद निवडणुकीत परत तीसऱ्यांदा सुरेश बिराजदार यांना डावलत संजय खोडके यांना उमेदवारी दिली.



एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा सबंध जिल्हयावर दबदबा होता. जिल्ह्यात झालेल्या बंडाने पक्षाची मोठी क्षती झालेली होती.

अशा परिस्थितीत सुरेश बिराजदार यांच्यावर जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी देत जिल्ह्यातील पक्ष यशस्वीपणे उभा राहिला, असे असताना लोकसभा निवडणुकीत पक्ष सोडून गेलेल्या विरोधी पक्षातील आमदाराच्या पत्नीला उमेदवारी दिल्याने नातेगोत्याचे राजकारण उघड झाले.

विरोधी पक्षात राहूनही राष्ट्रवादीची लगाम आपल्या हातीच राहावी अशी मनसा असलेल्या लोकप्रतिनिधीमुळे राष्ट्रवादीचा कार्यकर्ता पुरता खचला. पक्षातील निष्ठावंतांना न्याय न देता बाहेरील पक्षातील विरोधकांना पक्षात प्रवेश देऊन उमेदवारी दिल्याने पक्षात असंतोष निर्माण झाला होता.

आज जिल्ह्यात पक्षाचा एकही आमदार, खासदार नसल्याने पक्ष कार्यकर्त्यांना विकास निधी, विकास कामांपासुन वंचित रहावे लागत आहे. जिल्ह्यात अशीच परिस्थिती राहिल्यास स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांची मोठी परवड होणार आहे.

लातूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.**
**आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.**

## ... आंदोलन उग्र करून बेमुदत संप करावा लागेल: कॉ. कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** मागील तीन ते चार वर्षापासून सातत्याने निवेदने, धरणे आंदोलने, निदर्शने तसेच अनेक वेळा संप करून सुद्धा आवश्यक तितक्या प्रमाणात बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये सर्व संवर्गात नोकर भरती होत नाही. बँक ऑफ महाराष्ट्र चे वरिष्ठ व्यवस्थापन अहंकारयुक्त दर्पाने आंधळे, मुके आणि बहिरे झाले आहे. यांना बँकेच्या उच्च परंपरा,बँकेचे मालक असलेली जनता आणि ग्राहकांचे होणारे हाल, अपुऱ्या कर्मचारी अधिकारी वर्गामुळे त्यांच्या वरील तणाव याकडे मुजोरपने दुर्लक्ष देवून आपल्याच मस्तीत वागत आहे. त्यामुळे या पुढील काळात महाराष्ट्र बँकेतील संघटनेस बेमुदत संप सुद्धा करावा लागला तर त्यास जबाबदार बँकेचे चेअरमन आणि वरिष्ठ व्यवस्थापन जबाबदार असेल, असा इशारा महाबँक कर्मचाऱ्यांचे राष्ट्रीय नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी दिला.

आज या बँकेत एक दिवसाचा इशारा संप लातूर शहरात कर्मचाऱ्यांनी निदर्शने करून पूर्ण यशस्वी केला. त्यावेळी निदर्शक बँक कर्मचाऱ्यापुढे बोलताना पुढे ते म्हणाले की,अपुऱ्या कर्मचारी अधिकारी संख्येचा विपरीत तात्काळ परिणाम ग्राहक सेवे वरती होताना दिसून येतो आहे. ग्राहकांना अनेक वेळ ताटकळत रांगेत उभारावे लागत आहे. बँक गेली अनेक वर्षे प्रचंड नफा कमावून उत्कृष्ट कामगिरी करीत आहे, मग या नफ्याच्या बदल्यात ज्या ग्राहकांच्या जीवावर हा नफा कमावला जातो, त्या ग्राहकांना निकृष्ट सेवा देण्याचे दुष्ट धोरण, शोषण करणारे धोरण बँक व्यवस्थापनाने अवलंबीने, हा ग्राहकांचा अवमान आणि कृतघ्नपणा आहे. त्यामुळे उत्कृष्ट सेवेसाठी ओळखल्या जाणाऱ्या बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ग्राहक सेवेचे बारा वाजलेले आहेत. त्यामुळेच ऑल इंडिया बँक ऑफ महाराष्ट्र फेडरेशन या ए आय बी ई ए शी संलग्न असलेल्या संघटनेने बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये नोकर भरती या प्रमुख मागणी साठी २० मार्च २०२५ रोजी संपाची हाक दिली असल्याचे बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉ. धनंजय कुलकर्णी यांनी सांगितले.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## एका वर्षात ४ हजार २०० न्यायिक प्रकरणांचा निपटारा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, लातूर या कार्यालयाने सन २०२४ या वर्षामध्ये धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या निर्देशानुसार वेळोवेळी विशेष मोहिमा राबवून लातूर जिल्ह्यातील विविध सार्वजनिक न्यासाचे बदल अर्ज, नवीन न्यास नोंदणीची प्रकरणे व महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या विविध कलमान्वये दाखल प्रकरणांचा निपटारा करुन सन २०२४ मध्ये एकूण ४ हजार २०० न्यायीक प्रकरणे निकाली काढली आहेत. त्याच प्रमाणे अशा प्रकरणांच्या निकालांच्या प्रती संकेतस्थळावर उपलब्ध केल्या आहेत.

नवीन संस्था नोंदणी व न्याय नोंदणीची प्रकरणे संकेतस्थळावर ऑनलाईन दाखल करण्याची सुविधा उपलब्ध केली असल्याने नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नोंदणी प्रमाणपत्रे डिजीटल स्वाक्षरीने उपलब्ध करण्याची सोय उपलब्ध केली आहे.

## चन्नबसवेश्वर फार्मसीत कार्यशाळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या नवीन अभ्यासक्रमानुसार भविष्यात फार्मासिस्ट हा आता केवळ औषध विक्रेता न राहता औषधी तज्ज्ञ म्हणूनही भूमिका पार पाडणार आहे. त्याअनुषंगाने शहरातील चन्नबसवेश्वर फार्मसी महाविद्यालयात डी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

उद्घाटन दीपक वारद यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव भीमाशंकर देवणीकर होते. यावेळी प्रा. डॉ. संजय थोंटे, प्रा. प्रताप भोसले, प्रा. रामलिंग सुगावे यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी विजयकुमार स्वामी यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय थोंटे, सूत्रसंचालन प्रा. बस्वराज सुगावे यांनी केले. आभार प्रा. रोहित कोंबडे यांनी मानले.

## मोची समाजाचा लातुरात फाग उत्सव

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** येथील मोची समाजाच्यावतीने शहरातील सम्राटचौकातील मोची गल्लीत प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही बुधवारी फाग उत्सव उत्साहात साजरा केला.

यावेळी मोची समाजाचे अध्यक्ष रवि कुरील यांच्या समाजाचे आधारस्तंभ स्व. किशनलाल कुरील यांच्या प्रतिमेचे पूजन करून फाग महोत्सवास प्रारंभ करण्यात आला यावेळी उपस्थित सर्व समाज बांधवांवर रंगाची उधळण करण्यात आली. यानंतर भजन मंडळीने विविध भजनाचे सादरीकरण केले. यावेळी समाजबांधवांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. यावेळी समाजाचे अध्यक्ष रवी कुरील, उपाध्यक्ष धीरज कुरील, आकाश दुर्गे, सचिव अशोक गोखले, कोषाध्यक्ष रवी दिवेकर, सहकोषाध्यक्ष राजकुमार कुरील, समाजाचे ज्येष्ठ नेते पूरबीदिन कुरील, सुनील कुरील, जवाहर कुरील, संतोष कुरील, गोपाल चौधरी, राजकुमार चौधरी, हिरालाल दिवेकर, भिकचंद दिवेकर, शाम कुरील, सोमनाथ रवि, अमन चौधरी, बजरंग दुर्गे, पुनमचंद दास, दिनेश दिवेकर, सतीश कुरील, भरत कुरील, योगेश चौधरी, अक्षय चौधरी, आशिष परदेशी, नितीन कुरील, रतन कुरील, होरीलाल कुरील, अजय कुरील, राकेश परदेशी, अभिजित कुरील आदींसह समाजबांधव उपस्थित होते.



## चाकूरकर कुटूंबियांनी घेतली पंतप्रधानांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नवी दिल्लीस्थित त्यांच्या निवासस्थानी नुकतीच सहकुटुंब भेट घेतली. माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या समवेत पंतप्रधानांची झालेली ही सदिच्छा भेट आम्हा सर्वांना ऊर्जा देणारी ठरली असे मत या भेटीनंतर डॉ. चाकूरकर यांनी व्यक्त केले.



शिवराज पाटील लोकसभेचे सभापती असताना केलेल्या नव्या संसद भवनाच्या निर्मितीच्या प्रस्तावाचा मोदी यांनी आवर्जून उल्लेख केला. या भेटीत त्यांच्यासमवेत विविध विषयांवर चर्चा झाली. त्यात प्रामुख्याने नवीन संसद भवनाची निर्मिती व व्याप्ती, लोकसभा मतदारसंघाचे होवू घातलेले परिसीमन, महिलांचा राजकारणातील सहभाग, सौर ऊर्जा मिशन, वन नेशन, वन इलेक्शन, महिला सक्षमीकरण यांचा समावेश होता. भारतातील पुरातन मंदिर स्थापत्य, शिल्प, लेण्या ,अफाट निसर्ग संपदा व जैविक विविधता तसेच सांस्कृतिक व लोककलांच्या समृध्द परंपरेला जगासमोर प्रभावीपणे मांडणे व जगभर पर्यटन क्षेत्रात भारताची अनोखी ओळख निर्माण करण्यासाठी पंतप्रधानाची भूमिका अत्यंत प्रभावी वाटल्याचेही डॉ. चाकूरकर म्हणाल्या.

RTE मधून १० वी पर्यंत शिक्षण केंद्र सरकारच्या RIGHT TO EDUCTION कायद्याअंतर्गत ६ ते १४ वयोगटातील सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याचे धोरण आहे. याद्वारे इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळांमध्येही २५% जागा आरक्षीत आहेत. पण ८ वी नंतर खाजगी शाळेची फीस पालकांना परवडत नाही. त्यामुळे विद्यार्थी नववी/दहावी मध्ये त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिक्षण पूर्ण करू शकत नाही. तसेच अचानक सरकारी शाळेतही तो एडजस्ट होवू शकत नाही.

याचा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर विपरीत परिणाम होतो. याचे होणारे दूरगामी परिणाम याबाबत अनेक वर्षांपासून विचार करत होते. ही बाब पंतप्रधान मोदी यांच्याकडे मांडली. मोफत व सक्तीच्या शिक्षण मर्यादा इयत्ता दहावी पर्यंत लागू करावी, अशी आग्रही विनंती डॉ. चाकूरकर यांनी केल्यानंतर त्या संदर्भात मोदी यांनी अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी माजी केंद्रीय मंत्री शिवराज पाटील चाकूरकर व त्यांचे कुटूंबिय उपस्थित होते.

## अवकाळीने लातूर जिल्ह्याला झोडपले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** उन्हाच्या चटक्याने होरपळत असलेल्या लातूरकरांना गुरुवारी अवकाळी पावसाने झोडपून काढले. दुपारी चार वाजेच्या सुमारास अचानक आभाळ दाटून आले आणि अनेक ठिकाणी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे काढणीला आलेल्या गहू तसेच हरभरा पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

मराठवाड्यात सध्या उष्णतेची प्रखर लाट असून पाऱ्याने चाळीशी गाठली आहे. त्यातच दुपारी चार वाजता लातूर जिल्ह्यातील वातावरण अचानक पावसाळी झाले. उन्हाचा कडाका कमी झाला आणि आकाशात ढगांची दाटी झाली. विजांचा कडकडाटही सुरू झाला. वादळी वाऱ्यासह चाकूर, उदगीर, अहमदपूर, किनगाव, देवणी, औसा तालुक्यात बऱ्याच ठिकाणी पाऊस झाला. उदगीर तालुक्यात गुडसूर परिसरात रिमझिम पाऊस झाला. तर मौजे तांदुळजा मंडळात विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. काटगाव सर्कलमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. हडोळती परिसरात वादळी वाऱ्यामुळे वीज पुरवठा खंडित झाला. किनगाव सर्कलमध्येही अनेक ठिकाणी वीज गायब झाली. औसा तालुक्यात देवंग्रा येथे वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब तसेच झाडे पडली. अंबुलगा, येरोळ येथेही वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. या अवकाळी पावसाने काढणीला आलेल्या गहू, हरभऱ्याचे नुकसान झाले आहे.

## डॉल्बीशिवाय करणार महामानवाला अभिवादन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** येथील आनंदनगरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अध्यक्षीय मंडळाची बैठक घेण्यात आली. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती डॉल्बीमुक्त साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल रोजी आनंदनगर येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत डॉल्बीऐवजी लेझीम पथक, झांज पथक तयार करण्यात येणार आहेत. लेझीम व झांज पथक मिरवणुकीच्या पुढे आपली कला सादर करणार आहेत. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे देखावे निर्माण करून पारंपरिक पध्दतीने जयंती साजरी करण्याचा निर्णय घेण्या आला. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी श्रीहरी कांबळे होते. या बैठकीस अध्यक्षीय मंडळातील टी. एस. कवठेकर, विमल डुमणे, ॲड. संजय सितापुरे, रमेश कांबळे, बाबा गायकवाड, ॲड. रुपेश गायकवाड, नागरत्न कांबळे, महेंद्र लामतुरे, डॉ. सितम सोनवणे, राहुल डुमणे, ॲड. धम्मदीप बलांडे, प्रा. हिराचंद सितापुरे, मल्हारी ठाकरे, संदेश शिंदे आदी उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चिमण्यांसाठी धान्य,पाण्याची सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** जागतिक चिमणी दिवसानिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील वृक्षांवर धान्य व पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करण्यात आली आहे. वन विभागामार्फत हा उपक्रम राबविण्यात आला.

आगामी उन्हाळा लक्षात घेवून लातूर जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्याघराच्यापरिसरातीलवृक्षावर चिमण्यांसाठी अशाप्रकारे छोट्या भांड्यात खाद्य व पिण्याचे पाणी ठेवण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड यांच्यासह वन विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी धनंजय पोटे,



वन परिमंडळ अधिकारी निलेश बिराजदार, वनरक्षक बालाजी पाटील, महेश पवार, गोविंद घुले यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात चिमण्यांसाठी धान्य व पिण्याचे पाणी ठेवण्यात आल्यानंतर जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी स्वतःच्या निवासस्थानीही वृक्षांवर चिमण्यांसाठी अशी सुविधा केली. तसेच इतर अधिकारी, कर्मचारी यांनीही आपल्या घराच्या बाल्कनीत, परिसरातील वृक्षांवर पक्ष्यांसाठी अशाप्रकारे धान्य व पाणी ठेवण्याचे आवाहन केले.

## शहरवासियांना होतोय दुषित पाण्याचा पुरवठा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** महापालिकेच्यावतीने शहरात नळाद्वारे पुरवठा करण्यात येणारे पाणी गेल्या महिनाभरापूर्वी पिवळसर येत होते. दरम्यान, नितळ पाण्याचा पुरवठा होत होता. मात्र, गुरुवारी (दि.२०) शहरातील पूर्व भागात नळाद्वारे अळ्यामिश्रित काळे व अशुध्द पाणीपुरवठा झाला. हे पाणी वापरण्याजोगेही नाही. यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता आहे. महापालिका प्रशासन अद्यापही गांभीर्याने घेत नसल्याने नागरिकांत संतापाची लाट उसळली असून महापालिका प्रशासनाने उपाययोजना करून शुध्द पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.



गेल्या महिनाभरापूर्वी शहरवासीयांच्या नळाला पिवळ्या पाण्याचा पुरवठा होत होता. त्यामुळे नागरिकांना विकतच्या पाण्यावर तहान भागवावी लागत होती. शहरातील वेगवेगळ्या भागांत हे पिवळसर पाणी येत होते. या संदर्भात नागरिकांची ओरड वाढली असतानाही महापालिका प्रशासन याची गांभीर्याने दखल घेत नसल्याचा आरोप होत होता.

### नागरिकांनी केला संताप व्यक्त

महानगरपालिकेने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेत या पिवळ्या पाण्याची तपासणी करून हे पाणी पिण्यायोग्य असल्याचा निर्वाळा दिला होता. तरीही नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. नागरिक नळाद्वारे येणारे पिवळे पाणी पिण्याऐवजी विकतचे जारचे पाणी घेऊन तहान भागवत होते. दरम्यान, नितळ पाणीपुवठा होऊ लागल्याने नागरिक समाधानी होते. पण आता अळ्यामिश्रित काळे व अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याने लातूरकरांतून महापालिका प्रशासनाबद्दल संताप व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील विविध भागांत नळाला पिवळे पाणी आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला.

मात्र, हे पाणी पिण्यायोग्य असल्याचे महापालिका प्रशासनाकडून सांगण्यात आले होते. दरम्यान, हा प्रकार बंद होऊन लातूरकरांना नितळ पाणी मिळत होते. मात्र, गुरुवारी शहराच्या पूर्व भागातील नळाला अळ्यामिश्रित काळे व अशुध्द पाणी आले. त्यामुळे पुन्हा नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महापालिका प्रशासनाने उपाययोजना करून शुध्द व पिण्यायोग्य पाणीपुरवठा करावा, अशी मागणी होत आहे.

## चांगले विचार आचरणात आणणे हीच राष्ट्रसेवा होय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** युवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती असून युवा विकास हाच राष्ट्र विकासाचा मार्ग आहे. विद्यार्थी, विद्यार्थिनीचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना ग्रामस्वच्छता, व्यसनमुक्ती, पर्यावरण संतुलन, इत्यादी विविध विषयांची ओळख होवून त्याबद्दल जागरूकता निर्माण व्हावी या हेतूने मौजे दर्जी बोरगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या भव्य शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. या वेळी उद्घाटक म्हणून जागतिक कीर्तीचे पखवाज वादक पंडित उद्धवबापू आपेगावकर, अध्यक्ष म्हणून दर्जी बोरगावचे गोविंदराव माने, डॉ.बाबासाहेब ठोंबरे, डॉ. संजीव बंटेवाड, डॉ.दिनेशसिंह चौहान, ॲड.संतोष पवार, विनायक माने, श्री.प्रशांत बर्दापूरकर, डॉ. व्यंकट जगताप, डॉ.अच्युत भरोसे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमापूजन झाले. त्यानंतर स्वागतगीत गायन होताच कार्यक्रमास सुरुवात झाली. यावेळी उद्घाटनपर भाषणात पंडित उद्धवबापू आपेगावकर म्हणाले विद्यार्थ्यांनी वेळेचे बंधन पाळून शिस्त पाळावी. यावेळी अनेकांनी मार्गदर्शन केले.

## किल्ल्यावरून उडी मारून लातूरच्या तरुणीची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** लातूर शहरातील एका तरुणीने किल्लयावरून उडी मारत आपले जीवन संपविले. ही घटना पुणे जिल्ह्यात घडली. मानसी प्रशांत गोविंदपुरकर (वय.२१ वर्षे सावेवाडी, लातुर) ही सकाळी ०७:३० वाजता कॉलेजला जाण्यासाठी घरातून निघून गेली व कॉलेजला न जाता ती एकटीच मावळ तालुक्यातील किल्ले लोहगड येथे सकाळी पोहचली.



गडाच्या रिवर्स वाटरफॉलच्या कड्यावरून उडी मारुन आत्महत्या केली. यावेळी तिच्या मामानी सांगवी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांच्या मदतीने तिचे मोबाईल लोकेशन मावळ तालुक्यातील लोहगड परिसरात असल्याने निदर्शनास आल्यावर पोलिसांनी वेगाने तपास कार्य सुरू केले. यावेळी तिचा मृतदेह लोहगड गडाच्या पायथ्याशी मिळून आला आहे. पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशात आवारे, पोलीस हवालदार जय पवार हे तपास करत आहे. शिक्षणाच्या नैराश्यातून तिने हे टोकाचे पाऊल उचलले असल्याचे सांगण्यात येते.

## संस्कृतीचे उज्ज्वल भवितव्य ग्रंथांवर अवलंबून

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** ग्रंथासारखा दुसरा मित्र नाही. या जगात ज्याला कोणी नाही, त्याच्या पाठीशी ग्रंथ उभे राहतात. संस्कृतीचे उज्ज्वल भवितव्य भाषेवर आणि ग्रंथांवर अवलंबून असते. ग्रंथामध्ये ज्ञानाचे झरे असतात. ज्यांना ज्ञान मिळवायचे आहे, त्यांनी ग्रंथालयात जायला हवे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत तथा माजी कुलगुरु डॉ. जनार्धन वाघमारे यांनी केले.

दोन दिवसीय 'लातूर ग्रंथोत्सव'चे गुरुवारी जिल्हा क्रीडा संकुल येथून ग्रंथ दिंडी काढण्यात आली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांच्या हस्ते दिंडीचे उद्घाटन झाले. या दिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी पारंपरिक वेशभूषा केलेले विद्यार्थी, झांज पथक, लेझीम पथक यांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. ढोल ताशे, टाळ मृदंगाच्या गजरात ग्रंथ पालखी घेऊन कम्युनिटी हॉल



येथे आल्यानंतर या दिंडीचा समारोप करण्यात आला. त्यावेळी अध्यक्षीय भाषणात डॉ. वाघमारे बोलत होते. यावेळी छत्रपती संभाजीनगर विभाग ग्रंथालय संघाचे कार्यवाह राम मेकले, जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रभाकर कापसे, कालिदास माने, साहित्यिक डॉ. जयद्रथ जाधव, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे, आत्माराम कांबळे, माधव बावगे, हावगीराव बेरकिळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. वाघमारे म्हणाले, ग्रंथांचे मोल पैसा, संपत्तीमध्ये होऊ शकत नाही. ग्रंथांमुळे आपला इतिहास समजला. आपल्या संस्कृतीचा ठेवा ग्रंथांमध्ये सापडतो. शिक्षणाचा प्रसार झाल्यानंतर वाचन संस्कृतीचा विकास होतो. वाचन संस्कृती वाढविण्यासाठी चांगले ग्रंथ निर्माण झाले पाहिजेत. तसेच 'गाव तिथे ग्रंथालय' ही चळवळ रुजविली गेली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी जिल्हाधिकारी ठाकूर म्हणाल्या, ग्रंथ हा माझ्या जिव्हाळ्याचा विषय आहे. ग्रंथांमुळे मला आयुष्यात यशस्वी होण्याची प्रेरणा मिळाली. मराठी ही आपली माय माउली आहे. यावेळी लातूर शहरातील नागरिक आणि ग्रंथ प्रेमी उपस्थित होते.

## भारतीय संविधान शाश्वत मुल्यांचे प्रतिक : डॉ. कुंभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २१ मार्च -** आपल्या देशात शांतता आणि स्थैर्य टिकवून ठेवण्यात संविधानाचा मोठा वाटा आहे. भारतीय संविधान हे शाश्वत मूल्यांचे प्रतिक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. नागोराव कुंभार यांनी केले.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, लातूरच्यावतीने आयोजित दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या पहिल्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात 'आपला मान आपला स्वाभिमान : भारतीय संविधान' या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. कुंभार बोलत होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून भूषणकुमार जोरगुलवार, डॉ. राजशेखर सोलापुरे, विलास सिंदगीकर उपस्थित होते.

यावेळी डॉ. कुंभार म्हणाले, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही लोकशाही टिकून राहण्याचे संपूर्ण श्रेय हे संविधानाला आहे. रक्ताचा एकही थेंब न सांडता सामाजिक क्रांती साधण्याचे श्रेयही संविधानालाच आहे. भारतीय संविधान हे मानवी कल्याणाचे साधन आहे. या संविधानाचे रक्षण-संरक्षण करण्याची जबाबदारी प्रत्येक जागरूक भारतीयाची आहे. आपल्या संविधानाने सामान्यांना शक्ती प्रदान करण्याचे काम केले आहे असे सांगितले. यावेळी सिंदगीकर यांनी, संविधानाने राष्ट्र जोडण्याचे, एकसंघ ठेवण्याचे मौलिक कार्य केल्याचे सांगितले. जोरगुलवार यांनी ग्रंथालय चळवळ माणसाला माणुसकी शिकवण्याचे कार्य करते, असे सांगितले. डॉ. सोलापुरे यांनी, राज्यकर्ते कसे निवडून द्यायचे? हा अधिकार संविधानाने दिल्याचे सांगितले. सूत्रसंचालन अनिल पाटील यांनी केले तर आभार संजय सूर्यवंशी यांनी मानले.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## औसा येथे राज्यस्तरीय भजन, गायन स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२१ मार्च -**

औसा येथील माऊली प्रतिष्ठान आणि माऊली संगीत विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.२२ आणि रविवार दि.२३ मार्च रोजी मुक्तेश्वर मंदिरात राज्यस्तरीय भजन गायन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिवशीय स्पर्धेत शनिवारी बाल गट तर रविवारी खुल्या गटाच्या स्पर्धा होणार आहेत. बाल गटात प्रथम पारितोषिक पाच हजार रुपये तर खुल्या गटात प्रथम पारितोषिक अकरा हजार रुपये ठेवण्यात आले असून गुनानुक्रमे एकूण आठ पारितोषिक आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

कार्यक्रमात खंडू क्षीरसागर, ओंकार चव्हाण, कै. गजेंद्र जाधव यांच्या स्मरणार्थ माऊली संगीत विद्यालय, स्व. तुकाराम बुवा पुरी यांच्या स्मरणार्थ माधव पुरी यांनी स्व. विजयकुमार जाधव यांच्या स्मरणार्थ दादासाहेब शिक्षण प्रसारक मंडळ, लातूर, हभप श्रीमंत पांचाळ चिखुर्डा, स्व. कृष्णाबाई कदम यांच्या स्मरणार्थ प्रभू कदम मांजरी यांच्या वतीने या स्पर्धेतील पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन माऊली प्रतिष्ठानचे अध्यक्ष पं. शिवरूद्र स्वामी, उपाध्यक्ष मन्मथ पाटील, सचिव व्यंकटराव राऊतराव आणि कोषाध्यक्ष हणमंत लोकरे यांनी केले आहे.

### संक्षिप्त वृत्त...



#### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी सुरवसे

**निलंगा, दि.२१ मार्च -**

विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समिती अशोक नगर निलंगा अध्यक्षपदी बलवान सुरवसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. दि.१६ मार्च रोजी सामाजिक सभागृह येथे पार पडलेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली. या बैठकीत उपाध्यक्षपदी टी.एम. सुरवसे व सचिन गायकवाड यांची निवड करण्यात आली. तर सचिवपदी गिरीश पात्रे यांची निवड करण्यात आली. सहसचिव म्हणून नेताजी गायकवाड यांची निवड करण्यात आली. कोषाध्यक्षपदी विष्णू कांबळे यांची निवड करण्यात आली. सह कोषाध्यक्ष म्हणून अमित गायकवाड यांची निवड करण्यात आली तर मिरवणूक प्रमुख म्हणून अमर, अनोज कांबळे, विनोद भोसले, अभिजित सूर्यवंशी, जितेंद्र कांबळे इत्यादींच्या निवडी करण्यात आल्या. या जयंती उत्सव समितीचे कायदेशीर सल्लागार म्हणून ॲड.एस.व्ही. धैर्य यांची निवड करण्यात आली.



#### कुस्तीपटू विष्णू तातपूरे, महेश तातपूरे यांचा सत्कार

**लातूर, दि.२१ मार्च -**

संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागून असलेल्या लातूरचे ग्रामदैवत सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थान यात्रेतील कुस्ती स्पर्धेत रायगड ग्रुपचे अमर कोकाटे यांच्याकडून दिले जाणारे ५१ तोळे चांदीचे कडे महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील विष्णू तातपूरे आणि केतन हलवाई यांच्या वतीने दिले जाणारे २१ तोळे चांदीचे कडे महेश तातपूरे यांनी जिंकले. त्याबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या प्राचार्य कक्षामध्ये प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते शाल आणि पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, डॉ. गुणवंत बिरादार, प्रा. आशिष क्षिरसागर, डॉ. यशवंत वळवी, डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. रवींद्र सुरवसे, डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. मनोहर चपळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विष्णू तातपूरे आणि महेश तातपूरे यांनी संपादन केलेल्या उज्वल यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील तपसेचिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजयकुमार रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीपकुमार दिंडेगावे आणि इतर सर्व संस्था पदाधिकारी, क्रीडा विभागातील सर्व सदस्य यांच्यासह, उपप्राचार्य, विभाग प्रमुख, शाखा समन्वयक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

#### शेख शहाबोद्दीन सार्वरदिया फाउंडेशनच्या वतीने इफ्तार पार्टी

**वलांडी, दि.२१ मार्च -**

इस्लाम धर्माचा पवित्र रमजान महिना सुरू असून, रोजेदार दिवसभर उपवास ठेवून इफ्तारच्या वेळी प्रार्थनेसाठी एकत्र येतात. याच पार्श्वभूमीवर शेख शहाबोद्दीन सार्वरदिया फाउंडेशनच्या वतीने वलांडीत भव्य इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन खदिर कादरी, समीर शेख, सोहेल अंबुलगे, याकूब शेख, निहाल शेख, अर्षद बागवान, सोहेल शेख, वसीम कादरी, साहिल शेख, कैफ़ बागवान, साहिल सैय्यद, तनवीर तंबोली, जिशान शेख, अल्ताफ सय्यद, ख़ुदुब शाहा, आलीशान शेख़, मुदस्सिर सय्यद, अल्ताफ जमींदार, छोटू मनियार, शाभू मनियार, अजर शेख़, इरशाद शेख, साजिद सय्यद, निहाल तांबोळी, शाबू शेख यांनी केले.

## वलांडीत आधार केंद्र नसल्याने नागरिकांचे हाल



**तातडीने आधार केंद्र सुरू करण्याची मागणी...**

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२१ मार्च -**

देवणी तालुक्यातील वलांडी हे महसूल विभागाच्या अर्ध्या महसूल मंडळाचे मुख्य गाव असूनही येथे अद्याप आधार केंद्र उपलब्ध नाही. परिणामी, वलांडीसह परिसरातील सुमारे ३० ते ३५ गावांतील नागरिक, शेतकरी व विद्यार्थी यांना आधार अद्यावत करणे, मोबाईल नंबर लिंक करणे आणि विविध सरकारी योजनांसाठी आधार संलग्न करणे यासाठी तालुका ठिकाणी जावे लागते.

वलांडीमध्ये आठ ते दहा सीएससी केंद्रे कार्यरत असले तरी, त्यापैकी एकाही केंद्रावर, सन २०१७ पासून आधार नोंदणी व सुधारणा सेवा उपलब्ध नाही. त्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शैक्षणिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी, शासनाच्या वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या योजनाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रधानमंत्री योजनांसाठी तसेच सातबारा व केवायसी प्रमाणीकरणासाठी आधार अद्ययावत करणे आवश्यक आहे. मात्र, यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जावे लागल्याने वेळ आणि पैसा दोन्ही खर्च होतो.

विशेषतः ॲग्रीस्टिक फार्मा कार्डसाठी आधार लिंकिंग आवश्यक असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे कृषी विभागाशी संबंधित कामे ठप्प झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर, वलांडी येथे कायमस्वरूपी आधार केंद्र सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात तहसीलदार सोमनाथ वाडकर आणि गटविकास अधिकारी सागर वरंडेकर यांच्या उपस्थितीत जवळग्याचे सरपंच विजयकुमार पाटील व वलांडी येथील ज्येष्ठ पत्रकार अजीज सौदागर, हसन मोमीन, निहाज मुर्शेद, अहमद पठाण यांनी निवेदन सादर केले.

प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन वलांडीत आधार केंद्र सुरू करावे, अशी मागणी वलांडीसह परिसरातील नागरिकांकडून होत आहे.

## जीवनदीप संस्थेतर्फे पक्षांना पाणपोईची सुविधा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२१ मार्च -**

जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने जिवनदीप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी पक्षांना पाणपोईची सुविधा करुन जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला.

सध्या उन्हाळा ऋतू सुरू असल्याने, तसेच जागतीक तापमान वाढ, प्रदुशन वाढ, वृक्ष तोड यामुळे पक्षांचा अधिवास कमी होत चालला आहे. त्यांची संख्या कमी होत चालली आहे. पक्षांना पाणी, खाणे मिळणे अवघड झाले आहे. त्यांच्या राहण्याची, खाण्याची, पाण्याची व्यवस्था करने आवश्यक आहे. जीवनदिप बहुउद्देशीय शैक्षणिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी पक्ष्यांना पाणी पिण्यासाठी मातीच्या यळणी, पाणपोई सुविधा केली जाते. सार्वजनिक स्मशानभूमी शांतीवन येथे रामदास महाराजांच्या हस्ते व संगन बसव स्वामी लिंगायत विरक्त मठ येथे

संगन बसव महास्वामी, अजित शाहीर, सुजित शाहीर, शंकर मठपती, माधव सुभेदार, नेताजी सुभेदार, मुख्याध्यापिका सुहासिनी पाटील यांच्या हस्ते पक्षांना पाणपोई, मातीच्या यळणी झाडांना बांधण्यात आल्या.

या उपक्रमासाठी डॉ. सतीश जाधव, सत्यजीत हिरास, प्रवीण मोहोळकर, हरिभाऊ टोंपे, विठ्ठल पाटील, परमेश्वर पाटील, सोमनाथ मोहोळकर, मल्लिनाथ मोहोळकर, गणेश मोहोळकर, श्रीराम कुंभार, ॲडव्होकेट हेमंत टोंपे यांचे सहकार्य लाभले.

## थेरगावात ग्राम दरबार उपक्रमा अंतर्गत विविध योजनांची माहिती

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२१ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील थेरगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात १९ मार्च २०२५ रोजी ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात ग्रामपंचायत अंतर्गत विविध योजनांची माहिती ग्रामविकास अधिकारी किशोर विभुते आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी दिली.

ग्रामसेवक किशोर विभुते यांच्या नेतृत्वाखाली थेरगावच्या विकासासाठी विविध शासकीय योजनांचा समावेश करण्यात आला.

त्याचाच एक भाग म्हणून, घरकुल आवास योजना, समाज कल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती विस्तार अधिकारी व्होट्टे यांनी दिली. तसेच, ८-अ अंतर्गत नोंदी मंजूर करणे, नागरीकांना ८-अ चे उतारे देणे, प्रलंबित तक्रारींचा निपटारा करणे, तसेच गावांतर्गत रस्ते आणि नाली बांधकाम याबद्दल सखोल मार्गदर्शन केले.यावेळी पंचायत समितीचे कृषी विभाग अधिकारी अमोल गायकवाड यांनी कृषी योजनांची माहिती दिली. त्यांनी शेंद्रीय शेती, माती परीक्षण, पिक नियोजन, किड नियंत्रण, रसायणमुक्त शेती आणि बायोगॅस याबद्दल सविस्तर माहिती दिली.

यावेळी सरपंच रेखा संजय जाधव, अविनाश शिंदे, ज्ञानदेव भांगे, गोवर्धन सुर्यवंशी, जयराम हौसे, सुदर्शन शिंदे, रमाकांत चांगले, माधव चामले, उध्दव भांगे, अंगणवाडी सेविका व मदतनीस, आशा कार्यकर्ती निर्मला सुर्यवंशी आणि गावातील नागरिक उपस्थित होते.

## धनगर समाजाला ॲट्रॉसिटी कायदा लागू करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२१ मार्च -**



सामाजिक सुरक्षेचे कवच म्हणून धनगर समाजाला ॲट्रॉसिटी कायदा लागू करण्याची मागणी निलंगा येथील सकल धनगर समाज व ऑल इंडिया धनगर महासंघाच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या महाराष्टात धनगर समाजावर प्राणघातक हल्ले, अन्याय, अत्याचाराचे प्रमाण वाढत आहेत, त्या अनुषंगाने धनगर समाजाला सामाजिक सुरक्षेतेची गरज आहे. सन २०१४ च्या लोकसभा, विधानसभा निवडणूक पूर्वी महाराष्ट्रत धनगर समाजाच्या संविधानिक देयक असलेले अनुसूचित जमातीच्या आरक्षणाची मलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्रभर धरणे, आंदोलन, आमरण उपोषण, रास्ता रोको चालू असताना भाजपाचे स्टार प्रचारक सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर सभेत जर देशात व राज्यात भाजपाचे सरकार आले तर धनगर समाजाच्या आरक्षणाची मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकित अमलबजावणी करू असे आश्वासन दिले. परंतु आतापर्यंत अमलबजावणी झालेली नाही. पण धनगर समाजासाठी अनुसूचित जमातीच्या २२ योजना लागू केल्या आहेत.

त्याला अनुसरून सध्या महाराष्टत धनगर समाजावर जीवघेणे हल्ले होताना दिसत आहे. दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. कमी होत नाही, सरकार याची गांभीर्याने दखल घेत नाही, हा सर्व प्रकार महाराष्ट्रात सकल मराठा समाज ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याची मागणी घेऊन आंदोलन सुरू केले, त्याच वेळी ओ बी सी आरक्षण बचाव समिती कडून आरक्षण वाचवण्यासाठी ओबीसी मैदनात उतरून अदोलन करताना या आंदोलनात ओबीसी मध्ये धनगर समाज मोठ्या संख्येने आहे. म्हणून आंदोलनात धनगर समाजाचा जास्त सहभाग असल्याने धनगर समाजाला टारगेट करून प्राण घातक हल्ले, अन्याय, अत्याचारात वाढ झाली आहे. दिवसेंदिवस वाढत चालली आहे, कमी होताना दिसत नाही, यासाठी धनगर समाजाच्या सुरक्षेसाठी ट्रॉसिटी कायदा लागू करण्याची मागणी सकल धनगर समाजच्या वतीने मागण्या करण्यात आले.

यावेळी झटींग म्हेत्रे, भगवान वरवटे, मल्हारी पेठकर, नामदेव काळे, युवराज जोगी, चंदर मामा गोजरटे, लक्ष्मण होळकर, प्रकाश गड्डे, बालाजी म्हेत्रे, रघुनाथ वरवटे, बापू वरवटे, कमलाकर बालकुंदे, व्यकट वरवटे, गणपत वरवटे, शिवराज सूर्यवंशी, सुरेश बिराजदार आदींसह धनगर समाज बांधव उपस्थित होते.

**औराद शहाजानीत स्वातंत्र्यापूर्वीपासूनची परंपरा आजही सुरू...**

## रंगपंचमीनिमित्त कृत्रिम हत्ती व सिंहाची मिरवणूक; नागरिकांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.२१ मार्च -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील लिंगायत समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींनी सुरू केलेली एक ऐतिहासिक परंपरा आजही शंभर वर्षांनंतर मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने जपली जात आहे. धुलिवंदनाच्या दुसऱ्या दिवशी कृत्रिम हत्तीची मिरवणूक आणि रंगपंचमीच्या दिवशी सिंहाची मिरवणूक काढण्याची प्रथा आजही चालू आहे. या परंपरेला गावातील नव्या पिढ्यांनीही पुढे चालवले आहे.

शंभर-दीडशे वर्षांपूर्वी कै. मडोळय्या डोंगे, कै. काशीनाथ गस्तगार, कै. काशीनाथ वलांडे आणि इतर प्रतिष्ठित व्यक्तींनी या परंपरेला सुरूवात केली. आजही या परंपरेला दृढ स्वरूप देत लिंगायत समाज आणि इतर समाजातील नागरिक एकत्र येऊन उत्सव साजरा करतात. धुलिवंदनाच्या दुसऱ्या दिवशी रात्री श्री विरुपाक्षेश्वर मठातून हत्तीची मिरवणूक काढली जाते. बैलगाडीमध्ये ज्वारीच्या कडब्यापासून तयार केलेल्या दहा फुटाच्या हत्तीसोबत राजा बसवला जातो. ही मिरवणूक लिंगायत गल्ली आणि मारवाडी गल्लीतून मार्गक्रमण करून पुन्हा विरुपाक्षेश्वर मठात संपते. रंगपंचमीच्या दिवशी रात्री, लाकडी भूश्यापासून तयार केलेल्या पाच फुटी सिंहाची मिरवणूक गुरबसप्पा राचोटीप्पा मठातून निघते आणि लिंगायत व मारवाडी गल्लीतून परत मठात संपते.

या मिरवणुकीत हत्ती आणि सिंहावर आकर्षक कपड्यांची सजावट केली जाते, जी मल्लिकार्जून गणाचारी, सिद्रामप्पा पुराणे, रविंद्र अंबुलगे आणि करबसय्या स्वामी यांच्या मदतीने केली जाते. मिरवणुकीच्या समोर 'कोल' या टिपऱ्यांचा खेळ खेळला जातो, ज्यात कन्नड, मराठी आणि हिंदी गाण्यांचा समावेश असतो. तंगी या ऊर आवा, बाबा नार बडी प्यारी, प्यारा हिंदुस्तान है अशा गाण्यांसह हा खेळ रंगत असतो. आजही काशिनाथप्पा सजनशेट्टी, रघुनाथप्पा मंगशेट्टे यांच्या वयस्कर हार्मोनियम वादनामुळे गीतांना जीव येतो, तर मल्लिकार्जून टेंकाळे, सोमनाथ अंबुलगे, शिवराज राघो आणि इतर साथीदार तबला, गायन व टाळ वाजवतात. या सर्वांनी एकत्र येऊन या परंपरेला जीवंत ठेवले आहे. ही परंपरा लिंगायत समाजाने सुरू केली असली तरी गावातील इतर जातींच्या लोकांनाही यामध्ये भाग घेण्याचे आवाहन केले जाते. होळीपासून रंगपंचमीपर्यंत खेळला जाणारा टिपऱ्यांचा खेळ पंधरा दिवस आधीपासून तयार करण्यात येतो. विविध खेड्यापाड्यांतील लोक या उत्सवात सहभागी होतात, आणि त्यात राम, लक्ष्मण, सीता, हनुमान,



वाघ इत्यादी विविध सोंगांच्या माध्यमातून सणाची रंगत वाढवली जाते.

या परंपरेचे महत्त्व तीन पिढ्यांच्या सहभागाने अधिक वाढते. समाज प्रबोधन व सामाजिक एकतेच्या दृष्टीने ही परंपरा एक मोठा संदेश देत आहे. आजही आणि भविष्यातही लिंगायत समाजातील तरुण आपल्या परंपरेला जपण्याचे वचन देत आहेत.

औराद शहाजानीत व निलंगा तालुक्यात ही परंपरा मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध असून, ती पुढील पिढ्यांपर्यंत चालू ठेवण्याची भावना व्यक्त केली जात आहे.

## रेणापूर तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी यंदा सालगडी झाला लाख मोलाचा

**शोध घेऊनी गडी काही मिळेना... शेतकरी हवालदिल...**

**तभा वृत्तसेवा / उदयकुमार पाठक**
**रेणापूर, दि.२१ मार्च -**



गुढीपाडवा जवळ आला आहे. या सणापासून शेतकऱ्यावर शेतकऱ्यांच्या नवीन वर्षाला प्रारंभ होतो. यंदा रेणापुर तालुका व पानगाव परिसरात मात्र शेतकऱ्यांसाठी सालगडी लाख मोलाचा झाला आहे. शेतकरी शोध घेत असले तरी कोणीही सालगडी म्हणून तयार नसल्याचे चित्र रेणापुर तालुक्यात व पानगाव परिसरात दिसून येत आहे.

ज्यांच्याकडे पंधरा ते वीस एकर किंवा त्यापेक्षा जास्त शेती आहे. त्यांना घरच्या माणसावर शेतीचे संपूर्ण काम करणे शक्य होत नसल्याने सालगडी ठेवण्याची परंपरा आहे. त्याला घरच्या माणसावर शेतीचे संपूर्ण काम करणे शक्य होत नसल्याने साल गडी ठेवण्याची परंपरा आहे. या सणाच्या दिवशी शेतकरी वर्षभर शेतात राबणाऱ्या बैल जोडी सह शेती अवजाराची पूजा करून उन्हाळी मशागतीच्या कामाला सुरुवात करतो.

यंदा ३० मार्च रोजी गुढीपाडव्याचा सण साजरा होणार असून नववर्षानिमित्त सालगडी मिळावा यासाठी शेतकऱ्याकडून शोध घेतला जात आहे.

परंतु अलीकडच्या काळात सालगडी मिळणे कठीण झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. मागणीप्रमाणे सालाचे पैसे देऊनही मनधरणी करावी लागत असल्याचे चित्र मागील चार वर्षापासून दिसून येत आहे. सालाचे पैसेही द्या आणि धान्यही द्या असे चित्र मागील दोन-तीन वर्षापासून दिसून येत आहे. सालगड्यासाठी वर्षाचे सव्वा ते दीड लाख रुपये मोजावे लागत आहेत. एवढे पैसे देऊनही धान्यही द्यावे लागत आहे.

त्यामुळे घरची माणसे शेतातील काम करणारी असली तर शेती परवडते अन्यथा किती परवडत नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सालाने नको महिन्याने काम हावे.

पूर्वी शेतमजुराकडून महिणे किंवा रोजंदारीला पसंदी न देता साल गडी म्हणून राहण्याचा कल असायचा पण मागील पाच वर्षात मात्र सालगडी म्हणून राहण्यास कुणीही तयार होत नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. सालगडी ठेवायचा तर तो मिळत नाही.

मिळाला तर सव्वा दीड लाख रुपये मोजावे लागत असल्याचे शेतकरी वर्गातून सांगितले जात आहे.

सध्याच्या घडीला सालगडी शोधूनही परिसरात सापडत नसल्यामुळे शेतकऱ्यांकडून गावात किंवा परगावातील सालगडी पाहिला जातो. तर काही शेतकरी दुसऱ्या जिल्ह्यातून सालगडी आणण्याचे नियोजन करत आहेत. काही वर्षांपूर्वी सालगडी घरी यायचे व कामासाठी ठेवा म्हणून विनवणी करायचे जे नियमित काम करायचे तेच वर्षानुवर्ष सालगडी म्हणून राहायचे आता मात्र सालगडी म्हणून काम करायला कोणीही तयार नसल्याचे चित्र दिसून येत आहे.



अशा परिस्थितीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे. उत्पादनात दरवर्षी होणारी घट. बाजारात शेतमालाचे पडलेले भाव. यामुळे शेतकरी अडचणीत येत आहेत अशा परिस्थितीत सालगड्याला आलेला भाव. मजुरीचे वाढलेले दर. यामुळे शेती करावी तरी कशी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडत आहे. यंदा चांगले उत्पन्न मिळेल पुढच्या वर्षी मिळेल असे वाटते. परंतु दरवर्षी शेती तोट्याची ठरत आहे. परिणामी शेतकरी अडचणीत येत आहे.

**- धर्मराज मोटाडे,** शेतकरी पानगांव